विषय ...
सं. क्र.

# शब्द

राम देशमुख

REFBK-0026937

मराठी ग्रंथ …ालय, ठा…

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

28 JUL 1993

( क्र. मा. पद्दा )
१००००–११–८९

निबंध
संदर्भ
निबंध
३५३६
२९९३८
२२।८।९३

संग्र... ...णे.

मराठी ग्रं- ...संग्रहालय ठाणे
क्र. ३५३६ २९९३८ निबंध २२।८।९३
मुंबई शाखा

# शब्द

राम देशमुख

REFBK-0026937

प्रचार प्रकाशन
कोल्हापूर

प्रकाशन क्रमांक / १८६

प्रकाशक
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब प्लॉट नं. ४/अ
नलवडे कॉलनी
सम्राटनगर, सागरमाळ
कोल्हापूर – ४१६ ००८
फोन – २०६६८

© संजय राम देशमुख
३०, संजीवन जि. प. क. कॉलनी
पो. विदर्भ महाविद्यालय
अमरावती ४४४ ६०४

प्रमुख वितरक
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
१३ ई, महालक्ष्मी चेंबर्स
सेंट्रल एस. टी. स्टॅण्डसमोर
कोल्हापूर ४१६ ००१

मुद्रक
हरीश विनायक चौधरी
अंजीश कमर्शियल आर्ट प्रिंटर्स
६६९ ई, शाहूपुरी ३ री गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१

मुखपृष्ठ
प्रसाद मराठे
२३२ बी, खर्डेकर गल्ली
कोल्हापूर ४१६ ०१२
फोन : २४३८८

ब्लॉकस्
उदय प्रोसेस

प्रथम आवृत्ती
नोव्हेम्बर, १९९२

मूल्य रु. ४०

| | |
|---|---|
| शब्द | Shabda |
| राम देशमुख | Ram Deshamukh |

सारे त्रिभुवन व्यापून
दशांगुळे उरलेल्या आई !
तुझ्या हरविलेल्या मायेसाठी !

## लेखानुक्रम


दोन शब्द । ५

१ शब्द । ७

२ नर्मदेच्या परिसरात १–२ । १३

३ शरनीरा ते वाण । २५

४ वृक्ष वल्ली आम्हां सोयरी ! । ३०

५ पळस ! । ३६

६ गुलमोहोर ! । ४०

७ माती, कुंडी आणि कृष्णकमळ ! । ४४

८ वरातीचं संगीत ! । ४७

९ बासरी । ५४

१० पाच शतकांनंतरचे आकाश ! । ५९

११ आश्विनीमृग ! । ६३

१२ आषाढ–भैरवी ! । ६७

१३ ये रे घना ! ये रे घना ! ! । ७२

१४ पर्जन्यराज येतो आहे ! । ७६

१५ मी, इतिहास आणि ऐतिहासिक सत्य ! । ७९

१६ स्वप्नावरून जेव्हा हत्ती झुलत जातात… । ८३

१७ मोनॅड १–२ ।


---


आभार : युगवाणी युवाजल्लोष वसंत पैंजण रजधूळ नागपूर पत्रिका मनोरा साप्ताहिक तरुण भारत, नागपूर, तरुण भारत मुंबई, तरुण भारत : बेळगाव लोकमत आकाशवाणी नागपूर

# दोन शब्द

मराठी सारस्वताचा महावृक्ष अनेक शाखोपशाखांनी बहरत आहे, फुलत-फळत आहे, याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. चालू शतकाच्या उत्तरार्धात कादंबरी, कथाकाव्य, आत्मचरित्रे यांबरोबरच ललित गद्यालाही नियतकालिके आवर्जून प्रसिद्धी देत आहेत. एवंच काही नियतकालिकांचे अग्रलेखसुद्धा ललित लेखांच्या वळणाने जात आहेत, ही खरोखरच समाधानाची गोष्ट आहे. समाधानाची आणि अभिनंदनीय !

वाङ्मयीन प्रवृत्तीच्या दृष्टीने ललित निबंध, लघुनिबंध, ललित लेख, ललितिका (प्रा. द. भि. कुलकर्णी यांचा शब्द) या विविध शीर्षकांखाली अपेक्षित असलेले जे लिखाण असे, ते परंपरामुक्त नव्हते. या ना त्या प्रकारे पूर्वसुरींचा प्रभाव या लिखाणावर असे. आज ही बंधने तोडून लघुनिबंध ( Pensonal Essay ) या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप आणि क्षेत्र पार बदलून गेले आहे. कालचा लघुनिबंध आज सर्वसमावेशक झाला आहे; त्यामुळे 'लघुनिबंध' म्हणून असलेली त्याची व्याप्ती अतिशय तोकडी वाटते.

१९६० पासून, अन्य वाङ्मयप्रकारांप्रमाणेच हा ललितबंध भाषा, शैली आणि आशयासह समृद्ध होत चालला आहे. प्रवासवर्णनापासून तो मुक्त चिंतनापर्यंत विविध प्रवृत्तींचे लिखाण आज लघुनिबंधाच्या मंडपाखाली सन्मानाने येऊन बसले आहे. त्यातच कथा नि लघुनिबंध यांच्या सीमारेषाही परस्परांत मिसळून एकजीव झालेल्या आहेत. प्रस्तुत संग्रहातील मोनॅड हा ललित लेख त्या वळणाचा; म्हणून त्याचा अंतर्भाव या ललित गद्यात करण्यात आला आहे. अशा लिखाणात चिंतनाचा अपरिहार्य प्रवाह मिसळून या वाङ्मयप्रकारातील 'खुसखुशीतपणा' कमी होत जाऊन त्याला अनेक परींनी गांभीर्य प्राप्त होते. निसर्ग हा या ललित गद्याच्या विहरण्याचे मुक्तांगण ठरते.

१९७६ ते १९८८ हा एक तपाचा हा कालावधी. त्यातून काय वेचायचे, काय सोडावयाचे असा कूटप्रश्न प्रसिद्ध झालेल्या पाचपन्नास ललित लेखांबाबत माझ्यापुढे होता.

या सर्व लेखांचे योग्य सर्वेक्षण करून झाल्यावर मला असे आढळून आले की, प्रवासवर्णनपर लेखांचा एक ' भ्रमणकक्ष ' तयार होऊ शकतो. याप्रमाणे ऋतूविषयक लिखाणाचा ' ऋतुपक्ष, ' वृक्षविषयक लिखाणाचा ' वृक्षपंथ, ' संगीतविषयक लेखनाचा ' सूर–संवाद ' तर आत्मचिंतनपर लेखनाचा ' आत्मसंवाद ! '

– आणि आजच्या लघुनिबंध श्रेणीत – या समग्र लेखनाचा As a whole एक मोनॅड निर्माण होतो आहे; त्यामुळे आपापतःच ही आपली वेगवेगळी वैशिष्टये दर्शविणारी स्वतंत्र दालने निर्माण झाली आहेत. या ललित गद्यातील एकच लेख दालनावेगळा राहिला – शब्द ! म्हणून मी ' शब्द 'च शीर्षस्थानी ठेवला.

ललित गद्याची समग्र व्याख्या आणि व्याप्ती सामावून घेणारे हे गद्य आहे, या भ्रमात मी नाही. बदलत्या काळाचा, काळाबरोबर बदलणाऱ्या आशयविषयांचा कितीतरी हिशेब अजून चुकता व्हायचा असेल. काही ठळक आकड्यांची ही फक्त गोळाबेरीज.

अस्मानाला लाथा मारणाऱ्या या महर्गतेच्या काळात नि कागदटंचाईच्या विवंचनेत असतानाही ' प्रचार प्रकाशना 'च्या सौ. नंदिनीताई गवळी, मार्गदर्शक श्री. टी. ए. गवळी आणि प्रशांत गवळी यांनी व्यावसायिक दृष्टीने न पेलवणारे ' ललित गद्य ' प्रकाशनाचे हे अस्मासाहस केले.

गवळीत्रयींचे ऋण मान्य न करणे कृतघ्नपणाचे ठरेल.

– राम देशमुख

' संजीवन '
३०, जि. प. क. कॉलनी
अमरावती ४४४ ६०४

354.6 निबंध
२९९३८
२५५९३

# १ शब्द !

सालोमन ग्रँडी कवितेविषयी तिनं मला परवा विचारलं – अगदी एकांतात विचारलं, ' सालोमनातल्या ' ख्रिश्चन्ड ' शब्दाचा अर्थ काय देतोस रे ? '

मी म्हणालो, ' का ? या शब्दावर अडण्यासारखं विशेष काय आहे ? '

' आहे म्हणून तर ! माझी खात्री आहे, एकाही व्यवसायबंधूने आजवर या शब्दाची नीट फोड करून शिकविलेलं नाही. कवितेचा नुसता न्हिदम पाहिला न् वेळ मारून नेली. तू तरी प्रामाणिक आहेस का ? स्वतःशी, स्वतःच्या विद्यार्थ्यांशी ?'

' तुझ्या मनात शंका का पण यावी ? दरवर्षी या शब्दाचा ऊहापोह करताना प्रथम मी धर्माची कल्पना देत असतो. जसे हिंदू, मुस्लिम, जैन, पारशी आणि ख्रिश्चन. पुढं धर्मातील वेगळाले विधी म्हणजे हिंदूंचा विधी जसा उपनयन, मुस्लिम बंधू मुलगा आठ वर्षांचा झाल्यावर ' बिस्मिला ' करतात, तसं ख्रिश्चन ' बाप्तिस्मा ' देतात. या विधीला अनुसरून ' ख्रिश्चन्ड ' या शब्दाची कवितेत योजना आहे. '

स्वतःहून जवळ येत, कौतुकानं माझ्याकडं बघत ती म्हणते, ' तू बाई खरंच विद्वान आहेस; पण... पण इंग्रजी पहिलीतल्या विद्यार्थ्यांना हे प्रकरण जरा जडच नाही का रे ?'

' पाठ्यपुस्तक निर्मितीमंडळाला पत्र टाकून विचारावयाला हवं. '

शाळकरी विद्यार्थी आदर्श वाचनाच्या निमित्तेकरून नकळत शब्दहिंसा कशी करतात, हे जावे गुरुवंशा तेव्हाची कळे ! विशेषतः प्राथमिक पातळीवर असले अनुभव विशेष रंजक, रोचक नि उद्‌बोधकही होतात. अशाच एका ' आदर्श

वाचना 'त एका विद्यार्थिनीने ' खालोखाल 'ची ' खोलम्खाल ' केली. कर्नाटकाला ' कर्नाक्टा ' म्हटले. प्रदेशाला ' परदेस ' केले. मालदांडी हा ज्वारीचा एक प्रकार आहे; तर तो जवाचा प्रदेश आहे असा जावईशोध आमच्या विद्यार्थ्यांनी लावून टाकला !

शब्द बालकांचीच फसवणूक करतात अशी तुमची कल्पना आहे का ? असेल तर ती साफ चुकीची आहे. शब्द बालकांची फसवणूक करतात, बालकांच्या पालकांचीही करतात आणि, आणि होय, अध्यापकांचीसुद्धा ! एक सांगू ? मजेदार नि बोधप्रद अनुभव आहे. मागे अचलपूर येथे विदर्भ साहित्य संघाच्या वतीने साहित्य संमेलन भरले होते. एका कविशिरोमणीनी सभामंडपाच्या एका महाद्वारास ' भवभूति–द्वार ' ही संज्ञा वाचून मलाच पृच्छा केली होती, ' हा भवभूती आपल्या कविसंमेलनास अजून कसा नाही आला मग ?'

इंग्रजी वाचताना शब्द–संदर्भात मीही अनेकदा फसलेलो आहे. अशा वाचनाला नाही म्हटले तरी ' समदर्शी ' म्हणता येते. उदा. Pottery ची Poetry झाल्यामुळं दोन्ही कलाप्रकारांना समान दर्जा मिळून जातो ! The South Princes, Supra Nakha हा शब्द ' दि साऊथ प्रिन्सेस सर्प–नखा ' असा वाचल्यामुळे शूर्पणखेच्या महाकवी वाल्मीकीने केलेल्या वर्णनात राहून गेलेली त्रुटी आपोआप भरून निघते. शब्दांच्या अशा हरकती चकमा देणाऱ्या खऱ्या; परंतु त्यामुळे नकळत मानवी स्वभावाचे सम्यक्–दर्शन घडून जाते. उदात्तीकरण मुद्दाम असे करावे लागत नाही. ' सुमीरण ' म्हणजे ' समीरण ' नसून ' स्मरण ' होय, हे सत्य आशयाच्या काठाकाठाने हिंडताना सहज ध्यानी येते.

पृथ्वीचे एकेक अक्षवृत्त क्रमशः सूर्यासमोर येऊन ' स्थानिक ' वेळ निश्चित व्हावी त्याप्रमाणे अंधारलेले शब्द प्रकाशमय होत जातात. प्रसंगवशात् माणसं अशीच आकलनकक्षेत येत जातात. मग आपले आपल्यालाच वाटते, ' अरे ! या शब्दाविषयी, या माणसाविषयी, केवढे अंधारात होतो आपण ! '

इंग्रजी वृत्तपत्रांतून गेल्या काही दिवसांत Deoraj Urs या नावाला एक पर्युत्सुकता होती. मी मनातल्या मनात पेपर वाचतो म्हणून बरे आहे; नाहीतर ' देवराज अर्स ' हे नाव मी ' देवराज उर्स ' असे वाचत आलो आहे, हे जर कुणास कळले असते तर ? इंग्रजीत माझे अजूनही असे बऱ्याचदा घोटाळे होतात. Wednesday चेच पाहा ना ! शाळेत असताना चिपळूणकर सरानी एक मंत्र दिला होता की, स्पेलिंगप्रमाणे उच्चार केला की असे घोटाळे होणार नाहीत. या शिदोरीच्या भरवशावर मी सालोमन ग्रँडी, बॉर्न ऑन मंडे, ख्रिश्चन्ड ऑन च्युस्डे, मॅरीड ऑन वेड्नेस–डे असे उच्चारण विद्यार्थ्यांना दिले, तर शाळा–तपासनिसांनी

स्पष्ट शब्दांत शेऱ्यात लिहून टाकलं की, Wednesday या शब्दाविषयी शिक्षकाची काहीतरी गल्लत दिसून येते. वेन्सडे असा उच्चार करण्याऐवजी चाळीस जिव्हा वेड्नेस–डे असा चुकीचा उच्चार ज्या अर्थी घडाघड म्हणतात... '

बरीच वर्षे मी 'सॉमरसेट मॉम'ला 'सॉमरशेठ मोघम' म्हणत असे. झेकोस्लोव्हाकिया, सोल्झेनित्सन, शॉपेन-हॉवर या शब्दांचे स्पेलिंग आजही आत्मविश्वासाने मला सांगता येत नाही. एका ज्युनिअर इंजिनिअर असलेल्या कवी मित्राशी 'तुम्ही तरी या शब्दांचे अचूक स्पेलिंग लिहून दाखवा; आपण एक पूर्ण बोतल नि नॉनव्हेज देऊ तुम्हाला.' अशी पैज बांधली. तर... तर काय ? आपणच जिंकलो !

म्हणजे काय की, 'आपल्याला अमूक शब्दाचं स्पेलिंग येत नाही,' ह्याची सार्वजनिक कबुली आपण प्रामाणिकपणे देतो. इतर ती देत नाहीत; असे आहे. मला पैज जिंकल्यावद्दल जे समाधान वाटले, त्यापेक्षा आपल्याला जे येत नाही, ते येते आहे असा आभास निर्मिणाऱ्या या तथाकथित विद्वानाविषयी सहानुभूती वाटली ! महाकवी गटेविषयी खूप ऐकले आहे. 'Goethe' असे त्याच्या नावाचे स्पेलिंग. सुभाषितासारख्या वाक्यांशाखाली 'गोएथे' असे त्याच्या नावाचे स्पेलिंग वाचून मी त्याला 'असेल कुणी गोएथे नावाचा तत्त्वज्ञ, विचारवंत' इ. समजत आलो आहे. परवा–परवापर्यंत गोएथे म्हणजे गटेच हे मला माहीत नव्हते. ही धारणा पक्की झाल्यावर मी निर्धास्त झालो; तोच एक उतारा माझ्या वाचनात आला नि पुन्हा गोंधळात पडलो. उतारा असा :

' योहान वोल्फगांग फोन गोएथे (१७४९–१८३२)

' अमुक एक उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्न करण्यापेक्षा केवळ आपल्यातील उदात्त शक्तींना प्रकट करण्यासाठी मनसोक्तपणे, यथेच्छपणे व स्वच्छंदाने जगत राहावे... '

या उदाहरणाने माझे धाडस चांगलेच वाढले. ज्ञानमहर्षी 'कांट'ला आता मी बिनदिक्कतपणे कांत म्हणू लागलो; एवंच बेनेदेत्तो क्रोचे या इटालियन तत्त्वज्ञाच्या नावाची फिल्म–स्टार मरहूम गुरुदत्तशी सांगड घालू लागलो !

इंग्रजी शब्दांबाबत आपलेच तेवढे असे होते, असे नाही हे समजल्यापासून मला गार झोप येते आहे. एवंच परकीयांनासुद्धा एतद्देशीयांच्या शब्दातील आशय पूर्णांशाने स्वभाषेत मांडता न आल्यामुळे त्यांनीही असे भरपूर घोटाळे करून ठेवले आहेत. नाहीतर 'तीर्थ' या शब्दाला प्रतिशब्द म्हणून Holy–Water असा शब्दप्रयोग ते करते ना ? Heat cannot understand heat हेही खरे !

' शिक्षणात लैंगिक शिक्षणाला स्थान असावे की नसावे ' हा परिसंवादीय प्रश्न ' चित्रपटात चुंबनविधी दाखवावा की दाखवू नये ' या प्रश्नाइतकाच आजवर सविस्तर चर्चिला गेला आहे. प्रश्नाचे गांभीर्य ध्यानी घेता ते एकापरीने साहजिकही आहे. नैतिकतेच्या कसोटीवर कुठल्याही प्रश्नांची शहानिशा झाल्यावरच त्यांना परिणामाचे स्वरूप प्राप्त होते. शब्दांना चलनी नाण्याचे स्वरूप प्राप्त होत असते.

Our Oriental Heritage या ग्रंथात विल् ड्यूरांट यानी नैतिकतेची जी व्याख्या दिली आहे, ती इथे उद्धृत करण्यासारखी आहे.

' Morality is the co-operation of the part with the whole ' अशी ती व्याख्या. एकमेवाद्वितीय अशा पूर्णत्वाचा एक अंश म्हणजे नैतिकता. पुष्कळदा शब्दांचे पर्सेप्शन भाषाशास्त्रापेक्षा आकडेशास्त्रातून अधिक चांगले येते, असा कित्येकांचा अनुभव असेल. ' एखाद्या अपूर्णांकाचे पूर्णांकाबरोबर असलेले साहचर्य म्हणजे नैतिकता. ' उदा. सात पूर्णांक तीन चतुर्थांश. ह्यात सात हा पूर्णांक म्हणजे पूर्ण पुरुष. याबरोबर साहचर्य आहे तीन चतुर्थांश या अपूर्णांकाचे. म्हणजे तीन चतुर्थांश हा अपूर्णांक अर्धपुरुष अधिक सात पूर्णांक मिळून नैतिकता, मोरालिटी वगैरे.

शब्दांना मांजरीच्या गोंडस पिल्लांसारखे आंजारीत-गोंजारीत राहावे. वाक्यांना अर्थप्रवाहित्व प्राप्त झाल्यामुळे त्यांचे सौंदर्य उलगडवून दाखविण्याचा मोह आवरता येणे शक्य होत नाही.

शब्दांना नाद असतो. शब्द साद घालतात – हृदयाला. शब्द फुलांप्रमाणे सुगंध उधळतात; अर्थवलये घनदाट करीत करीत अचानक एखाद्या उद्बोधक वाक्यपुंजास जन्म देऊन जातात. सुभाषितांप्रमाणे असे भाग्याचे क्षण फार थोड्यांना गवसतात. 'Where food is dear, life is cheap ' हे असेच एक वाक्य.'अन्नाची जिथं महर्गता असते, तिथं जीवन स्वस्त असतं,' या सरळसोट भाषांतरामुळे माझी मलाच लाज वाटते, तेव्हा राष्ट्रभाषेचा आश्रय घेऊन मी म्हणतो –

' जहाँ अनाज महँगा होता है, वहाँ जिंदगी सस्ती होती है । '

राष्ट्रभाषेला आमच्या जीवनात स्थान का द्यावं, ह्या प्रश्नाचं उत्तर हे साधं भाषांतरही देऊ शकतं, नाही का ? विश्वसंस्कृतीच्या अफाट महासागरातून मला अशी कितीतरी शब्द–मौक्तिके जाणवली. शब्दांना चेहरे असतात, हे तेव्हा कळले ! चेहरे ! कधी आदिम स्वरूप धारण करणारे, कुठं प्रागैतिहासिक व्यथा बोलू लागलेले – धर्म – अर्थ – काम आणि मोक्ष या चारी पुरुषार्थांचे विवरण, उदेपण आणि संकलनात्मक स्वरूप म्हणजेच संस्कृती – वैश्विक संस्कृती.

शब्द क्रियाशील बनल्यावर काय करू शकणार नाहीत ? ते क्रांती घडवू शकतात, उत्क्रांती घडवून आणू शकतात, रक्तलांच्छित क्रांतीही ते घडवितात, अनर्थही निर्माण करतात.

पृथ्वी गोल आहे नि ती पश्चिमेकडून पूर्वेकडे सतत परिक्रमा करीत असते, हे भौगोलिक सत्य काही खोटे नाही !

शब्दांचंही कसं असतं पाहा. दलितांच्या सहानुभूतीपोटी महार, मांग, चांभारादी निम्नस्तरीय शब्दांना राष्ट्रपिता म. गांधींनी फिल्टर करून घेतल्यामुळे महार–मांगांचे ' हरिजन ' झाले ! पण व्यर्थ. बदलत्या कांक्षा आणि अस्मितेच्या नव्या जाणिवांतून शब्द गोठविण्याची ही प्रक्रिया कालबाह्य ठरली. आंबेडकरपंथी दलित युवक ' हरीचे लाल ' होणे मानीत नाहीत, तर ' हरिजन ' शब्दाला अर्थ उरतोच कुठे ?

शब्दांना कालच्या प्रेरणा आज घडवू शकत नाहीत. म्हणजे शब्दांचे ऐतिहासिक चांगुलपण सार्वकालिक असेलच असे नाही. काल दोन बोटांच्या चिमटीत दाबून अस्पृश्यतेचा काटा काढण्याचा जो प्रयोग झाला, त्यालाच आज नाकारून ' काट्याने काटा ' काढण्याची बोली रूढ होऊ पाहत आहे आणि ह्यात गैर असे काय आहे ? कटुत्व सौम्य, मिळमिळीत शब्दांनी घालविता येणे शक्य नाही. शब्दनागांचे डंख रक्तपीतीने सडलेल्या शरीरावर लाभदायक होऊ शकतात. हळुवार फुंकरींनी तोंड दुखेल, जखमा बऱ्या होणार नाहीत. त्यासाठी विषारी शब्दांचीच मात्रा लागू पडते.

निषादाने क्रौंचवध केल्यावर महामुनी वाल्मीकीच्या मुखावाटे ' मा निषाद...' अशी जी शापवाणी बाहेर पडली, तिला अलौकिक वाङ्मयाचे स्वरूप प्राप्त झाले, हा केवळ शब्दयोग. शब्दाने शब्द वाढतो म्हणतात – चांगल्या नि वाईट, उभयार्थाने. अल्बर्ट कामूच्या L. Home Revolt मुळे उद्भवलेला सार्त्र–कामू वाद चांगलाच गाजला. ही शब्दाशब्दी कित्येक दिवस चालली नि त्यातूनच ' वादे वादे जायते तत्त्वबोधः ' या न्यायाने साहित्याचे काही मापदंड निर्माण झाले. मराठीपुरतेच बोलायचे तर फडके–अत्रे, फडके–माडखोलकर या वादांचे उदाहरण घेऊन असे म्हणता येईल. अखेर शब्द म्हणजे नुसते दुधारी शस्त्र नाही, ती संजीवनी आहे. शब्दप्रामाण्य ही एक तपस्या आहे, तजवीज आहे ! सिमेन–डी–ब्ल्युहोर या लेखिकेने कामू–सार्त्र वादावर Les Mandarnis ही कादंबरी लिहून या वादाला अक्षर-वाङ्मयाचे स्वरूप दिले. या लेखिकेच्या मते – The quarrel one of the major events of the French literary world since the war, is more important for the principles involved than for the quality of the arguments.

वादस्वरूप न पाहता वादाची गुणवत्ता पाहिली तरी परिणामाच्या दृष्टीने अक्षयिनी होऊ शकते. कामू-सार्त्रे वादातील हे निखळ सत्त्व. माणसं संपली. शब्द निनादत राहिले. शब्द अमर आहेत. हनुमंताप्रमाणे यावच्चंद्रदिवाकरो चिरतरुण आहेत. त्यांची व्याप्ती सर्वंकष आहे. म्हशीच्या पाठीवरील जंतूपासून तो तहत विश्वात्म ब्रह्मापर्यंत !

शब्द ? – ब्रह्माची पावलं
शब्दांना अर्थ ? शब्दांनीच.
शब्द आणि महाशब्द. गुलाम शब्द, स्वतंत्र शब्द.
काही शब्दांकरिता शब्द, काही स्वयंप्रकाशित –
परप्रकाशित छंदासारखे काही.
विव्हल शब्द, एक अंश परमशब्दाचा.
शब्द म्हणजे जंतू म्हशीच्या पाठीवरील जखमेतला.
अर्थाचे समुद्र हावरटागत न्याहाळीत
शब्द घेता येतात वांझोटचा झिंगेत
किनाऱ्यापासून चोरून –
काळचा कमाईसारखे उधळताही येतात
'महालक्ष्मी 'वरून...

तरुण भारत, नागपूर, : ९ जुलै, ७८

# २ नर्मदेच्या परिसरात

– १ –

मिलनोत्सुक होऊन आपापल्या प्रियकरांकडे अस्तित्वसमर्पणासाठी निघालेल्या दोन बहिणी. प्रत्येकीचे स्वतंत्र असे जग. वेगळा संसार. वेगळी अपत्ये; पण तरीही या भगिनींचे जीवन समांतर धावते. दोघींमध्ये एक साधारण भावबंध आहे. तापी सातपुड्याची लेक, तर नर्मदा विंध्याद्रीची ! सातपुडा न् विंध्याद्री सख्खे भाऊ. तशा या त्यांच्या दोन कन्यका तापी न् नर्मदा. या दोन्ही भगिनींच्या कडेखांद्यांवरून फुलत गेलेल्या जीवनाला एकच किनार आहे, एकच रूप आहे, एकच उद्‌गार आहे !

गोंडवन हा नर्मदा–तापीच्या जीवनाचा अर्थात पाण्याचा आदिम आविष्कार. या आविष्कारात वास्तवता आहे किंवा ओरिजिनॅलिटी आहे. हे पाणी अजून कुठल्याही मोहाने गढूळलेले नाही.

नर्मदेच्या परिसरात मुक्तपणे संचार करताना हृदय ओलेचिंब झाले. प्रत्यक्ष नर्मदेशी अजून भेट होत नव्हती. ओठांवर उमाळून शब्द आले –

‘ भटक–भटक भटकलो, पण नर्मदा कुठे दिसलीच नाही,
क्षितीजरेघ ओढून निघालो, पण काळ कधी सरलाच नाही. ’

ॐकारेश्वरच्या परिसरात नर्मदेचे दिव्य दर्शन झाले. त्याच वेळी तिचे विंध्य आणि सातपुडा यांच्याशी असलेले नाते स्पष्टपणे कळले. नर्मदा खरोखरच कुणाची ? विंध्याद्रीची की सातपुड्याची ?

ॐकाराच्या आकारातील नर्मदामाईच्या या वाहण्याने इथे जगाला परखडपणे बजावून सांगितले आहे की, ‘ वेड्यांनो ! प्रादेशिकतेची संकुचित भावना तुमच्या

सोयीसाठी आहे. सोय पाहता पाहता तुम्ही स्वार्थी बनत असता. मनाने करंटे होत जाता. अमरकंटकातून जन्म घेतला म्हणून मी काही एकटचा विंध्याद्रीची नाही. विंध्याद्री माझ्या उत्तरस्कंधी असेल, तर दक्षिणस्कंधाला सातपुडाही असेल, एवढी जाणीव असू द्या ! ' तर एकदाची नर्मदा मला भेटली होती. या दर्शनसोहळचाने मन उदात्त झाले. वाटलं, शरीरानं केलेली आजवरची लहानमोठी पापं या पाण्यानं धुऊन निघाली. आपल्याला एक नवा जन्म यानंतर लाभतो आहे. ही प्रत्यय-कारिता शब्दातीत आहे. आता भावनाप्रधान मनाची श्रद्धाशीलता म्हणून कुणी या प्रत्ययकारितेची संभावना करील, नाही असे नाही; पण या आंतरिक श्रद्धेचा नर्मदेच्या भौतिक पाण्याशी जो ऋणानुबंध प्रस्थापित झाला आणि त्यातून एका वेगळचा भौगोलिक सत्याचे जे दर्शन नर्मदेने घडविले, ते या जन्मी तरी मला विसरता येण्यासारखे नाही. अखेर अनंत काणेकर म्हणतात तेच खरं. ' सारी वैज्ञानिक आणि आध्यात्मिक प्रगती परस्परविरोधक नसून परस्परपूरक आहे. ' मूल्यांची एकात्मता निसर्ग आपल्या वर्तनक्रमातून पटवून देत असतो; पण डोळे, अंतःकरण आणि प्रज्ञा यांच्या विसंगत जाणिवांतून या नैसर्गिक एकात्मतेला तडे गेलेले आपण पाहतो, तर हा दोष कुणाचा ?

ॐकारेश्वरास नर्मदेला मिळणारी तिची जी उपनदी आहे, तिला ' कवेरी ' म्हणतात. कवेरी एकदा पूर्वेस, तर एकदा पश्चिमेस नर्मदेला भेटते. त्यामुळे दोन मेळ वा संगम इथे झालेले आढळतात. एक पूर्ववाहिनी तर दुसरा पश्चिमेचा संगम. परिक्रमेचे पुरते फळ पदरात पाडून घेण्यासाठी या परिक्रमा–मार्गावरील संगमात सुस्नात होणेही तितकेच आवश्यक आहे. मला पोहायला येत नाही. प्रल्हाद-मामालाही नाही. सबब, एका पंधरा फुटी डोंगीतून आम्ही शिवपुरी, ब्रह्मपुरी व विष्णुपुरीच्या सीमांवरून फेरफटका मारून यावयाचे ठरविले. परिक्रमा नावेतूनही करता येते; पण असली परिक्रमा ही ' पांढरपेशी परिक्रमा ' झाली. त्यापेक्षा घरून ॐकारेश्वरास हात जोडणं काय वाईट ? माझा हा विचार प्रल्हादमामांनाही पटला व नावेच्या पांगुळगाडचातूनच का होईना – केलेल्या जलविहारानंतर डोंगरकपाऱ्यांतून गेलेल्या ५–६ मैल लांबीच्या या परिक्रमामार्गातून भर उन्हात पायपीट करावयाचे आम्ही ठरविले.

डोंगीत बसून नर्मदामाईच्या अंगाखांद्यावर खेळण्याची, तिच्या अथांग हृदयात संचार करण्याची ही एक नामी संधी असते. गंगा, यमुना किंवा पंढपूरच्या भीमा चंद्रभागेतून केलेल्या जलविहारापेक्षा नर्मदेचा जलविहार हा एक वेगळा, अपूर्व अनुभव आहे, असे आपले मला उगीचच वाटले. कदाचित ते नर्मदेच्या प्रेमापोटीही असेल. नर्मदेचे फिकट, हिरवट आणि खोल पाणी... आणि त्यावरून हेलकावे खात चाललेली आमची जीवननौका ! खरोखरच या पाण्यात शिरले म्हणजे पाणी हे

जीवनावरचे की जीवन हे पाण्यावरचे रूपक आहे, हेच कळत नाही. पुढच्या टोकाला नावाडी फावड्याच्या आकाराच्या हलक्या लाकडी वल्ह्यानं पाणी सारतोय. मागच्या अंगानं पाण्याशी धीट ओळख असलेली त्याची दहा–बारा वर्षांची चिमुरडी पाणी सारतेय वल्ह्यानं. मला तिचं आश्चर्य वाटतं. नावाड्याला न राहवून मी विचारतो, ' क्यों भैया ? यह लडकी भी तैरना जानती है क्या ? '

' जी हाँ साब ! ' तो हसून म्हणतो, ' नर्मदा की छोरा–छोरी और तैरना न जाने ? ये कैसे हो सकता है ? '

मी वरमलो. दुर्लक्ष करून भोवताल न्याहाळू लागलो तर काय, आम्हालाही दोन्ही तीरांवरून कुणीतरी न्याहाळत होतं तर ! कोण होतं ते ? नावेला एक हेलपाटा बसला... एका प्रचंड लाटेवर सारी नौका थरारली ! वाटलं, नाव उपडी होतेय् की काय ! नावेत पाणीदेखील शिरू लागलं. मघाच्या त्या चिमुरडीनं बेटा-सारख्या मध्येच आलेल्या दगडी चबुतऱ्याच्या आधाराने वल्ह्याच्या दुसऱ्या टोकावर दाब देऊन नाव सारखी करून घेतली. नावेला छिद्रं पडलीयेत म्हणून कुरकुरणार आम्ही ? भीती – मरणाची भीती फक्त आम्हाला ? त्यांची प्रत्यक्ष मृत्यूशी प्रत्येक दिवशी झुंज चाललेली. पाणी पूर्ववत स्थिर होतं. मागूनपुढून पाण्यावर वल्ही पडत असतात. किनाऱ्या–किनाऱ्याने लालसर, पिंगट सलग दगडांच्या केवढ्या मोठ-मोठ्याला चळती ! दोन्ही तीरांवरून विंध्य–सातपुड्याच्या कौसुमी, साग इ. जंगली वृक्षांनी वेष्टिलेल्या सरळसोट उत्तुंग रांगा... आणि या उभय रांगांतून आडवीतिडवी यथेच्छ वाहणारी नर्मदा ! आपण इकडे नर्मदेच्या अंगावर हिंदकळत असताना दोन्ही तीरांवरून सारा नागाधिराज आपली गंमत पाहत असतो. मिस्किल-पणे हसत असतो. किनाऱ्यालगतच्या पोखरलेल्या दगडांच्या फटीत पाणी शिरून त्याचा चबक् चबक् असा आवाज होतो तेवढाच ! बाकी सारे कसे अगदी अथांग, शांत. किनाऱ्याला नाव लागेपर्यंत आपला तर अगदी उंदीर होऊन गेला होता, हे प्रामाणिकपणे मान्य केलेच पाहिजे.

ब्रह्मपुरी, विष्णुपुरी आणि शिवपुरी या ' तिन्ही लोकां 'तून आम्ही परिक्रमा करून आलो, तेव्हा कुठे नर्मदादर्शनाचा पुरेपूर आनंद उपभोगल्याचे समाधान लाभले. ' ब्रह्मपुरी ' हा इतर ' पुरीं 'च्या मानाने आधुनिक भाग वाटतो. मंदिर-प्रवेशाच्या वेळीच एका भिंतीत संगमरवरी दगडात कोरलेली अक्षरे दिसली, ' महाराजा होलकर, इंदौर स्टेट. ' अर्थात इंदूर संस्थानच्या कुठल्या राजाने हे मंदिर बांधले याचा खुलासा बाजूच्याच शिलालेखात असावासे वाटते. ' असावासे ' म्हणण्याचे कारण असे की, ही लिपी शुद्ध देवनागरी नाही. हा शिलालेख चार-पाच शतकांपूर्वीचा असल्याचे बोलले जाते. त्यातील लिपी जशी गवसली तशी शब्दांकित

करीत आहे. या शिलालेखातील आरंभीचा काही भाग पुसट किंवा शब्दसंभ्रम निर्माण करणारा वाटल्यामुळे तो गाळून देत आहे. बाकी शिलालेख असा आहे :

' माना प्रसूतं करल जाबुवंत श्रीकर्णनृपात्मज पपराग: श्री मैंतगासिंहवासिसह: सिंहासने छत्रवनिप्रतापीधर्मात्मा धृकाशीलोधवलित कुंकुजाकिर्तीस्मैपै प्रशस्ता शास्तावार्ध्याबिरायाश्चतुरधिक तमाशी तिकोहाधिनाथ शोदवश्याखिल धरणितृतांजु जूताक्षत्रियणानम: मोलीमौली पुस्तकत्रगतविलश्रीऽ जगात्सियाराम एकदादानवर्षी यशमुद्दिक्षहरा । लयदिदक्षु: समगात्रनमो । धानासमुपासित । तंत्रह: ष्ट्रानंदीरम्यारे वाचामरकंटक । तत्राकार:श्चरराणा: प्रसन्नमनसाजमौ । श्रोमतुकस्पपरेपरा समये वैवस्वत: चांतरेवात् विशंतामे कलौयुगवरै श्रीविक्रमाकदिनु वेक्षोम १७०४ हयेंदुवत्सरवरे माधानृपे पत्रने वी ज्त्र । पायनगोत्र वंश तिलक: श्रीराणवंशाएव. मुक्तारभ सुवर्णमिश्रीत: महा: पुजैमुल्लावाकरोत । कर्णस्पात्मज: एषदर्शषंत शोसिया-दिगंत दशणायतश्चघान्मग एंतिव्रह्ममुनव: प्रज्ञाप्रसोऽवा । किर्तीबंदीजनांरण किर्तीज बांदानो वांचेता मा स्माताठेऽ सितेपक्षे: उक्वा मंगलवासेर रविपर्वं गिरीन्नर्ध सुवर्णेश्चकरोतुलां । प्रशस्तिक्रियतोवयंतो रणेनुलो ज्ञ व जान्वाशसूत्रधासूत्रधारस्य: मुकुंदेनलचलुनुन: प्रवोली कला सुतप वोली अुरजणजित घुगारत सूत्रधारमुकूप सूत्ररजज धर: ।। श्रीस्तु ।। '

– तर असा हा शिलालेख वहीच्या पानावर उतरून घेत असताना अक्षरश: दमछाक झाली. नुकतीच मूळाक्षरे शिकायला निघालेल्या अर्भकासारखे आम्ही घामाघूम झालो. ' काहीच्या बाही ' वाचतोस म्हणून मी प्रल्हादमामावर चिडावं न् स्वत: शिलालेखावरून जिज्ञासेनं डोळे फिरवावे. निदान अक्षरप्रामाणिक तरी राहता यावं, अशी इच्छा. पण कसचं काय ! आधीच अक्षरांनी डोळे ताणताणून फाटलेले – अर्थ-अनर्थाच्या गोंधळानं माथं बध्थड झालेलं. तितक्यात एक पुरभैया येऊन अदबीनं विचारू लागला, ' बाबू साब ! आप लोग पत्रकार है क्या ? आप चाहते हो तो और भी ऐसी लिखावटवाले पत्थर ऊपरी भागमें भरे पडे हैं । आप चाहते है तो दिखा दूँ ?'

' लोडकं तुझं ! ' मी संतापानं उद्‌गारलो न् प्रल्हादमामाच्या पाठीवर थाप मारीत म्हटलं, ' आता आणखी अधिक थांबलो तर भुकेनं जीव उडून जाईल. या ब्रह्मपुरीतच मृत्यू येईल. त्यापेक्षा आधी पोटभर खाऊन घेऊ या. चल ! '

तर अक्षरे आणि अर्थाचे अन्वय लावण्याचे कार्य इतिहासज्ञ आणि भाषा-शास्त्रज्ञांसाठी सोडून आम्ही निघालो.

शिवपुरीत शंकराचे स्वयंभू लिंग आहे. या लिंगास पिवळाधमक सुवर्णाचा पत्रा दिला आहे. मुंबईच्या कुण्या सक्सेरियानं आपलं नाव या पत्र्यावर खोदून ठेवलं

आहे. आमच्या देशात दातृत्वाचं असं प्रदर्शन ठायी ठायी आढळतं. मूळचे स्वयंभू लिंग या सुवर्णाच्या पत्र्यानं झाकून आपले भांडार असेच सुवर्णाच्या गोळ्यांनी भरून जावे, अशी सूक्ष्म तृष्णा या धातूच्या तुकड्याने सूचित केली आहे. त्याऐवजी खडबडीत पाषाणाच्या लिंगाचे अकृत्रिम रूप कसे डोळ्यांत आले असते, अंतःकरणात भरून राहिले असते ! असो. एकूण एका बाजूनं ही शिवपुरी, दुसऱ्या बाजूला ब्रह्मपुरी न् खालच्या संगमाच्या अंगाने पायथ्याशी विष्णुपुरी. अल्याडपल्याड नर्मदामाईचे वाहणे - अर्थात ॐकाराकृती परिक्रमेचा मार्ग ॐकाराकृतीच. येथील मंदिराच्या रचनाही ॐकाराकृतीच. असे इथले सारे अस्तित्वच ॐकारमय असल्यामुळे बारा ज्योतिर्लिंगांपैकी ॐकारेश्वर हे एक अनन्यसाधारण. इथे नर्मदेला मिळणारी उपनदी कावेरी. स्थानिक भाषेत हा ' कवेरी ' असा शब्द असून त्याचा ' कुमारी ' असा अर्थ होतो. म्हणजे कुमारी ही नर्मदा नव्हे, तर कवेरी किंवा कावेरी हीच कुमारी. आख्यायिका आणि दंतकथांतून बिचाऱ्या नर्मदेवरच कुँवारपण लादलं गेलं आहे.

अर्थात खरं काय ते ॐकारेश्वराच ठाऊक ! आपण बोललो ते काही ऐतिहासिक सत्य नव्हे. तडवी जमातीच्या एका नर्मदापुत्रीनं दिलेलं हे स्टेटमेंट तुमच्यापर्यंत पोहोचतं करून, पुढच्या प्रवासाला आता निघायला हवं !

---

तरुण भारत, नागपूर : ऑगस्ट, १९७६

## – २ –

काल आणि आज ?

कालचे नवे आज जुने होते. आजचे नवे उद्या जुने होणार; परंतु अनुभवाची जात कधी जुनी होत नाही. त्यातून अनुभव पुनःप्रत्ययी असेल, आल्हादक असेल तर कालाच्या चौकटी त्याला बांधून ठेवू शकणार नाहीत. वर्ष संवत्सरांचे खडक फोडून अनुभवाचे झरे भूतकालाच्या वनप्रदेशातून वर्तमानाच्या सखोलतेकडे वाहत येतील.

अनुभवांचे असेच काही झरे. काही कॅस्केडस्. दृष्टिआड होत गेलेले काही चेहरे–मोहरे. जणू या चेहऱ्यांचेच ठसे आहेत ही संवत्सरे.

दि. २५ मे, १९७६. डायरीवर तारीख आहे. तारखेच्या वर इंग्रजी पत्ता आहे – माझ्याच हस्ताक्षरात – ' मि. गंगराडे, 1 जंगमपुरा, इंदौर. ' मि. गंगराडेंचा चेहराही आता आठवत नाही. कुठल्या तरी ऋणानुबंधामुळं चेहरे भेटतात. स्नेहाच्या बंधनात क्षणकाल बांधले जातात. पुनःपुन्हा भेटण्याचे वादे करून आपापल्या मार्गाने निघून जातात, पुन्हा कधीही न भेटण्यासाठी. आणखी पत्ते डायऱ्यांच्या पानांत

असेच दुर्लक्षित होऊन पडून राहतात. डॉ. रमेशचंद्र. ' गहाल ' या हर्दाजवळ असलेल्या आडवळणी खेड्यात हा माझा बालमित्र राहतो. त्याच्या घरी या चेहऱ्याची ओळख झाली होती

बारा वर्षे म्हणजे एक तप लोटले त्या गोष्टीला. अकोट–हर्दा–गहाल असा घोपट प्रवासयोग होता. मध्य प्रदेशाच्या हद्दीत प्रवेशताना गाडीतील जोडप्याचा संवाद कानांनी नकळत टिपला. डोळे मिटून बर्थवर पडून होतो, कान मात्र संवादातुर झालेले.

ती डुलकी घेत त्याच्या स्कंधी झुलत असते. मिटता मिटता डोळ्यांनी हेही टिपलं कदाचित म्हणूनच कान संभाषणातुर, सावध. काळ आणि स्थानके भराभर मागे पडतात. गर्द होत जाणाऱ्या काळोखात एखादे वीजदिव्यांचे गाव पापण्यांच्या आड बराच वेळ रेंगाळत राहते. काळ्या टरबुजातून चिरत जाणाऱ्या सुरीसारखी गाडी. खंडव्याच्या रोखाने. जराशानं ती डोळे उघडते. नीट सावरून बसते. केसांवरून हलकेच हात फिरवते. शेलाटी बांध्याची नि हसऱ्या डोळ्यांची ती नवपरिणिता त्याला पृच्छा करते, ' अशी कशी हो ही गाडी ? लहानसहान स्टेशन-वरती थांबतेय, आणखी वेळ खाते. '

' मीटर–गेजचा हा त्रास असतो. ' तो मीटर–गेजच्या दुनियेतील रुटीन सांगून जातो. अजमेर–खंडवा गाडीतील एका कुटुंबवत्सलेची चिंताही अशीच. भूतकाळाचा, मागे पडून गेलेल्या गावाचाच विचार करणारी, आपल्या माणसाला ती विचारते,

' एव्हाना नळ आला असेल बाई !'

' कुठे ?'

' इंदौरला. आपल्या घरी.

दि. २१ मे, १९७६. डायरीतील नोंद. म्हणजे तारखांचा क्रम बदललेला; पण कंटेन्ट तेच. संवेदना आणि अनुभवांचीही आद्यंताच्या संदर्भात अनेकदा अशीच गत होते. आरंभी कुरतडलेल्या स्पेसेस. पुढे हर्दा–रूट, खंडवा–इटार्शी आणि गाड्यांचे जुजबी आलेखन. प्लॅटफॉर्म क्र. २ वरून पॅसेंजर २ पी. एम., जनता एक्सप्रेस ६ ए. एम., पुन्हा पॅसेंजर १०–५०.

खंडवा. आज प्रातःकाली उठून शुचिर्भूत झालो. ' धुनीवाले बाबा 'च्या समाधीच्या दर्शनाला निघालो. शहराच्या पश्चिमेस, रस्त्यांचे जाळे तोडीत रिक्षा निघाला. समाधीमंदिराच्या आवारात आला. प्रशस्त मंडप. सभोवार अनेक देव-देवतांची छोटी-मोठी मंदिरे. समाधी मधोमध. पुढील बाजूस लगतच चौथरा.

चौथऱ्यावर धुनी. यज्ञवेदीसारखी. एकूण प्रपंचावर या, घुमटवजा आश्वासन. आच्छादन. धुनीत अष्टौप्रहर चंदनी लाकडे जळत आहेत. हा गंधधूप एक वातावरण-निर्मिती आहे. इथे एक घोष आहे. क्रेस्ट आहे एक या इथल्या समाधीची. सभोवारात ती निनादते आहे. ' दादाजी की जय बोलो ! हरिहरानंदजी की जय बोलो ! केशवानंदबाबा की जय बोलो ! '

चंदनी समिधांचा गंध सर्वदूर दरवळत असतो. ' बोलो दादाजी की जय बोलो, शिवजी की जय बोलो ! ' शब्द फेर धरीत असतात. टिपेत नगारा डिंडीमत असतो. आरतीनंतर प्रसाद होतो. प्रसाद घेऊन मी निघतोच.

देवालयाच्या परिसरातून पाय ' आत्मानंद भोजनालया 'ची वाटचाल करू लागतात. ' आत्मानंद भोजनालय ' हे नाव खरेच सर्वथा अन्वर्थक. नाहीतर महागाईच्या या दिवसांत सहा भाज्या, सुवासिक तांदळाचा भात, लोणचे–पापडादी समाहार द्वंद्वाचा भोजनव्यापार कोण करतो ? मध्य प्रदेशातली अन्नपूर्णा माफक दर घेऊन मनसोक्त आहार पुरविते. खराखुरा ' आत्मानंद ' यापेक्षा वेगळा असेलही ! पण पाहुण्यांची तृप्ती आपल्या रससिद्धीतून करण्यात मध्य प्रदेशाचे आपले असे एक वैशिष्टच आहे. आतिथ्य, नम्रता आणि स्नेहाचा मोहोळ म्हणजे नर्मदातीरावरची ही माणसं.

माणसांप्रमाणेच इथला प्रत्येक पदार्थही लोभस नि चवदार. खूप खूप लज्जतदार. ' खाईयो पान बनारसवाला ' अशी बनारसी पानाची ख्याती ! पण खंडव्याच्या ' बंगला ' पानाची चव काही औरच. बनारसचा पानवाला महागडं पान देईल; परंतु त्याबरोबर भांगेचा चषक देईल, असे नाही. तर एवंगुणविशिष्ट हे खंडव्याचे बंगला पान. महाराष्ट्रीय आपले सहोदर आहेत, ही जाणीव खंडव्याच्या पानपट्टीवाल्यालाही आहे. त्यामुळं आपले ' बेतुके ' प्रश्नही तो उमेटपणाने सोडून देत नाही. नाही तर बघा – ' क्यों भई, बरसो पहले ये शहर में अशोककुमार गांगुली याने की दादामुनी रहते थे न ? ' हा असाच एक विनाकारण प्रश्न. पानपट्टीवालाही उत्साहाने अंगुलिनिर्देश करून सांगतो, ' हां ! हां ! आप एक्टर अशोककुमार की ही बात कर रहे न ? देखिये, बैंक के पीछवाडे में उनका मकान अभी भी मौजूद है । '

खंडव्यात काही तास वास्तव्याला होतो. आतून उगाचच अस्वस्थ झालो होतो. ' आयेगा, आयेगा, आयेगा आनेवाला ' मधुबाला, तिची ती आशावादी प्रतीक्षा, ' महल ' चित्रपटातली. ते आवाहन करणारे गीत, सुहावने संगीत. अशोककुमारचे चढत्या सूर्यासारख्या करीअरचे ते दिवस. महल ते कानून. कानून ते पायांत खडावा घालणाऱ्या संन्यस्तापर्यंतचे. पुढे चित्रपटांशी माझेच नाते तुटले.

' मधुशाले 'त रसपान करता करता अशोककुमारचे करीअर मी कागदावर रेखाटू लागलो. खरं तर हा साराच अव्यापारेषु व्यापार. मनात विचार आला, या रसपान–गृहाचे नाव ' मधुशाला ' म्हणजे कवी बच्चनशी, त्यांच्या काव्याशी हा रसवालाही परिचित असणार. उसाचा रस विकणारे असे रसिक या शहरात पाहावयास मिळाले.

कवितेला मी शीर्षक घातले – ' अमृतसर–दादर एक्सप्रेस ! '

' जो भूतकाळ माझी बाळमुद्राही कधीकाळी साहू शकला नाही –
त्यानेच – त्याच्यातून आकारलेली भविष्यखूण म्हणून
आज सम्राटपदाला आलेली माझी अभिनयमुद्रा
वर्तमानाच्या पडद्यावर न भूतो, न भविष्यति झेलली.
माझी मुद्रा स्वीकारणाऱ्या लक्षावधी हातांचे मानमजुरे : हारतुरे
पण –
गावाकडून येणाऱ्या सदाबहार वाऱ्याला मात्र
मुजरा करण्यासाठी मी येतोय इकडं, दादरला – अधूनमधून.
तेव्हा माझ्या नेमाडी पडीक वास्तूतून आलेल्या
सातपुड्याच्या अंगझुळकांनी सुखावलेल्या
अंगधारांनी चिंब भिजलेल्या.
सातपुड्याच्या उन्हानं करपलेल्या नगाधिराजाच्या बांबूवनातून
मी देह उसना घेऊन थेट इथपर्यंत,
जिथून भूतकाळ स्वप्नाइतका आभासात्म.
त्याच अमृतसर–दादर एक्सप्रेससाठी –
डोळीयांत प्राण आणून मी अधूनमधून
आणि अलीकडे तर नित्यनेमानेच येत असतो
येत राहीलही : अस्तावण्याआधी पर्यंत,
या बेटावरील सूर्याच्या. '

कवितेखाली तारीख आहे २४ मे, १९७६. खंडवा–हर्दा मार्ग.

नर्मदातीरावरची माती, रेती, मऊ–मुलायम. लाल रेवू. शहरा–शहरांना जोडणारे रस्ते. राष्ट्रीय महामार्ग. या मार्गांना कुठे–कुठे रेल्वेगाड्यांची संगत. हर्दा–मगरधा ' नर्मदा मोटर–सर्व्हिस ' सुरू आहे. कुठे मधूनच रस्तादुरुस्तीचे काम चालले आहे. छत्तीसगढी स्त्रीपुरुष रोजमर्रा काम करताहेत. रस्त्याच्या दुतर्फा लांबट पानांची, अप्रमाण फोफावलेली, कच्च्या रस्त्यांचाही आश्रय घेणारी ' निर्लज्जा '– म्हणजे वनस्पतिसृष्टीत ' लाजवंती ' आहे, तशी निर्लज्जाही

आहे ! विदर्भ तिला ' निर्लज्जा ' म्हणतो. मध्य प्रदेश तिचा विषारीपणा जाणूनही तिला ' ताम्रेश्वरी ' म्हणतो. कठोर आणि मृदू असे वाणीचे प्रकार बहुधा अनुकूल–प्रतिकूल भावनांच्या माध्यमातून वापरतो, माणसासाठी, जनावरासाठी आणि वनस्पतीसाठीही ! या वनस्पतीलाही तर अखेर फुले येतातच ना ? फिकट: निळ्या रंगाची ती फुलं डोळ्यांना रिझवतातच ना ? त्यांना पाण्यात घाला की सारं पाणीच ताम्ररंगी होईल. आणि होय, विषाक्तसुद्धा ! पण म्हणून काय तिला ' निर्लज्जा ' म्हणायचं ? दुसरं काही म्हणताच येणार नाही का ? ताम्रेश्वरीच्या पार्श्वभूमीवर हे ' निर्लज्जा ' कसंसंच वाटतं. मग काय ? ' मुक्ता ' म्हणायचं ? होय, मुक्ताच. मुक्तपणे वाढते ती मुक्ता. ती निर्लज्ज नव्हे; कारण जगण्याचे, वाढण्याचे स्वातंत्र्य माणसांप्रमाणेच वनस्पतींनाही आहेच आहे.

इथे–तिथे पाणवठे आहेत. कमरेवर, डोईवर हंडया घेऊन कोरकू स्त्रिया पाणवठयावर पाणी भरत आहेत. उघडयावर उघडया अंगांनी अंघोळी करीताहेत. खोलगटात पाण्याची एकुलती एक ताली. तिथं माणसं घोडागाडया अन् बैलगाडया सोडतात. जनावरांना पाणी पाजतात. तालीवर घासून–पुसून अंगे धुणाऱ्या वनबाला त्या पुरुषी चाहुलींनी जराही विचकत नाहीत. गोंधळून जात नाहीत. त्यात पुरुषांनाही काही अप्रूप आहे, असं वाटत नाही. सारे व्यवहार कसे स्वच्छ, धुतल्या तांदळासारखे निरीच्छ, नैसर्गिक. पुढे पळसाची राने अन् बाभळीची बने ! इतस्तत: खुरटलेली, नानापरीची जंगली झाडं. आणखी एक. इकडच्या गाईम्हशी रोडक्या, सुमार दुभतं करणाऱ्या.

टेकडया–माळरानांचा हा कडकवर्ण प्रदेश लाल मातीचा, खुरटया वनस्पतींचा. संभालूच्या झोपडया, ताटया, पळस बहुगुणी. या प्रदेशात त्याला मानाचे स्थान आहे. मध्य प्रदेशातील आदिवासींच्या जीवनात पळस हे दैवतच. आंब्याच्या जेवणाचेसुद्धा पळसावाचून पान हलत नाही. जेवणासाठी पळसाची तीन पानेच. रंगपंचमीसाठी पळसफुलांचा रंग. वन्यबालांच्या मुक्त-केसांवरही पळसफुलांचेच मुकुट. मध्य प्रदेशातील पळसाची अशी ही किमया, अशी ही दुनिया !

रस्त्याच्या कडेकडेने मुक्तेच्या अस्तित्वाला रुळलेल्या डोळयांचा अकस्मात अपेक्षाभंग होतो,तो एखादवेळी गोड विसंगतीमुळे. म्हणजे एकटया पांढऱ्या चाफ्याच्या सहअस्तित्वामुळे. चाफ्याच्या उंचेल्या डोक्यावर आंब्याच्या पानासारखी चारदोन पानं गळयात गळा घालून मोत्याच्या माळा गुंफत असलेली !

मगरधा गोंडी राज्य. कनरदा रेहटा असे काही लहानलहान कस्बे भोवताली असूनही जुन्या गोंड राजवटीचे अवशेष राखून आहेतच. ' भिड–मुरैना 'वाल्यांनी म्हणजे चंबळच्या पाण्याने नर्मदेच्या पाण्यावर उगाच अतिक्रमण करू नये, हा दरोडेखोरांच्या जगातील शिरस्ता. तो कसोशीने पाळला जातो. मध्य प्रदेशातील

दरोडेखोर ' विंध्यवासिनी ' देवीला आपले दैवत मानतो. कुठल्याही स्त्रीच्या निरीला तो हात घालीत नाही. उद्देशपूर्ती सहजासहजी होत असली, तर नाहक रक्तपात करीत नाही. नर्मदाघाटातल्या एका दरोडेखोराचा मुलगा इंदौरला सायन्स फॅकल्टीकडे आहे, ही वस्तुस्थिती अत्यंत बोलकी आहे. दरोडेखोरालाही अंधाराचा वैताग येऊ शकतो. सुरक्षिततेचे आश्वासन मिळाले तर प्रकाशाचा किरण आणि माणुसकीचे जीवन त्यांनाही हवे आहेच.

गहाल–हर्दा रस्त्यावर रेहटा हे गाव पडतं. दिवसाढवळ्या तिथं कुणी जायचं धाडस करीत नाही. मात्र आजूबाजूच्या शंभर मैलांच्या टापूला रेहट्यापासून भय नाही – कदाचित हाही एखादा संकेतच ?

मगरधा राज्याच्या हद्दीत एक परीट भेटला. त्याचा अनुभव मोठा रोमहर्षक वाटला. या राज्यात जुने मालगुजार अजून रुबाबात राहतात. ' राजा 'बरोबर सांबराच्या शिकारीला गेलेला एक परीट सांगतो –

' – आणि शिकार सापडली ती सांबराची नव्हे, तर वाघाची. शिकार पडल्याबरोबर मी धावलो आणि वाघाच्या मृत शरीरावर कपडा घातला. त्वरित पन्नास रुपयांची बिदागी मिळाली. '

अनुभव सांगून झाल्यावर परटाने इशारा दिला, ' आधी वाघाची मिशी साफ करावी. नाहीतर मिशीचा एखादा केस जरी जेवणात गेला तरी जहरबाधा होऊन माणूस मरतो ! '

हर्दा हे लहानखुरे पण गच्च शहर. सुंदर आणि स्वागतशील. शहराच्या मध्यवस्तीत एक घंटाघर. बगलेत एक रस्ताभर पंख फैलावून बसलेली इमारत-कम-मार्केट. तीत अधिकोष, कापड–दुकाने व नाना खासगी व्यापार–विनिमय. या शहरात देवालयांची संख्या फार. शिवजी चौकाचौकात ध्यानस्थ. खेरीज हनुमंत, राधाकृष्ण, राम–सीता आहेतच. भैय्यांना या देवालय बहुलतेचं कारण विचारलं, तर मोठे मजेदार उत्तर मिळाले. भैय्या मिस्किलपणे बोलले,

' दैवतपूजन करण्यात एम्. पी.वाले महाराष्ट्रीयांपेक्षा अधिक योजक आहेत. देखिए, यहाँ के जो बनिया है, उनके संकल्प का यह प्रतीक है। हर्दा में कुल ३३ बनिये है – जिन्होंने आपस में करार कर लिया है की मुनाफे की आमदनी का सोलवा हिस्सा भगवान के लिए छोड दे। '

संकल्पाच्या या प्रतिकाखेरीज या शहरात आणखी एक आगळेवेगळे आणि वैशिष्टयपूर्ण प्रतीक आढळले. शहरातील चौकाचौकांत नेत्यांचे पुतळे बघण्यास आपले डोळे सरावलेले; पण हर्द्याच्या मुख्य चौकात ' अशोका ' हॉटेलच्या पुढ्यात घागरी पेहेरलेल्या आदिवासी कन्येचा डोईवर घागर घेऊन पाणवठ्याकडे

निघण्याचा शिल्पस्थ आविर्भाव मोठा लोभस वाटला. किंबहुना हेच या प्रदेशाचे खरेखरे जिवंत नि जातिवंत प्रतीक वाटले; परंतु भैय्यांना हा विचार मी मुळीच बोलून दाखविला नाही. नागरवस्तीतील देवधर्माच्या कल्पना प्रगल्भच; पण कोरकू तांड्याचे काय ? त्यांचा देव म्हणजे घराचा ओटा सारवून, चार दगडांना शेंदूर फासून कुठेही बसलेला ! वर मोकळं आकाश नि आजूबाजूला कोरकू–तांडा. डॉक्टरसोबत मी मुद्दाम या कोरकू तांड्यातून फेरफटका मारून आलो. डॉक्टरचं एका आदिवासी स्त्रीबरोबर जे बोलणं झालं ते बहुतेक कोरकू भाषेतून.

'क्यो डोगरीबाई, कोई पळळ् मुर्गी होवोत क्या ? '

'नहीं भैया, देव की ही है ! '

मेळघाटात एक सत्र राहूनही माझे कोरकू भाषेचे ज्ञान 'आटा जिजूंगा' पलीकडे गेलेले नव्हते; त्यामुळे डॉ. रमेशचे मला साहजिकच कौतुक वाटले.

भैय्यांचा सहवास डॉक्टरांपेक्षा दिवसाचा बराच काळ लाभायचा. भैय्यांना मध्य प्रदेशाचा रास्त अभिमान. 'तवा योजना,' 'पुनासा बांध' या आदिवासींच्या जीवन समृद्ध करणाऱ्या संजीवक नाड्यांपासून भांगेच्या पुड्यापर्यंत साऱ्याच गोष्टींचा भैय्या बोलण्यातून परामर्श घेत. मीसुद्धा महाराष्ट्राचा तितकाच अभिमानी. उगाच भैय्यांचे वर्चस्व का मानू ? वादावादी व्हायची. अखेर जुळतंमिळतं मीच घ्यायचा.

'भैया, क्यों न ऐसा करे की हम–तुम एकसाथ चले ? ' भैय्या त्यावरही छद्मीपणानं बोलायचे –

'क्यों हम ऐसाही न समझे की हम सब देशवासी एकसाथ चले ? '

भैय्याचं स्वप्न मोठं सुंदर होतं खरं; पण सत्य हे सुंदर असत नाही हे भैय्यानाही माहीत होतं. तमिलनाडूचा राहून राहून ते विषादाने उल्लेख करीत. ( तरी बरे, त्या वेळी खलिस्तानचा विचारही जन्माला आला नव्हता. )

भैय्या बराच काळ मनात रेंगाळत राहिले ते विषादापोटी त्यांच्या तोंडून निघालेल्या या उद्गारांमुळे –

'घास का ढेर समजता है, की मैंने अग्नी को ढँक डाला। पर जब हवा चलती है, तो समझता है क्या सत्य, क्या असत्य ? '

याशिवाय अजून लक्षात आहेत त्यांनी बनविलेल्या नव्या व्याख्या :

'पजा पजाके देता है सो पजाल । '

'कुंभ बनानेवाला कुम्हाल । नारमदेव कौन है ? वह है नर्मदा माई के गोद मे पला हुआ होशंगाबादी बरमन। और दलबदलू ?

'भई, दलबदलू का मुँह जिसकी ओर होता है, वे उसके इस सन्माननीय कृती को ' हृदयपरिवर्तन ' कहते है। दलबदलू की पीठ जिस दिशा की ओर होती है, उस दिशा से बार बार शोर सुनाई देता है – गद्दार ! गद्दार !! गद्दार !!!'

तर अशी ही नर्मदेची माणसं. या माणसांवर लिहावं तितकं थोडंच. या माणसांना ' अमरवेल ' म्हणणंच अधिक सयुक्तिक.

नर्मदेचा गहूभर
शब्द कानी नादावलेला
नादावताना मनामनात
चंद्रचांदणे सांडवलेला.

नर्मदेच्या सर्जनाला
शुद्ध जळ – साक्षी
माणुसकीच्या चौकटीला
नर्मदेची सुबक नक्षी !

– इथल्या साऱ्या मातीलाच
नर्मदेचा संस्कार आहे
संस्कारलेल्या मातीतच
अमरवेल फुलते आहे !

पैंजण, जून, १९८३

## ३ शरनीरा ते वाण

कुठलाही संकल्प मनाशी न ठरविता, बांधिलकीची वृथा बोच मनाला लावून न घेता मनमुक्तपणे जरा पायांना वळू द्यावे. अर्थ असा नव्हे की पाय नेतील तिकडे शरीराने धावावे. कुठे जावे ह्याचा निश्चित विचार करणारे अंतर्मन जोवर आहे, तोवर दिशाहीनतेचे भय बाळगण्याचे कारणच नसते. आपल्या लवकरच ध्यानात येऊ लागते की, आपल्या सुप्त मनाने घेतलेला निर्णय शंभर टक्के योग्य होता.

तीन–साडेतीन शतकांपूर्वीचा विदर्भ. त्या काळात विदर्भाला अशी एक वाणी लाभली होती की जिच्या नादावर उत्तर पेशवाई डोलली होती, ग्वाल्हेरी दौलतराव शिंद्यांच्या मंडपाला आग लागून सारे अशौच त्यात जळून भस्म झाले होते, नागपूर कीर्तनाच्या रंगी नाचू लागले होते.

ही वाणी कुण्या जादूगाराची वाणी नव्हती. विदर्भाचे संतकवी श्रीदेवनाथ यांची सिद्ध नि परखड वाणी होती ती !

त्या काळी अकोटच्या परिसरात निबीड अरण्याचा घेरा होता. या अरण्यगर्भातच ' वाई ' म्हणून एक लहानसे खेडे आहे. वाईच्या वेशीजवळून एक वहाळ झुळझुळतो आहे. देवनाथांचे गुरू गोविंदनाथांच्या पावन स्पर्शाने हा वहाळही कृतार्थ झाला आहे.देवबासारखाच. या लवणानेच सतरा–अठरा मैल पायी चालून आलेल्या संकल्पाला एक निश्चित दिशा दिली होती.

अशक्य वाटणाऱ्या बऱ्याचशा गोष्टी पुष्कळदा शक्याशक्यतेच्या आतबाहेर घोटाळत असतात. त्यांना निग्रह आणि प्रयत्नसातत्यामुळं शक्यतांचे रूप देता येते –

कुणाला क्रिकेटसारखे खेळ आत्मभान विसरायला लावतात, कुणाच्या आयुष्याचा ग्रंथ-ग्रंथ वाचता वाचताच मिटून जातो. कुणा-कुणाला सारखी माणसं

वेडावीत राहतात, तर कुणाला स्थळं.

देवदैवतांचे वास्तव्य असलेल्या स्थळांना या ना त्या निमित्ताने आपण भेटी देत असतो किंवा काश्मीर, गोवा किमान महाबळेश्वरासारखी निसर्गरम्य स्थळं औटिंगसाठी माणूस निवडतो, ते काही नुसत्या श्रद्धाशील अंतःकरणाने नव्हे.

पौषातल्या गुलाबी थंडीच्या दिवसांत मी अंथरूण सोडतो, तेव्हा पहाटेचे तीन वाजलेले असतात. शरनीरा अंधारात बुडून गेलेली असते. तिच्या काठावरील वृक्षसृष्टी अंधारात निश्चल पडून असते. मुखमार्जन होईस्तोवर रक्तातून उसळल्यासारखी चंद्रकोर क्षितिजावर टपकते ! तिच्या ऐन मध्यावर पांढराशुभ्र अष्टकोनी शुक्रतारा असतो. अमावास्या हातातोंडाशी आली असताना चंद्र जे आपले रौद्र स्वरूप दाखवितो, ते बघायला सृष्टी जागी नसते म्हणून बरे आहे. द्वादशी किंवा त्रयोदशीचा चंद्र अवलोकन करणाऱ्या दृष्टीला – चंद्राचे शैत्य जाणवत नसते, तर उग्र तपस्येने रक्तांग झालेल्या चंद्राचा उग्रपणा जाणवून मन भयचकित होत असते. पाहता पाहता प्रभा फाकू लागते आणि चंद्रकोर बरीचशी वर येऊन फिक्कट हास्य करू लागते.

आकाशातील लाघव संपता संपता मी तयारीनिशी घर सोडतो, तेव्हा अंधार उजळलेला असतो. रानात पायवाटेवर येतो. सारे रान सुनसान पडून असते. बहुधा सूर्योदयाच्या प्रतिक्षेत. पाखरं, नाना तऱ्हेची झाडे. त्यात निलगिरीचे एकटं झाड तर आपल्या वेगळेपणामुळे विशेष डोळ्यांत भरते. आपल्या उंचीलाही लाजविणारे गांभीर्य दर्शवीत ते सूर्याच्या पहिल्या किरणाला झेलण्यासाठी आतुर असते. हाकेच्या अंतरावर रानचिमण्यांचा थवा कायसं टिपत असतो. तितक्यात कर्कश आवाज होतो. जवळपास कुठं विमानतळ तर नाही आणि अकस्मात ही कसली कर्कश घरघर ?

हात्तिच्या ! झुडपातून नुसती भोरडी तर उडाली; पण नीरव शांततेच्या काठावरून तिचं उडणं रुद्र लयीतलं, म्हणून जाणवलं. मनसोक्त पाणी पिऊन गव्हाची शेतं जरठ हरित पर्णांत काळसर झाक मारीत तर्रर्र पडलेली.

रस्त्यात आंब्राई भेटली. तिथं कोकिळा नव्हती. आंब्याला मोहोर येण्याचे नि कोकिळेला कंठ फुटण्याचे दिवस अजून दूर आहेत. तरीही हे तटस्थ आम्रवृक्ष बहुधा सूर्यकिरणांपेक्षा मोहोरण्याचीच प्रतीक्षा करीत असावेत. नाहीतर एवढा प्रशस्त सूर्योदय होतो आहे आणि ही झाडे ताटस्थ्य सोडत नाहीत ती का ?

झुडपात लपूनछपून दिवस काढणारी कोकिळाही दिसली. नवख्या वाटांवरून जाताना आगंतुक तरंगांचीही मनात झुंबड उठते. पुढे बेरजेच्या चिन्हासारखा जो चौरस्ता आहे त्यांपैकी मला कुठला रस्ता धरला पाहिजे याचे भान या कल्लोळात सुटू नये; कारण बऱ्याचदा वाटा फसवितात. मागाहून आपण फसल्याचे ध्यानात

येतं नि हृदयात धस्स होतं ! बरे, विचारांनाही कुठली संगती, विशिष्ट लय असते, असे नाही. बिलकुल हलके-फुलके असतात ते !

चौरस्ता आला, तिथं मी इष्ट वाट, मनातल्या आगंतुक विचारांना न झटकताही धरून ठेवली. म्हणजे अप्पासाहेब ( कै. ना. सी. फडके ) सांगून गेले ते खरेच तर ! तुम्हाला दोन मने असतात. एक व्यावहारिक मन आणि दुसरं अप्रकट मन. व्यावहारिक मन कार्यमग्न असलं, तरी हे अप्रकट मन अचूक निर्णय घेत असतं. त्यानं घेतलेल्या या निर्णयाबरहुकूमच माझं चालणं होतं.

वाटेवर बागांतून कुणीतरी अतिरिक्त पाणी सोडून दिल्यामुळं चिखल झाला होता. चालणं मुष्किलीचं होत होतं. तरीही चालत होतो. पादत्राणं हातात घेतली. काटेरी बाभळचा चुकविताना डोळ्यांना भारी प्रयास पडायचे. एक वाट, सुरक्षितपणे मेढीवरनं जात होती; पण गोलंदाजाने टाकलेल्या फसव्या चेंडूच्या आमिषाला बळी पडणाऱ्यांपैकी मी नव्हतो. शतक काढायचंय अजून, आत्ताशा कुठं चाळीस–पंचेचाळीस धावा काढून झाल्यायत.

तर देशपांड्यांच्या वाड्यासमोरील जागृत दैवताचा शेंदूर कपाळाला, कंठाला फासून मी बसस्थानकावर आलो, तोवर आकाशात सूर्यगोल कित्येक हात वर चढून प्रकाशाची खैरात करीत होता. बसच्या फाटकातून अचानक प्रकाश आला. प्रकाशच्या कॉलेजात दुपारी ४ वाजता कथाकथनाचा कार्यक्रम व्हायचा होता. आजकाल दैनंदिन जीवनातून फुरसद काढून साहित्यचर्चा, काव्यविनोद करायला कुणालाच सवड नसते. त्यामुळं या चर्चा धावत्या बसेसमधून, रेडीमेड कापडांच्या दुकानातून आणि चुकून अविवाहित राहून गेलेल्या एखाद्या साहित्यिक मित्राच्या लग्नमंडपातूनही होत असतात. कार्यक्रमाला अवश्य हजर राहतो, असे प्रकाशला आश्वासन देऊन मी त्याचा निरोप घेतो. ' शिवजी 'च्या फाटकातून तोही घाईघाईत दिसेनासा होतो.

' वाण प्रकल्पा 'कडे जाणाऱ्या बसची मी वाहतूक नियंत्रकाकडे चौकशी करतो. माझ्याकडं वळूनही न पाहता तो उत्तरतो – ' बारा चाळीस. ' अस्वस्थ होत मी मनगटावर पाहतो. जेमतेम नऊचा सुमार. म्हणजे तीन–चार तासांची निश्चिंती. उगाचच बुक–स्टॉलकडे चक्कर टाकतो आणि समोर ' ती ' दिसते. तिच्या नितळ भालप्रदेशावर अक्षरं टवकारून बघताना दिसतात – ' वारीचा मारुती. ' लगबगीनं मी आत घुसतो.

ठीक ९–२५ ला बस अकोट स्थानक सोडते. ईशान्येकडून नरनाळा मला आमिष दाखवीत असतो; पण मी बघत नाही. शेत–शिवारं सारखी मागं पडतात. अडगाव, हिवरखेड. बसमधून किती पटापट झाडे, शेते, ओहोळ मागे पडतात; नाही?

पानतांड्याशेजारीच ऊसमळे ! आणि या आंब्यांना या वेळी मोहोर ? कमालच आहे ! आंबा मोहोरलाय खरा. भाग्यवान आम्रवृक्षांचं असंच असतं. वसंताच्या आगमनाची प्रतीक्षा सारेच करतात. तोपर्यंत वाट बघायला हा राजी नसतो. बिन-मोहराच्या आंब्यामध्ये तो एकटाच मोहोराचे काव्य फुलवीत बसलेला असतो; म्हणूनच रसिकांच्या नजरा त्याच्यावर खिळून राहतात.

पाहता पाहता पहाडपर्व सुरू झालेसुद्धा ! भग्न किल्ल्यांचे अवशेष दिसले. बस थांबली, तेच वाई म्हणजे वाईफाटा इथून ते लहानसे गाव दोन-तीन किलोमीटर अंतरावर. वाईच्या वेशीजवळून आमची बस पुढे सरकत होती. बसच्या गतीबरोबर विचारचक्रही गरगरत होते.

वाईजवळच एक माळरान. माळरानावर सोनेरी पानांचा अश्वत्थ. अश्वत्थतळी एक चंद्रमौळी पर्णकुटी.

मध्यरात्र उलटली होती. चोहीकडे अंधार कसा किर्रर्र भरून. या अंधारातून धडपडत देवबा पर्णकुटीच्या रोखानं निघाला होता. कुटीत दिवा मिणमिणताना दिसत होता, कधी नाहीसा होत होता, परत दिसत होता.

मधूनच एखादे हरीण किंवा काळवीट टुणकन उडी मारून झुडपातून बाहेर येई. काळोखी दिसेनासं होई. ससे कान टवकारून चाहूल घेत. रानडुकरांचा एक भला थोरला कळप गुरगुरत पुढ्यातून गेला. या विदेही पथिकाला मात्र त्या वन-चरांची पुसट वार्ताही नव्हती. सारा दिवस चालून झाले, पायांत गोळे आले. पोटात कंदमुळेसुद्धा गेली नव्हती. निर्झरांचे निवळ शंख जलपान करून वाटसरू वाट सरती करीत होता. अंतर्यामीच्या ओढीने. अंतरंगी जागलेल्या ज्योतिप्रकाशात.

पथिक पर्णकुटीच्या प्रवेशद्वारी आला, तोच देहाने ठाव सोडला. तो कोलमडला. मूर्च्छित होऊन भुईवर पडला.

डोक्यावरून हळुवारपणे कुणाचासा हात फिरला. त्या अलौकिक स्पर्शानं देवराय शुद्धीवर आला. त्याने डोळे उघडून पाहिले आणि तो खाडकन उठून बसला.

प्रत्यक्ष परब्रह्म पुढ्यात ठाकले होते !

अष्टदिशा प्रकाशात उजळून निघाल्या होत्या !!

तेजाचे लोटच्या लोट क्षितिजावरून उठत होते !!!

आनंदकल्लोल जाहला. एक नवा सूर्य क्षितिजावर उदेला होता...

...आणि बसबरोबरच विचारचक्रांची गतीही थांबली. स्मरणचित्रांची माळ अर्ध्यावरच तुटली. बस थांबली ते पहाडाचेच एक टोक होते. दोन सुळक्यांच्या मधोमध खोलातून वाण नदी वाहत होती. दुसऱ्या टोकाला मंदिरावर भगवा ध्वज

फडकत होता. ' वाण प्रकल्प ' बघण्याची इच्छा काही भाविकजन बोलून दाखवीत होते. कुणी ' ठंडा पानी गरम पानी उधर है ' असे कुंडाकडे बघत अंगुलिनिर्देश करीत होते.

शिखरावर काही झोपड्या दिसल्या. बहुधा कोरकूंच्या या झोपड्यांना ' वारी ' हे नाव असावे. शिखरापासून तळातल्या नदीपर्यंत व नदीतून पाण्याचे हंडे डोक्यावर घेऊन शिखरापर्यंत गिर्यारोहण. वाण नदीचा एक प्रवाह उत्तरेकडून, तर एक पश्चिमेकडून येत होता. मामा-भाच्यांचा बंदिस्त डोह. चारी बाजूंनी उंचच उंच गेलेले सुळके. सुळक्यांवरून, सुळक्यांतून कोसळणाऱ्या दुग्धधारा !

सूर्जी–अंजनगाव ते वारी. शरनीरा ते वाण असा हा भ्रमणमार्ग. आज पदयात्रेकडे उपहासाने बघतात. खरं तर तपश्चर्या शब्दालाही उपहासाचीच खाई आणि अक्षरजमेचा पर्याय. देवनाथानी त्या काळात कितीदा तरी ही पदयात्रा केली असेल. निबीड अरण्यराईत ' वारी 'च्या हनुमंतासमक्ष चाळीस दिवसांचे अनुष्ठान-व्रत त्या विदेही नाथाने इथेच आरंभिले असेल. इथे त्याला शब्द गवसले. वारी-नाथाने देवनाथाना वाचस्पती बनविले !

पुढच्या काही क्षणांतच हा अरण्यसहवास नकोसा झाला. चारदा पाणी पिण्यासाठी वाण नदीच्या पात्रात यावे लागले. घडीभराचा हा वनवासही असह्य झाला. पर्वताच्या त्या विराट सुळक्याने मला माझी जागा दाखवून दिली. मनात विचार आला, त्या दुसऱ्या सुळक्यावर एखाद–वेळी बस येऊन, गुरगुरत निघूनसुद्धा जायची. करता काय ? लगबगीनं सुळका उतरलो. बसच्या सुळक्यावर चढलो. पुन्हा तहान लागली; पण पुन्हा वाण नदीच्या पात्रात उतरायला धजलो नाही. भाव असला तर देव आपोआप भेटतो. वाणमाईची कृपा होईल कधीतरी, तेव्हा अवचित पाण्याचे थुईथुई कारंजे उडवीत ती आपसूकच या सुळक्यापर्यंत येईल.

रजधूळ

# ४ वृक्ष वल्ली आम्हां सोयरी !

मीनाक्षासनी आरूढलेल्या पुष्पागत ऋषी ध्यानस्थ बसले होते. हिरव्याचार, नितळ निपत्र्यांवर पुष्पवृंत जललक्ष्मी पाण्यातून साकार व्हावी, तसे अवतरत होते.

झाडाला जमिनीत अस्तित्व रुजवायचे होते. इतर जिवंत सेंद्रियांप्रमाणे जमिनीवर त्याचाही हक्क नव्हता का ? पण खडकांनी त्याला विरोध केला, अस्त्रांनी घाव घातले. अस्त्रांची शकले होतील, अशा कठीण कवचाचे अश्म. मुळांनी खडकांशी झुंज घेतली. त्यांवर आपले अस्तित्व रुजविण्याचा आटोकाट यत्न केला; पण व्यर्थ !

मग एक अघटित घडले. खडकात शिरतेवेळी मुळांनी खडकांशी झुंज घेतली. त्यावर आपले अस्तित्व रुजत नाही, असे लक्षात घेऊन खडकावर लाळ गाळली. सारा खडक ओला करून टाकला. खडक आता अस्वस्थ झाला. अंगावर ठिणग्या पडून आपण जळत आहोत, की कुठल्या रसायनात ढवळून निघताहोत हे त्याला कळेना. मातीची ढेकळे पाण्यात विरघळून जावीत तसे घडत होते. शरवत् झाडाची मुळे शरीरभर शिरत होती. लाह्या फुटाव्या तसे शरीर फुटत होते. आधीच त्या लवलवत्या आम्लाने ते किती दिवस ठिसूळ बनत होते. अखेर फुगा फुटावा तसे ते फुटले आणि त्याच वेळी झाडाने खडकावर आपले अस्तित्व रुजविले.

तिकडे सागराची सिंहगर्जना चालली होती. या वेळी तो खवळला होता. लाटांच्या झिज्या पुळणीवर थडाथडा आपटीत होता. पुळण थरथरत होती. घामानं चिंब झाली होती. एरवी तो कसा शांत असायचा. किती किती जणांना आश्रय दिला होता त्याने आपल्या उदरात ! म्हणूनच त्याला उदारधी म्हणावयाचे. त्यात विषारी सर्प होते आणि नाजूक कमळेही होती. मासे होते, मगरी होत्या, शेवाळ-प्रवाळ, व्हॅलिसनेरिया वनस्पती असे किती किती !

अस्तित्व कधी आपोआप रुजत नाही. ' निसर्ग, ' ' नैसर्गिक ' हे शब्द निसर्गातील चराचरांचं चलनवलन, हेतू पुरतेपणी आविष्कृत करू शकत नाहीत. शब्दांच्या मर्यादेपलीकडं स्मरणशक्तीला अर्थबोध न होणारं असं कितीतरी अनाकलनीय निसर्गात घडत असतं. उदाहरणार्थ फुलाचेच घ्या ना !

फुलांकडं पाहिलं म्हणजे असं वाटतं – फुलांमध्ये सुगंध भरून जगन्नियंता घाईघाईत निघून गेला असावा. त्यात हृदय भरायचं तो विसरूनच गेला; परंतु आपण मात्र कितीही घाईत असलो, तरी फुलांचा सुगंध जवळपास येत असला की किंचित थबकल्याशिवाय राहत नाही. कुठल्याही अर्थानं घ्या – अखेर जगप्रसिद्ध नाटककार शॉ म्हणतो तेच खरं. खरंखुरं देवदर्शन होतं ते फुलबागेतच.

अंगणी फुलझाडं म्हणजे यजमानाच्या नाजूक देवताप्राय अंतःकरणाचं प्रदर्शनच. घरापुढे, बंगलीपुढे, परसदारी आपण फुलांच्या वेली बहरलेल्या पाहतो. विद्या आणि फूल यांचा तर नेहमीच एकत्र वास दिसून येतो आणि एका दृष्टीनं ते बरोबरही आहे. फुलांच्या सान्निध्यात ज्या प्रसन्नतेनं विद्यादानाचा यज्ञ होईल, तो फुलांशिवाय रुक्ष वातावरणात कसा बरं होऊ शकेल ?

फुलातील परागकणांची क्रिया. पशुपक्षी, माणसे यांप्रमाणे वनस्पतींनाही आपला वंशविस्तार करावयाचा असतो. मनुष्य किंवा मनुष्येतर प्राण्यांमध्ये चालतो तसा जीवनसंघर्ष त्यांच्यातही चाललेला असतो. माणसांप्रमाणेच त्यांना इंद्रिये असतात, इच्छा–वासना असतात. शारीरिक क्रिया जनन, मरण, उद्‌भव इत्यादींत माणसांप्रमाणे त्यांच्यातही अवस्थांतरे असतात. तरी झाडे आणि दगड यांमध्ये आपण फरक करीत नाही. झाडांवर कुऱ्हाडी चालविताना आपल्या हातांना कंप सुटत नाही. की कुण्या जिवंत प्राण्याचा आपण खून केला याची पुसटशी कल्पना-सुद्धा आपल्या मनाला शिवत नाही. अबोधपणी केलेल्या या क्रूर हत्या शतकानुशतके माणसाच्या हातून घडत आहेत. प्राचीन आर्यांनी ' दस्यूं'चा जसा उच्छेद केला, तसाच भयंकर उच्छेद जंगलांचाही केला. झाडांकडे निर्जीव वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन निर्मम आहे. भलेही जगदीशचंद्र काहीही सांगोत ! आपल्या दृष्टीने झाड हे निर्जीवच.

' पुस्तकातली गोष्ट ' म्हणून सुशिक्षितांनीही या अन्यायाकडे कधी गांभीर्याने पाहिलेच नाही; म्हणूनच अन्य सजीवांशी आपला व्यवहार असतो, तसा तो झाडाझुडपांशी असत नाही. वनस्पतींचा मित्र म्हणून स्वीकार करण्याइतके नाजूक Sensitive मन आपल्याला नाही, हे शास्त्रीय सत्य आपल्या दृष्टीने कुचकामाचे आहे. कविजनांचा तो वेडेपणा आहे ! वनस्पतींचा उच्छाद करण्यात काहीएक पाप नाही, असे तो मानतो. कोवळ्या-कोवळ्या, लुसलुशीत फुलांच्या गळ्यांना

नखे लावून खुडताना त्यांना कसलीही खंत वाटत नाही आणि तिकडे समग्र पुष्पवृन्तात काय चाललेलं असतं ? केवढं सर्जन चालू असतं ! केवढी क्रांती होणार असते पुष्पकोशात ! त्यासाठी दळी, पाकळ्या प्रहरी बनून आत चाललेल्या या निर्माणाच्या गुजसोहळ्यासाठी संरक्षक पवित्र्यात उभ्या असतात. आपल्या पुष्पमुकुटाच्या संरक्षणासाठी फुलांचा अवयव न् अवयव सिद्ध असतो. पाकळ्या, निपत्रे, स्त्रीकेसर, पुंकेसर आपापल्या कार्यात मग्न असतात. बाह्य जगाचे त्यांना भान नसते. एक प्रचंड सोहळा, सर्जनाचा मंगलविधी अंतरंगात चाललेला असतो. वडीलधाऱ्यांनी पुत्र–स्नुषेच्या मधुचंद्राची घरातल्या घरात तयारी चालविलेली असते. पुंकेसर आणि स्त्रीकेसराचे मिलन व्हायचे तर साऱ्यांनीच नको का वधुवरांच्या मिलनासाठी, सर्जनाच्या मंगल घटिकेसाठी आपापल्यापरी कामाचा वाटा उचलावयाला ? जबाबदारीची ही जाणीव फुलाच्या प्रत्येक घटकावयवात दिसून येते.

पर्थंडे–पुंकेसराचे मिलन म्हणजेच परागीकरण. आता हेच तर व्हावयाचे. हे व्हायलाच हवे. हे कुणी मुद्दाम घडवून आणीत नाही. ते निसर्गातच घडते असे आपले म्हणणे; पण फुलांच्या या अवयवांकडे पाहून तसे नाही वाटत. फुलातील प्रत्येक हालचाल उद्देशानुवर्ती असते. पाकळ्या निरनिराळे रंग धारण करतात. माशूक बनतात. भृंगे व फुलपाखरांना आपणहून निमंत्रितात. आशूकही मग या पाकळ्यांकडे ओढले जातात. हिरव्या गुलाबपाकळ्या पानातल्या पानात अन्न निर्माण करतात. शरीरभर तजेला धरून ठेवतात. तारुण्याचा मद अंग अंग घुसळीत येतो. एकेक पाकळी जणू एकेक मदलसा होऊन भृंगमग्न झालेली. शृंगारचेष्टितात, स्वर्गीय सुखात अस्तित्व मात्र हरवून बसलेली.

या घालमेलीत परागशय फुटतो ! परागांचा कुक्षीबिंबावर सडाच सडा पडतो आणि स्त्रीकेसराचा सारा अंगदाह त्या गार स्पर्शदंशाने सौम्य होतो. कुक्षि-बिंबावर पांढरा, ओलसर स्राव गळू लागतो आणि उत्कटतेचा, साफल्याचा, असीम समाधानाचा तो क्षण – हे असेच क्षण आणि कण शिंपल्यात पडलेल्या मोत्यांसारखे जतन करून ठेवायचे असतात. हा प्रत्येक कण स्त्रीकेसराच्या सुखाचा अमृतकण असतो. नसानसांत तृप्ती भरणारा असतो. यासाठीच तर प्रत्येक ऋतूत जीव तळमळत असतो. युगायुगांची प्रतीक्षा झालेली असते. ती या सुफल संपूर्ण क्षणा-साठीच तर ! तो क्षण, तो कण – या कणाक्षणांच्या अणुरेणूंचे विलयन व्हायचे असते. कुक्षिवृत्तांतून गर्भाशयात जाईपर्यंत या परागकणांना किती किती जपावे लागते !

आणि नेमकी फलधारणा होतानाच कुणीतरी आपल्या पाशवी हातांनी इथं फुलांच्या गळ्याला नख देतं. त्याला हुंगून फेकून देतं. सहस्रावधी हातांनी खुडून घेतं. मारणाऱ्यानं मारावं, हात थकेस्तवर मारावं, तरी फुलाफळांनी परत फुलावं,

फळावं – साऱ्या जखमा भरून घ्याव्या, दुःख विसरावं आणि देवाच्या शिरी जाऊन सन्मानानं विराजमान व्हावं. कधी कुणाच्या वेणीची शोभा व्हावं, माणसांचे मधुचंद्र साजरे करावे, त्यांची प्रेतेही शृंगारावी, देवालये सौरभित करावी. तर काय की माणसांच्या हातून सारखा संहार चाललेला असतो. निसर्ग सर्जन करीत असतो. सर्जन आणि संहार यांचा जणू पाठशिवणीचा खेळ चाललेला !

काटे सावरीची म्हातारी ग्रीष्मझळांबरोबर उन्हाच्या लाटांवर भगभगत्या आकाशातून तरंगत तरंगत येते. मुलांचे घोळकेच्या घोळके या म्हाताऱ्या पकडण्यासाठी धावतात. त्यांच्या झिज्या उपटतात, कधी काळ्या चकचकीत बिया काढून आगपेटीत जमवितात. चिमण्यांचं एखादं जोडपं या म्हाताऱ्यांचा माग काढीत त्यांच्या उगमापर्यंत जाऊन पोहोचतं ते या आशेनं की, चिमण्या बाळांना या कापसासारख्या पांढऱ्या व रेशमासारख्या मुलायम म्हाताऱ्या मऊशार गादी पुरवितील. नदीकाठावर एखाद्या अगडबंब खडकाआड या म्हातारीच्या झाडाने आपला संसार थाटलेला असतो.

चिमणाचिमणी मऊ मऊ पिसं गोळा करतात. इवलाल्या चोचीतून दाणे टिपतात. पोरांना भरवितात. हा हा म्हणता उडून जातात. परागकणांचा मनःपूत आस्वाद घेताना चिमणाचिमणीच्या पायांना, चोचींना, पंखांना हे सूक्ष्म कण चिकटतात. चुकून कधी अशी जोडपी दुसऱ्या फुलांवर जातात आणि आपापतः सर्जनाचे कार्य घडून येते, तर सृष्टीत चाललेल्या या महान निर्माणयज्ञाला हे पक्षी, कधी मधुमक्षिका, कधी भृंग तर कधी फुलपाखरे निमित्त ठरत असतात. या पक्ष्यांची जीवनावश्यक गरज म्हणून ते या फुलांच्या जगात शिरत असतात की जीवनाच्या इतिकर्तव्यतेसाठी एक मध्यस्थ म्हणून फुलांनाच पक्ष्यांची गरज असते, हे सांगणे कठीण आहे किंवा दोघांनाही परस्परांची गरज असते हेच अधिक सत्य असेल ? काही असो, एकाच्या अस्तित्वामुळे दुसऱ्याचे जीवन फुलते हा निसर्गाचा न्याय आहे. ही पक्षिसृष्टी आणि पुष्पसृष्टी परस्परजीवी, परस्परावलंबी – म्हणूनच परस्परांची जिवलग. माणूस दोन्हींचा हाडवैरी !

मृगाच्या सरीबरोबर आणखी एक सर्जन सृष्टीत होऊ घातलेलं असतं – उद्‌भेदन. पुष्पसृष्टीच्या संरक्षणाचा विचार ज्या माणसांच्या मनाला आजतागायत शिवलेला नाही, ती माणसे उद्‌भेदनाचे कार्य स्वहस्ते घडविण्यात जिवाचा आटापिटा करताना दिसतात. एकदल, द्विदल अशी धान्ये माणूस बीजरूपाने जमवितो. या धान्याला भ्रूणामूलकुंचकापेक्षाही अधिक संरक्षितो.

पावसाच्या धारांबरोबर सृष्टी रोमांचित होते. तिच्या सर्वांगी हिरवे रोमांच फुटतात. अंतर्बाह्य ती मोहरून उठते. निरनिराळी पादपे आपापल्या पद्धतीनुसार

जीवनवाटा चोखाळताना दिसतात. धान, वाळा ग्रीनग्रास यांसारख्या वनस्पती तंतुवत मूलसंहितेतून पिसारताना दिसतात, तर वडाच्या पारंब्या, ऊस आगंतुक मूलसंहितेतून आपला विस्तार धारण करतात. वनस्पतिसृष्टीचे इतर कोणत्याही नसेल, पण एका दृष्टीने साम्य आढळते. शोषक–शोषित हे जसे मानवी सृष्टीत अस्तित्वात आहेत, तसे वनस्पतिसृष्टीतसुद्धा ! अधरवेल, वांडगुळे यांची परजीवी मुळे अन्य गरीब वृक्षांपासून रसशोषणाचे कार्य करीत असतात; परंतु हे शोषण सीमित असते. मानवी शोषणाइतके ते अमर्याद होत नाही.

'उद्भेदन' झाल्यापासून वनस्पतीचे हे जग वाढत असते. जिजीगीषेने फोफावत असते. हे वाढणे, फोफावणे नयनोल्हादक असते. त्यांचे जगणेही विविध-स्तंभीय असते, मनसोक्त असते. जसे माणसांचे रीतिरिवाज, पेहराव, भाषा तशाच विविध वैचित्र्याने ओतप्रोत वनस्पतींच्याही जगण्याच्या तऱ्हा ! आंबा, वड, पिंपळ, बकान, निंब हे वृक्ष वायव्यस्तंभी जीवनरीती पसंत करतात, तर कांदा, बटाटा हे जगण्यासाठी भूमिगत स्तंभाचा आश्रय घेतात. कमळासारखे काही अपवाद असतात ते जलस्तंभावर जगणे अधिक पसंत करतात. हंस मोत्यांचा चारा खातो म्हणतात तसेच कमळाचे हे जगणे ! हरळीची शल्कपत्रे ओलाव्याच्या आश्रयाने, नदीकाठाने दूरवर पसरत जातात. असे जगणे, असे विस्तारणे भूशायी असते. हळद, अभ्रक, कर्दळी ही जमिनीच्या उदरातून अन्नरस घेतात. पदिन्याची जीवनरीतसुद्धा तीच.

पशुसृष्टीत काही जातींतील माद्या आपल्या जगण्यासाठी आपल्याच अपत्यांचे भक्ष्य बनवितात. अंत्यजांचे मात्र प्राणापलीकडे रक्षण करतात. कंदिकेच्या संदर्भातही असेच म्हणता येईल. जुनी कंदिका कालांतराने नष्ट होऊन नवीन कंदिका जन्म घेते. नवी कंदिका जुन्या कंदिकेवर निर्वाह करते.

वनस्पतींचे माणसांशी आणखी एका दृष्टीने साम्य आहे. साधारणतः माणसाच्या अन्नप्रकारांवरून त्याचे वर्गीकरण आपण शाकाहारी व मांसाहारी असे करतो. काही लोक उभयाहारी असतात. मांसाहारी वनस्पती म्हटल्याबरोबर कुतूहल न चाळवले तरच नवल ! वर्गीकरणातही एक गंमत असते, एक थ्रिल असते. सर विल्यम ऑस्लरने माणसांचे वर्गीकरण तीन प्रकारांत केले आहे. तो म्हणतो, 'मनुष्य तीन प्रकारांत मोडतो. Men, Women and Women physicians' हे तीन प्रकार. विल्यमने स्त्री–शरीर तज्ज्ञांची ही जी नवीन जात निर्माण केली, ती वैद्यकशास्त्राच्या कडीबंद, प्रखर, समर्पित निकषांच्या आधारे. असे निकष वनस्पतिसृष्टीत नाहीत; परंतु माणसांप्रमाणे त्यांचे ठळक वर्गीकरण मात्र आहे. होय, मांसाहारी वनस्पती या भूतलावर आहेत. हे मांस मग कीटकांचे असो, प्राण्यांचे असो की माणसाचे; अन्न म्हणून ही मांसाहारी झाडे रक्ताची वाट पाहत

असतात आणि एकदा का माणूस, जनावर किंवा पशुपक्षी यांच्या तावडीत सापडले की त्यांची सुटका नाही. रीचर या नावाचं एक झाड घटाकारात वाढत जातं. या भांड्याच्या आत तीक्ष्ण सुरीसारखे काटे असतात. या घटावर झाकण म्हणून एक पान असतं. कीटक या पानावर आला की, तो या काटेरी भांड्यात पडतो. मग हे काटे कीटकाच्या अंगात घुसतात. झाडे घटाघटा सावजाचे रक्तप्राशन करतात व आपली क्षुधा शमवितात. पिशवीची (Blader) जातही अशीच रक्त-पिपासू ! मात्र ही वनस्पती पाण्यात वाढते. वेलीच्या खोडावर असलेल्या पानांचेच पुढे गाठीत रूपांतर होते. पानाला एक पोकळी असते आणि या पोकळीत ते रक्त-पिपासू काटे असतात. अनेक जलचरांचे रक्त प्राशन करूनही काटे अजून खवखवलेले आहेतच.

तर असे हे वनस्पतींचे विचित्र विश्व. विधायक आणि चमत्कारिक, हवेहवेसे, लोभस असे. आज या वृक्षलतांचा अनेक देशांतून संहार चालला आहे. अर्जुनाने मांडलेल्या सर्पसत्रासारखा ! आज नागपूरसारख्या सेकंड ग्रेड शहरातूनही रस्त्यांना आपले अंग फुगविण्यासाठी या झाडोऱ्याची अडगळ होऊ लागली आहे. मुंबईसारख्या शहरांचं एक सोडा; पण पुणे–कोल्हापूरसारखी मोठी खेडी या वृक्षराजींना कितपत न्याय देतात, हे तुम्हीच ठरवा !

---

मार्च ८५ : वसंत / आकाशवाणी नागपूर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३५३६ ग्रंथ
दा. क्र. २६०३८
२२।४।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्र.)

## ५ पळस !

पौषातली बोचरी थंडी आता हळूहळू बोथट होऊन बिननखाच्या श्वापदा-सारखी जंगलात कुठंतरी दडी घेऊन बसते, पसार होते. दूर काश्मीर घाटीत नेमके याच वेळी बर्फ पडत असल्याची रेडिओ वार्ता देतो. वर्षातनं निदान एकदा असं घडतंच; म्हणजे थंडीचे दिवस संपल्याचे ऋतूने इकडे जाहीर करावे नि तिकडे बर्फ पडत असल्याच्या वार्ता रेडिओवरून ऐकू आल्या, वर्तमानपत्रात वाचल्या की मन कुरकुरतं, कधी संपणारायत हे नावडते दिवस ?

थंडीच्या दिवसांना मी नावडते दिवस म्हटले खरे ! पण खरेच, थंडीचे दिवस निसर्गाच्या आणि माणसाच्याही जीवनात अनावश्यक असतात का ? उलट माघातला हरभरा किंवा गव्हाच्या ओंब्या या थंडीमुळेच ना भरू लागतात ? थंडीचे दिवस पुढे पुढे अप्रिय होऊ लागतात; नको हा हिवाळा असं वैतागानं माणूस जसं शीतऋतूविषयी बोलून जातो, तसं तो ग्रीष्म वा पावसाळ्याविषयीही बोलत असतो आणि तरीही मृगाच्या पहिल्या सरीची डोळ्यांत प्राण आणून वाट बघत असतो. सृष्टीत वसंत ऋतू संचारल्याची जाणीव होताच उबगलेल्या मनाची, आंबलेल्या देहाची झिरमिळ क्षणकाल नाहीशी होऊन निसर्गाप्रमाणंच मनही चैतन्याचा अनुभव घेऊ लागतं. कवी आणि कोकिळा यांना या संधिकालात स्फूर्तीनं शब्द फुटू लागतात. डेरेदार आम्रवृक्षातून कुऽहूऽचा नाद झंकारला की कुतूहल चाळवतं. मनाला पंख फुटताहेतसं वाटतं अन् डोळे प्रतिक्षिप्त क्रियेने नादमाधुर्याच्या त्या गंगोत्रीला शोधू लागतात. स्वर ऐकू येतात; पण स्वरराज दिसत नाही. घटका-भर असं चालतं. मनात विचार येतो, या पानांनाच तर नाही ना स्वरपालवी फुटली? साधी कडुनिंबाची पानं ! पण कशी नवाबी थाटात झुलत असतात, नाही ? सारा जून पाचोळा तर कधीचाच झडून गळून गेलेला ! जरठ निबर हिरवी पानं आता

नावालासुद्धा झाडावर दिसत नाहीत. त्याऐवजी पानांचे टोकदार, काठकातर शेंडे कसे लालजर्द नि लुसलुशीत दिसू लागतात. टवटवीत, कोवळी पालवी सारा कडवटपणा विसरायला लावते. कुडीतून उडालेला प्राणपक्षी ' पुनरपि जननम् पुनरपि मरणम् ' या संकेताप्रमाणं पुन्हा जन्माला येतो की नाही, अशा संभ्रमात असलेल्या संशयात्म्यांना ही वासंतिक पालवी जणू पुनर्जन्माची थिअरी सिद्ध करण्याकरिताच सभोवती लगडून असते.

चक्रं भिरभिरू लागतात. साहचर्य धर्मानुसार कल्पनाविचारांचे आकृतिबंध मनात ढवळत असतात, तोच पुन्हा पानाआड खसपस होते आणि तेच ओळखीचे सूर कानी येतात कु ऽ हू ऽ. मन अधिकच हट्टाला पेटतं. आवाजाच्या या राणीला एकदा डोळ्यांच्या हातावर पेलायला हवंच असा विचार मनाच्या आभाळात चमकून जातो न जातो तोच झाडांच्या पानोळ्यात फडफड होते. बहिरी ससाण्याच्या आकाराचे पक्षियुगुल टोकाला निमुळत्या होत गेलेल्या शेपट्यांची हालचाल करीत विलक्षण त्वरेने ऐटीत निघून जाताना दिसते. उत्साह ओसांडीत गरगरीत कंठ व पोटात खड्डा पडेल इतक्या तिडकीनं साद घालीत ते युगुल नजरकक्षेबाहेर पडतं शेष राहते ती लय. कु ऽ हू ऽ जीव डुचमळविणारी, अक्षरशः वेडापिसा करणारी ती अक्षयी लय ऽ कु ऽ हू ऽ ऽ !

या दिवसांत तुम्ही उघड्याबोडक्या माळावर भल्या पहाटेस कधी फिरायला गेला आहात ? गेला असाल तर एक ठळक गोष्ट तुमच्या ध्यानी निश्चितच आली असेल – निसर्गाचं पालटणारं रूप ! श्रावणात खळखळून हसणारे नद्यानिर्झर आता एकटंदुकटं डबक्याच्या खुणा मागे ठेवून निव्वळ दगड–कंकराने व बाभूळ–सौंदड-सारख्या काटेरी झाडाझुडपांनी तुडुंबून गेलेले दिसतात. यत्र–तत्र–सर्वत्र ही भोरटी झाडे नि पानांतून लोंबणाऱ्या टंच पांढुरक्या शेंगा. पर्वतराजांची हिरवाई तर केव्हाच राजापुरी गंगेसारखी लुप्त झालेली. तरीही ' दुरून डोंगर साजरे ' या म्हणीप्रमाणे डोंगर वेगळे सौंदर्य धारण करतात. घडोघडी वेषांतर करणाऱ्या एखाद्या नटाप्रमाणं तो वेगळ्या परिवेषात क्षितिजात ऐसपैस उभा असतो. ऋतुपरत्वे माणसाने रंग बदलवीत असावे किंवा ' ठेविले अनंते तैसेचि राहावे ' या संतवचनाचें नित्य स्मरण करून देत तो ऋतंभर योग्यासारखा ठाम उभा उभाच असतो.

सूर्याचा लाल गोळा क्षितिजाखालून वर सरकू लागतो, त्या वेळी झाडेझुडपे कशी चिडीचिप्प असतात. वारा पडलेला असतो. सारा निसर्गच शांत, विश्रब्ध असतो. सापाप्रमाणं कात टाकीत नवे शरीर धारण करीत असतो. ऋतूच्या स्थित्यंतराचा हा सोहळाही अगदी गुपचूप चाललेला असतो. सरत्या माघाला निरोप देत देत पाहुणा फागून सृष्टीचा ताबा केव्हा घेतो हे कळतसुद्धा नाही. एक आसन्नप्रसव

शांतता सृष्टीत दबा धरून असते.

क्लिनिकच्या व्हरांड्यात अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत असतानाच बंद खोलीतून 'टँ हँ ऽ टँ हँ ऽ ऽ' चे स्वर ऐकायला यावे, तसे काहीसे मग घडते. ह्यावेळपावेतो इतर सामान्य झाडाझुडपांपैकीच तोही एक म्हणून ज्याला दुर्लक्षून आपण पुढे पाऊल टाकीत असतो, तोच एक दिवस ध्यानीमनी नसता आपलं लक्ष वेधून घेतो, ते आपल्या खास गुणवैशिष्ट्याने. त्याला टाळून पुढं जाणंच आता आपल्याला शक्य नसतं; किंबहुना इतके दिवस याच्याकडे आपले लक्ष कसे गेले नाही, याचे आपले आपल्यासच नवल वाटू लागते. वास्तविक त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नसते. मानसशास्त्राचा असा एक नियम आहे की, रंगीत खेळणे मुलांचे लक्ष प्रथम वेधून घेते. सारख्या रंगाची खेळणी लक्ष्यवेध करू शकत नाहीत. आतापर्यंत 'तो'ही या सामान्य सारख्या खेळण्यांप्रमाणे नुसता अडगळीत पडून होता. दुसरे, त्याच्या आगमनाची वर्दी द्यायला काही कुणी एकवीस तोफांची सलामी दिलेली नव्हती! मनात नकळत विचार येऊन जातो – खरंच, जगात चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणतात, ते काही खोटं नाही. फलपर्णादी भारांनी गदगदल्याशिवाय झाडांना पक्षी धरून राहत नाहीत. रंगरूपरसगंधाची उधळण केल्याशिवाय माणसाची काय किंवा वनस्पतींची काय, किंमत नाही. मूल्य गुणसंपदेवर निर्भर असतं. निसर्गाकडूनही दाद मिळते ती सौंदर्याला. माणसाकडून दाद मिळेल ती माणसातल्या किंवा निसर्गातल्या सौंदर्यालाच. नाद, गंध आणि रंगप्राचुर्य हाच अखेर चैतन्य मुखर करण्याचा एकमेव वेधपर्याय असतो. साऱ्या विदग्ध कलांचे अधिष्ठान याच तत्त्वावर आहे, असे तुम्हाला नाही वाटत?

आता हा पळसच पाहा नं! या शेताडीत कालपरवापावेतो उपेक्षित होता. शंखासारखा नुसता उभा होता. विहिरीकडची ती आमराई, बांधावरच्या बाभळी आणि निरुपद्रवी म्हणून शेताच्या ऐन मध्यात अस्तित्व रुजवू दिलेला हा पळस यांच्यामध्ये लक्ष वेधण्यासारखा तसा कुठला फरक होता? इतरांसारखाच त्याला बुंधा, खोड, मुळे, पर्ण, डहाळ्या इ. होते. त्याचा रंग हिरवा होता हेच या पलाशवृक्षाचे सामान्य वर्णन होते. उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहिले तर त्याच्या पसरट पानांचा रानभोजनात पत्रावळीसारखा एखादवेळी उपयोग झाला असेलही; नाही असे नाही. पातळ भाज्या वाढण्यासाठी नाहीतर पाणी पिण्यासाठी त्याची पानं द्रोण म्हणून कृषिवलांच्या कामी आली असतील. पळसाच्या या कमाल उपयोगितेखेरीज त्याच्यात अधिक काही गुणविशेष असतील, असा साधा विचार मनात येणेही कठीण! पण वसंत ऋतूच्या आगमनाबरोबर त्याची सारी काया अचानक लालभडक दिसू लागल्यावर आपल्या ओठांवर नकळत शब्द येऊन जातात,

'अरे! हा कधी फुलला?'

साऱ्या रानभर तो उठून दिसतो. जणू रानचा राजा ! दिवसागणिक तो अधिकाधिक लाल होत जातो. इतका की पुढे तो नखशिखान्त लालेलाल होतो ! मग त्याच्या उपयोगितेच्या माळेत आणखी एक भर पडते. त्याच्या पानांचा रंग करून पोरेटोरे पिचकाऱ्या भरू लागतात. अर्थात शहरातील मुलांना ही पळसाची रंगकिमया ठाऊक नसणार ! बिचारी ! तर सांगायचं काय की, पळसाचं हे सुप्त सामर्थ्य एक दिवस अचानक प्रत्ययाला येऊन जातं. इतकं अचानक की आकाशात तारका कधी डोकावू लागते, हे जसं जाणवू नये !

पळसाला मग वेगळंच परिमाण लाभतं. महाकवी कालिदासापासून तो पंत–तंत–संत कवींपर्यंत त्याचे गुणगाण होऊ लागते. धनुर्धर पार्थाच्या गौर कपोलावर फुललेला क्रोध कवीला या पळसफुलांसारखा भासू लागतो आणि तो क्रोधायमान अर्जुनाचा कसा कायापालट होतो, हे समर्पक उपमेद्वारा सांगू लागतो –

'पुष्पवर्ण नटला पळसाचा । पार्थ ! सावध हो पळ साचा ।'

माळरानावरील या पळसाचे आकार वेगळे. त्याची उंची व फुलण्याची तऱ्हाही वेगळी. कुणी एखादा सरळसोट उभा, कुणी पसरट, तर कुणी ठेंगणाठुसका. कुणी युद्धभूमीवर रणशिंग फुंकणाऱ्या सैनिकाची आठवण करून देतो, तर कुणी वेणीत फुले माळून पाठमोरी उभी आहे असा चकवा निर्माण करतो. एखादा जणू हात उंचावून रक्तपंजा मुद्दाम आपणास दाखवीत आहे, असे वाटते. संभ्रम असा निर्माण होतो की ही बोटं कुणाची ? खुन्याची की संन्याशाची ?

बहुधा संन्याशाचीच. आपल्याच मनाची आपल्याला ग्वाही. संन्याशाच्या हृदयाचेच रंग त्याच्या हातावर फुलले असावेत. नाही तर एवढ्या उघड्यावर पक्ष्यांची चिवचिव व घरटी सांभाळीत खुनी थोडाच बसणार आहे ?

---

मनोरा, पुणे

# ६ गुलमोहोर !

तर या गुलमोहोराच्या अशा किती किती आठवणी ! कधीकाळच्या ताज्या, टवटवीत. आज मात्र वाळून कोळ झालेल्या ! ह्याच्या अस्तित्वासारख्याच !

या उपेक्षित गुलमोहोराचा आताशा कुणीही विचार करीत नाही. पोरापासून थोरापर्यंत सर्व त्याची उपेक्षाच करतात. नाहीतरी ओहोटलेल्या रत्नाकराचं नि ओसरलेल्या बहराच्या झाडाचं कौतुक करणार कोण ? ज्यांचे हात रिकामे नसतात, ते तर तरुण गुलमोहोराचाही विचार करायला राजी नसतात. तेवढी फुरसद नसते त्यांना दैनंदिन व्यापातापात; पण ज्यांचे हात रिकामे असतात आणि डोकी तुडुंबलेली असतात नानापरीच्या विचारांनी, त्यांना जग तऱ्हेवाईक म्हणतं. तऱ्हेवाईकपणाचं जरा सिम्पॅथिटिकली उदात्तीकरण केलं की या तऱ्हेवाइकांना कवी म्हणता येतं. तेव्हा शेक्सपीअरप्रमाणं कवींना वेडयांच्या बाजारात बसविण्याचं कारण नसतं, तर अशा संवेदनक्षम माणसांचे लक्ष हा म्हातारा गुलमोहोर आपल्याकडे ओढून घेतो. ध्यानाकर्षण प्रस्तावासारखा ! म्हणजे ज्यांना असं वाटत असतं की जगात आपला विचारसुद्धा करायला कोणी तयार नाही, त्यांचा विचार करायला लोकशाहीची मूल्ये सदा तत्पर असतातच. आता या गुलमोहोराचेच पाहा ना !

गुलमोहोरानंतर बागेत वाढलेल्या, स्थिरावलेल्या पांढऱ्या चाफ्याची त्याला ईर्षा वाटते. पांढऱ्या चाफ्याला भाऊसाहेबांच्या कादंबरीत वर्णिलेल्या ' हिरव्या चाफ्यां 'ची ईर्षा वाटत असणार. हे चालायचेच; त्यामुळंच गुलमोहोराला तीस वर्षांपूर्वीचे तरुण दिवस आठवतात. कितीतरी स्वप्ने या वयात त्याला पडायची. कितीएक तरुणी ह्याच्या सावलीत पुस्तकमग्न दिसायच्या. या गुलमोहोराला अजून आप्पासाहेबांच्या नायिका त्या काळात वापरीत त्या फ्रांसीसी उंची अत्तरांचा सुगंध येतोय. ज्या माणसांचे नि झाडाचे तारुण्य एकाच काळात मोहोरते. त्याला सर्जनाचा

हालमार्क असतो. असा काळ सदा संस्मरणीय ठरतो; मग माणसांना आयुष्यभर झाडांच्या आठवणी आणि झाडांना माणसांच्या. किती तरुण–तरुणींनी या गुल-मोहोराच्या बुंध्याशी गोड किलबिलाट केला असेल ! आकाशाला गवसणी घालण्याची स्वप्ने पाहिली असतील. गुलमोहोराला जितक्या शाखा आहेत, तितक्या ज्ञाना-र्जनाच्या शाखांचे विद्यार्थी–विद्यार्थिनी या गुलमोहोरातळी आपले भविष्य बनवून गेले. कित्येकांचे प्रेम या तरुण गुलमोहोराच्या सावलीत फुलले, क्वचित फळलेही असेल. प्रेमी युगुले चांदण्या रात्रीच्या सहलीचे निमित्त करून, इथून सुफल संपूर्ण होऊन संसारचक्रात भिरभिरू लागली असतील. त्यांची मुलं–मुलीही आता तरुण झाली असतील. कुसुमानिलांचे त्याच गुलमोहोराखाली पारायण करताना एखादा चुकार शब्द कानांवर पडून जातो, ' अय्या ! ही कुसुम म्हणे आपल्या बडनेरचीच आणि अनिल कुठले ग ?'

' अमरावतीचेच. ' नमुन्या 'तून त्यानी कुसुमला प्रेमपत्रे लिहिली होती. '

' छे गं ! अनिल तर नागपूरचे. ' तिसऱ्या साळुंकीचा आवाज.

' दोघीही चूक. अनिल खरे देऊळगाव–राजाचे. ' चौथी ठासून बोलते.

पण आता केळीचे बाग सुकले आहेत, हे या पोरींना कुणी सांगावे ? गुल-मोहोराला खूप काही सांगावंसं वाटतं, की पोरींनो ! चेहरे बदलले. व्हिकलसमध्येही आमूलाग्र बदल झालाय. काल नऊवारी पातळ नेसून कॉलेजात जाणाऱ्या गोपाळराव जोशांच्या ' कुटुंबा 'चे ते अव्वल दिवस जाऊ द्या; पण नवकथेबरोबरच जन्माला आलेली, साडी नेसून घोडागाडीतून किंवा रिक्षामधून कॉलेजात जाणारी तरुणी कुठे नि आज रेशमी सलवार, कुर्ता जाली का या वर्णनाबरहुकूम स्कूटरवरून येणारी तरुणी कुठे ! उद्याची पिढी कदाचित पायाला उडूयंत्रे बांधून हवेतून तरंगत कॉलेजला जाऊ लागेल ! व्हिकलसची मुळी गरजच संपली असेल. विज्ञानाची ही प्रगती बघायला कदाचित तुम्ही–आम्ही असणार नाही, हा गुलमोहोर मात्र नक्कीच असेल !

ज्या विदर्भ महाविद्यालयाच्या परिसरात हा गुलमोहोर वाढला आहे, त्या परिसराची प्रचंड इडीफाईस त्याने पाहिली आहे. १९२८ सालच्या ' किंग एडवर्ड 'चे विदर्भ महाविद्यालयात रूपांतर केव्हा झाले, हे गुलमोहोर नक्की सांगू शकतो. महाविद्यालयाच्या उजव्या अंगाने आटोपशीर, अगदी अलीकडे बांधलेले टुमदार व्यासपीठ आहे. पाठीमागे असलेला भुताड्या वड तर जुन्या इमारतीच्या काळ्या फत्तरांची दूरदर्शी भूमिकाही निःसंदेह सांगू शकतो. या वडाच्या साक्षीनेच ' लक्ष्मीपुत्रां 'च्या महागड्या गाड्या एकाएकी गायब होत नि मोठमोठ्या शहरांतून त्यांचे स्पेअर पार्टस् विकले जात. खरं–खोटं देव जाणे ! पण त्या आंतरप्रांतीय

टोळीचे हस्तक म्हणून जे कुणी होते, ते भुरटे चोर नव्हते, तर व्हाईट कॉलर्ड, विद्वान असे ' गुरो महाराज गुरो 'च होते, अशी आख्यायिका आहे. असो.

गुलमोहोराने असे काय नि किती पाहिले ? त्याला वाचा नाही म्हणून बरे आहे. श्रीमंतांच्या बिछान्याला आणि गुलमोहोराच्या कट्ट्याला वाचा फुटली तर काय अनर्थ होतील हे सांगता यायचे नाही. या गुलमोहोराने महाविद्यालयाच्या ऐतिहासिक व्यासपीठावरून झडलेले अखिल भारतीय कविसंमेलनाचे सोहळे जसे अंधारात उभे राहून ऐकले, तसे समोरच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाशी एका मदालसेच्या छेडखानीवरून वैरही विकत घेतले. दगड–धोंडे, विजेचे बल्ब आणि लहानसहान स्फोटकांनी महाविद्यालयाचा सारा परिसर हादरून गेला. अश्रुधूर सोडण्यात आला. पोलिसांचा गोळीबारही गुलमोहोराने ऐकला आणि एक तरणाबांड मुलगा या रणधुमाळीची नाहक शिकार बनला ! याच गुलमोहोराने अनेक विद्वान आणि विदुषींची व्याख्यानेही ऐकली. काल रिक्षातून नाहीतर चक्क पायी एम. ए.च्या क्लासला जाणारी विद्यार्थिनी आज प्राध्यापिका या नात्याने स्कूटरवरून येते, ह्यात नवल वाटण्यासारखे काही नाही; पण काळाच्या पाण्यातील सूक्ष्मातिसूक्ष्म बदलदेखील गुलमोहोराच्या चांगले स्मरणात आहेत.

या महाविद्यालयातून चिंतामण द्वारकादास देशमुख घडले, म्हणून काय आंतरराष्ट्रीय टोळीत सामील होणारे स्मगलर का घडले नसतील ? पर्यवेक्षक कॉपी करू देत नाही म्हणून डेस्कवरील आपल्या रोल नंबरवर ' रामपुरी ' ठेवून दहशत निर्माण करणारा एखादा विद्यार्थी प्रतिस्पर्ध्याला पुढे पेपरवेट फेकून मारील, असे भविष्य गुलमोहोराला आधीच दिसले होते, असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती वाटण्याचे कारण नाही; परंतु हाच ब्रह्मचारी पेपरवेट पुढे लव्ह–मॅरेज करण्याइतकी रसिकता दाखवील, किंवा पेपरवेटवरूनच आपली खोड काढणाऱ्या पुरंध्रीला ' फोरास रोड 'ची वाट दाखवील, ह्यात ' ठोशास ठोसा ' या न्यायापेक्षा ' कलगी तुरा ' न्यायच अधिक लागू होईल. गुलमोहोराला जेव्हा या वांड पोरांची केवळ विदर्भाच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या आभाळात वीज चमकलेली दिसली, तेव्हा त्याच्या डोळ्यांतून अश्रू टपटपले होते ! प्रिन्सिपॉल शब्दे, महाशब्दे आणि कवी भवानीशंकर पंडितही जाता जाता या गुलमोहोरावर लुब्धावले होते.

' विदर्भ वाणी ' ऐन भरात आली होती तो काळ. त्या मंतरलेल्या दिवसांत मे महिन्यात नखशिखांत भडकलेला हाच तो गुलमोहोर. त्याच्या गार छायेत कुणाला ' अभंग ' गवसला, तर कुणाला गझल. अभंग मागे पडून गझलेला चलतीचे दिवस आले. मग अभंगाने नव्या वाटा शोधल्या. त्यात त्याला अपेक्षित यशही मिळाले. गझलेला विदर्भातच नव्हे तर तमाम महाराष्ट्रात ध्रुवपद मिळाले. रिक्षावाल्यांच्या

जीवनातील ड्रामॅटिकल अॅप्रोच असलेला ' माणूस ' या गुलमोहोराखालीच घडला ! गुलमोहोराने तो उताटून अनुभवला, व्यक्त केला. त्या दृष्टीने ' जनसाहित्याचे आदिगुरुत्व ' या गुलमोहोराकडेच जाते. एकूण काय की थोरामोठ्यांचे संचित या गुलमोहोरानेच घडविले. व्यक्तिमत्त्वाच्या नाना कळा या गुलमोहोराने जपल्या, जोपासल्या.

आज गुलमोहोराचे ते तरुण दिवस गेले. महाविद्यालयाच्या काळ्या फत्तराच्या उत्तुंग भिंती त्याला तुरुंगासारख्या भीषण दिसताहेत. बागेतील कारंजे भंगले आहे. सारे गुलशनच ओसाडले आहे. कुंपणातून गुरं–ढोरं आणि फाटकातून रस्ते आत घुसले आहेत. या बागेचे वैभवच आज ओसरले आहे. साहित्यसंगीताच्या विदग्ध कलांनी एकेकाळी मोहोरलेला गुलमोहोर आज ' कालाय तस्मै नमः ' म्हणत नुसता हात जोडून उभा आहे !

---

लोकमत, ऑगस्ट, १९८४

# ७ माती, कुंडी आणि कृष्णकमळ !

कृष्णकमळाचं फूल ऐन पावसाळ्यात मिळालं. आवडलं खूप. सहृदयतेनं तिनं मला कृष्णकमळाची कलमं दिली; पण तिनं मूळ धरलंच नाही. कृष्णकमळ आणि वसंत ऋतूत भेटलेला कोकीळ. राशी एकच; परंतु कुंडीतील माती पोषक नसेल म्हणून कदाचित असेल, कृष्णकमळाची वेल माझ्या अंगणी कधी रुजलीच नाही.

दारावरच्या कुंडीत कृष्णकमळ जुन्याच ओढीनं पुन्हा एकदा आलं. त्यानं आसुसून मातीशी सलगी केली. पाण्यात आपादशीर्ष न्हाऊन निघालं ते; पण दुर्दैव ! जराशानं मातीतच मरून पडलं. कृष्णपाकळ्या मिटून गेल्या.

ही आत्महत्या मानसिक ताणातून निर्माण झाली होती, ॲब्सर्डिटी तिच्या मुळाशी आहे, याबद्दल शंकाच नव्हती. तृप्ती मनाची आणि शरीराच्या तृप्तीचा एक क्षण तिनं भोगला होता. दुसऱ्याच क्षणी या तृप्तीपासून आपण दूर गेलो, म्हणजे मानसिक ताण वाढले. मुळांची कुंडीतील मातीपासून फारकत होण्याचा जो क्षण – कामू ज्याला ॲब्सर्डिटी म्हणतो, तोच तिच्या आत्महत्येचाही क्षण – ' This divorce between man and his life, the actor and his setting is properly the feeling of absurdity. '

आश्वासित आणि आश्वासन यांमध्ये झालेल्या फसवणुकीतून ॲब्सर्डिटी येते आणि कुंडीच्या मातीपासून वंचित झालेले कृष्णकमळ असे आत्महत्या करून जाते. या आत्महत्येला समर्थन आहे आणि नाहीही. आत्महत्येच्या समर्थनाची कारणे सोपी असतील–नसतील; पण ॲब्सर्डिटीतून निर्माण झालेल्या या वस्तुस्थितीला आपण नाकारू शकत नाही.

मरून पडलेल्या कृष्णकमळाकडे पाहून मला युद्धोत्तर काळात नावारूपास

येऊ लागलेल्या ' पेरिग्रेनीस 'चे स्मरण होते. आपण लिहिलेल्या पहिल्याच पुस्तकाकडे जगाचे लक्ष केंद्रित व्हावे म्हणून पेरिग्रेनीसने पुस्तक प्रकाशित झाल्यावर आत्महत्या केली. पेरिग्रेनीसच्या या आत्महत्येमुळे लोकांनी ते पुस्तक उघडून वाचले.

परंतु त्या पुस्तकात खळबळजनक असे काहीही नव्हते ! आत्महत्या करताना प्रत्येकालाच भवभूतीच्या वचनाचा आधार घेता येत नसतो. कृष्णकमळाने मातीशी केलेल्या सलगीतून बेहोषीच निर्माण झाली होती. ते मेलेले नव्हते. ॲब्सर्डिटी जमेस धरूनही त्यात जिजीविषेची धुगधुग होतीच.

मरणपूर्व जीवनातल्या लालसा कृष्णकमळात डोकावताहेत, हे पाहून सौ.ने त्याच्या सर्वांगावर गार पाण्याचे सपकारे मारले. कृष्णकमळाचा सवतीमत्सर अजून मावळला नव्हता की ते निरामय झाले होते, हे भ्रमरही सांगू शकला नाही. कमळ आधीच मुक्त झाले. आपल्या पत्रावर निर्मळ जळाचे तुषार खेळवीत.

कारस्थाने रचण्यासाठी जीवनात असे कृष्ण अधूनमधून येत असावेत. मनोमिलनातील ते अडसर बनतात. द्वेष आणि मत्सरातून तो नच साधला तर सूडच त्यांना मानसिक तृप्ती देत असतो. सूड न घेता आला तरीही आत्महत्याच ! घेता आला तरी ॲब्सर्डिटी जीवनभर पाठीवर ब्रह्मराक्षसासारखी !

सत्त्व आणि तमाच्या संघर्षाचे ते पर्व सोडून आपण राजसाची वाट धरावी, तर चिखलाच्या समुद्रातून चालल्याचं त्रासदायक फीलिंग आपल्या पाठीमागं येतं. या प्रवासाला ' लक्ष्य ' नसतं, तशा मुक्कामाच्या जागाही नसतात. मनात एक मुक्काम गच्च धरून जाता जाता स्वप्नात जशा वाटा सैरभैर होतात आणि पांथस्थ आपले मूळ ' लक्ष्य 'च विसरून जातो, तसंच काहीसं ! चालताना वाट चुकली एकदा की माणूस सुरक्षित, साक्षेपी वाटेवर क्वचितच येतो. असे येणे आणि रुळणे योग्यांना किंवा साधुसंतांनाच शक्य होते. निष्ठा आणि एकाग्रतेच्या अभावी तर असे घडत नसेल ?

चेहऱ्याच्या गुंतागुंतीतून आपण वाट काढीत पुढं जावं तर या चेहऱ्याच्या प्रेरणाच शरीरात कुठंतरी चलनवलन करतात, असा प्रत्यय. शरीराशी या प्रेरणांचे संदर्भ अजाणता लपेटून राहत असावे. सूर्यापासून तुटली तेव्हा वसुंधरा अग्नीचा नुसता गोळा होती म्हणतात. कोटचवधी वर्षांनी हा तप्त गोल विझत गेला, थंड झाला !

विश्वनिर्मितीच्या मागे या ज्या सूर्यप्रेरणा होत्या, त्यांचे पृथ्वीला आज स्मरण असेल का ? आपल्या अस्तित्वाचेही तेच. अस्तित्व हे थंड होत गेलेल्या जुन्या प्रेरणांचेच नवे फळ असते. ज्या पाण्यातून, मातीतून हे फळ धारण होते, त्या

मातीचे आणि पाण्याचे आनुवंशिक गुण फळात बीजरूपाने वसत असतात – नाही का ?

म्हणून चेहऱ्यांचे तसे काहीच नसते. ते बदलत असतात. नाना रूपे धारण करतात. परस्परांपासून प्रेरणा घेतात, देतात; पण चैतन्य या प्रेरणांचीही प्राण-शक्तीच असते. चेहऱ्यांचा पुढे चैतन्याशी संबंध उरतो तो शब्दापुरता.

कधीतरी एखादा उत्कट क्षण चैतन्यरसात मिसळून जातो. या क्षणाचे कृष्ण-कमळ चैतन्यरसात मूळ धरून जाते. कुंडी तीच असते. माती तीच असते. ज्या कुंडीत एकदा कृष्णकमळाने आत्महत्या केलेली असते, त्याच कुंडीत दुसऱ्या क्षणी ते जीवनमूळ धरते.

---

नागपूर पत्रिका

# ८ वरातीचं संगीत !

दोन तपांपूर्वीची गोष्ट. रात्र गारव्याची. आकाश निरभ्र. वेळ बहुधा मध्य-रात्रीची. आमच्या गावात त्या वेळी वीज आलेली नव्हती. सारा गाव अंधारात कसा चिडीचिप. अधूनमधून कुत्र्यांची हेल काढून भुंकणी तेवढी. बाकी सारे कसे शांत ऽ शांत ऽ ऽ...

घरसुद्धा पेंगुळलेलं. धूर ओकणाऱ्या चिमणीच्या उजेडी मी भूमितीची प्रमेये सोडविण्यात गर्क. अशातच तंद्री भंगविणारे, एक अंगभूत ' कसक ' असलेले कर्ण्याचे स्वर दुरून ऐकायला येतात. वाद्य बहुधा सेक्सोफोन असावे. मन कसे अस्वस्थ, बेचैन होत गेले त्या स्वरांनी. लोखंडी पत्र्याच्या पेटीत उपकरणे बंद करून मी वही व डोळे मिटून स्वस्थपणे वातावरणाचा कब्जा घेणारे ते सूर ऐकत राहिलो. आवाज तलत मेहमूदचा; पण सूर फक्त सेक्सोफोनवर.

' ऐ मेरे दिल कहीं ओर चल
गम की दुनिया से दिल भर गया,
ढूंढ ले अब कोई घर नया '

नंतरच्या दिवसांत ' दाग ' पाहिला. या चित्रपटाची पटकथा, संगीत अन् गीते मनावर पुढे कित्येक दिवस अंमल गाजवीत राहिली. अमीय चक्रवर्ती, शंकर–जयकिशन, बिमल–दा, दिलीपकुमार, राजकपूर, एकेकाळचे अभिनयसम्राट अशोककुमार ह्यांचा जमाना होता. आपापल्या कलाक्षेत्रात अमिट शिल्प खोदण्यात हे कलावंत दंग झालेले !

चंदेरी दुनियेतल्या अभिनय, संगीत आदी विदग्ध कलांचे पडसाद विशेषत: संगीताचे पडसाद स्टुडिओ–रेकॉर्डिंगनंतर शहराशहरांतून उमटत असतात. गीत

जन्मल्यापासून तो तहत ते तीन–चार वर्षांचे होईस्तोवर रेडिओ वगैरे नसलेल्या व अद्याप 'हिज मास्टर्स व्हाईस'च्याच जमान्यात रेंगाळणाऱ्या आमच्यासारख्या खेडेवजा गावातील लोकांना ते 'नवे'च असायचे. 'नथ्थू ब्रास बँड'ची माणसं रात्र रात्र जागून सीझन गीतांच्या तालमी करीत. अशीच ती एक तालीम-रात्र होती. ग्रामोफोनच्या तबकड्यांवर, क्वचित सात्रकारपुऱ्यातील एखाद-दुसऱ्या रेडिओ-वर ही बँडवाली मंडळी कानांत प्राण आणून ही लोकप्रिय फिल्मी गीतं हृदयात नीट ठसवून घ्यायची. आकाशातून पडलेल्या गारा हातावर सांभाळून न्याव्या, तशा काळाची फॅशन झालेल्या संगीताची तर्ज जपून तालमीवर आणायची. या गीतांचे नोटेशन करायचे रात्र रात्र जागून. एवढ्यावरच संपत नसे. गीताची तर्ज मनासारखी मूळ गाण्याबरहुकूम बसलेली नाही, ही जाणीव त्यांना कमालीची अस्वस्थ करून सोडीत असे. सारा दिवस गीताची तर्ज मेंदूच्या अबोध प्रदेशात कुठल्यातरी घळीत दडी मारून बसलेली असे. ओठांच्या शिळेतून, नुसत्या गुणगुणण्यातून ही तर्ज साकारविण्याचा खटाटोप चाले. तर्ज गवसली रे गवसली की ही मंडळी एकत्र येऊन चिकाटीने कसोशीने बँडवर बसवून घेत. मग रात्र असो की दिवस असो.

संगीत श्रवणाची तुटपुंजी साधनं आणि अपुरी उपकरणं असलेल्या आमच्या गावातील 'वरातीच्या संगीता'चे साधक ज्या वेळी एखाद्या लग्नाच्या वरातीतून वाजत–गाजत गल्लीतून निघायचे तेव्हा आम्हा पोरासोरांनाच काय, बड्या बुजूर्गां-नाही कमालीचा अभिमान वाटे. आजही आमचा हा अभिमान कायम आहे. दूरदुरून लग्नकार्यासाठी आलेली मंडळी हे हुबेहूब फिल्मी गीतांची सवाद्य नक्कल वठविणारे संगीत ऐकून तृप्त होत, थक्क होत. 'नथ्थू बँड'वर इनामाची खैरात करीत.

पुढे काळ बदलला, गाव बदलला. गावात वीज आली. घरोघरी रेडिओ झाले आणि एक दिवस आमच्या 'नथ्थू–हिरा' या (शंकर–जयकिशन किंवा लक्ष्मी–प्यारेसारख्या) जोडगोळीने इंद्रपुरी अमरावतीच्या नाणावलेल्या 'शिख बँड'शी जवाहर–गेटसारख्या भर मध्यवस्तीत अशी वाद्यस्पर्धा केली की, हां हां म्हणता विदर्भातील साऱ्या संगीतशौकिनांच्या जिव्हाग्री 'नथ्थू–हिरा' हे द्वंद्व रूढ होऊन बसले.

वेगवेगळ्या कलाप्रांगणात नैपुण्य संपादन केलेल्या आमच्या गावात ज्या काही चार–दोन अभिमानाच्या जागा आहेत, त्यांपैकी 'नथ्थू–हिरा' हीही एक.

साधारणतः हलकंफुलकं किंवा सुगम संगीत म्हणून आपण ज्याला संबोधतो, त्या संगीताकडे बघण्याची तज्ज्ञांची दृष्टी जरा वेगळी असते. हे अभिजात संगीत नाही; म्हणून त्याकडे उपेक्षित, तिरस्करणीय दृष्टीने पाहण्यात येते; एवंच संगीत, साहित्य, चित्र, शिल्पादी, सर्वच विदग्ध कलाक्षेत्रांत आत्मभान ठेवून कलाघरंदाज

म्हणून मिरविणारी कला या बाजारू कलेपासून पृथक् राहू इच्छित असते. शास्त्रीय संगीताच्या दुनियेत या घरंदाज गायकीला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते. बनारस, ग्वाल्हेर, म्हैसूर, बडोदे या संस्थानांतील निरनिराळी घराणी ' हिंदुस्थानी पद्धती 'च्या संगीतात ' घराण्या 'चा लौकिक सांभाळून आहेत. अब्दुल करीमखाँ, भास्करबुवा बखले, अल्लादियाखाँ इ. संगीताच्या तपोमहर्षींनी भारतीय संगीताची शान वाढविली, मान उंचावली. मोगल काळातही तानसेन व बैजूसारख्या संगीतसम्राटांचा वारसा आम्हाला लाभला, याचा कोणत्या भारतीय मनास अभिमान वाटणार नाही ?

शांतारामबापूंच्या ( व्ही. शांताराम ) ' झनक झनक पायल बाजे ' या संगीत–नृत्यप्रधान चित्रपटाने अखिल भारतवर्षापुढे एक उत्कृष्ट, अजोड कथकलीचे नर्तक म्हणून ' गोपीकृष्ण ' हे नर्तक प्रसिद्धीच्या कळसूबाईवर चढले. त्यांच्या नृत्यसाधनेबाबत आजच्या पिढीचे तरी सर्वोत्कृष्टतेच्या संदर्भात दुमत होण्याचे कारण नाही. पद्मभूषण ना. सी. फडके ' नादलुब्धां 'च्या आठवणी सांगताना ' गोपीकृष्णां 'विषयी असे उद्‌गार काढतात :

' झनक झनक पायल बाजे ' या चित्रपटामुळे प्रसिद्धी पावलेले गोपीकृष्ण यांच्या लोकप्रिय झालेल्या नृत्यांच्या कार्यक्रमात जो नृत्यप्रकार पाहावयास मिळतो, त्याला कथकली म्हणायचं, की मणीपुरी म्हणायचं, की या सर्व प्रकारांचे ( घेडगुजरी ? ) मिश्रण म्हणायचं, याबद्दल जाणत्यांचा काय निर्णय असेल तो असो; मला स्वतःला दिसतं एवढंच, की गोपीकृष्णांच्या नृत्यात धांगडधिंग्याचा आणि कसरतीचा भाग फार आहे. सामान्य अनभिज्ञ लोकांवर एकदम छाप टाकण्या-साठी त्याची गरज कदाचित असेलही. प्रस्तुत मुद्दा इतकात की तुंगा आणि मेनका यांचं जे नृत्य मला बघायला मिळालं ते फार वेगळं होतं आणि त्या काळात (१९२५–२६) उच्च दर्जाचं खरं कथ्थक–नृत्य तेच समजण्यात येत असे. '

पं. रविशंकर आणि विलायखाँ हे आजच्या जमान्यातले फार मोठे सतारिये आहेत ही गोष्ट आप्पासाहेबानाही मान्य आहे; परंतु घडाभर तेल संपलं तरी ' नमन ' दळीत बसण्याचा ' त्यांचा ' उपक्रम आप्पासाहेबाना मान्य नाही. त्या पार्श्वभूमीवर बरकतउल्लाखाँ या त्यांच्या जमान्यातील सतारियाचे मोठे आकर्षक चित्र आप्पासाहेबानी ' हल्लीच्या सतारियांचं नमन ' सांगताना उभं केलं आहे. आप्पासाहेब पुढे सांगताहेत –

' बरकतउल्लांच्या वाजविण्याची जी तऱ्हा मला आठवते ती ' अशी ' – खचित नव्हती. जो रागिणी वाजवायची तिची छाया निर्माण करण्यासाठी आणि हात तापविण्यासाठी लयीतलं ' जोडकाम ' ते करीत, गततोडे वाजवीत; पण

किती ? फार तर वीस मिनिटं ! '

'काशीचे अल्लाबंदखाँ व बाक्सरुद्दीनखाँ या बंधुद्वयांचं गायन म्हणजे त्या काळी विद्वत्ता आणि कलानैपुण्य यांची परमावधी समजली जात असे. त्यांनी गाईलेला ध्रुपदधमार किती श्रुतिमनोहर असे,याचे खुमासदार वर्णन करताना आप्पासाहेबानी म्हटलं आहे –

' ध्रुपद–धमाराचं आलापी गायन कमालीचं श्रुतिमनोहर होतं. आजच्या पिढीतल्या श्रोत्यांनी गायनाची ही तऱ्हा कधी ऐकलेली नाही. दुर्दैवी बिचारे !'

गोपीकृष्णांच्या संदर्भात पद्मभूषण ना. सी. फडके यानी ज्या 'सामान्य अनभिज्ञ' अभिरुचीचा मुद्दा सवंग लोकप्रियतेचा निकष म्हणून उपस्थित केला, त्याचा परामर्श घ्यावयाचा हेतू नाही. शिवाय शुद्ध वा सवंग कलायुगात जन्म होणं हे कुणाच्याही हातात नसतं. प्रत्येक पिढीचा आपल्यापरी साहित्यकलादी क्षेत्रातील सरसतेबाबत दावा असतो. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, जर शास्त्रीय म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या या घरंदाज कलांच्या प्रभावळीत अन्य ललित-कला प्रकारांना काहीच अर्थ नाही तर त्यांच्या निर्मितीचे प्रयोजन काय ? मला वाटतं 'मुळीच नाही' हे या प्रश्नाचे उत्तर नव्हे. हलक्याफुलक्या कलेकडे तुच्छतेने पाहिल्यामुळे एक तर टोकाला जाऊन अतिशयोक्त विधानांनी अशा कलांवर अन्याय होतो, हे आपल्या ध्यानातच येत नाही. दुसरं सर्वसामान्यांच्या अभिरुचीला डावलून निव्वळ शास्त्रीय संगीताच्या रेडिओवर तासन्तास बैठकी होत राहिल्या, तर आजच्या धावपळीच्या काळात लोक रेडिओ ऐकण्याऐवजी कानांतच बोटे घालून बसण्याचा अधिक संभव आहे, नाही का ? या तिरकस दृष्टीमुळे आणखी एक फार मोठा धोका संभवतो. कलाक्षेत्रातही एक प्रकारची वर्णव्यवस्था या उपेक्षाबुद्धीतून जन्मास येते. उच्च शास्त्रीय संगीत व हलकेफुलके Light वा सुगम संगीत, दर्जेदार ललित साहित्य आणि थर्ड रेट अललित लिखाण अशा जातकुळी सर्वच कलाप्रकारांत निर्माण होतात, त्या निम्न कलांकडे पाहण्याच्या अस्पृष्ट दृष्टीतूनच. कलेच्या दैविक विश्वात याच भावनेतून पंथ आणि नाना प्रवृत्तींचा उगम होतो. कलाक्षेत्रात स्थिर स्वरूपाची वर्णव्यवस्था निर्माण होऊन तिचे श्रेष्ठ-कनिष्ठ असे वर्गीकरण अपरिहार्य होते.

उत्पादनाची साधने ज्या मूठभर लोकांच्या हातात असतात आणि त्यामुळं जी समाजव्यवस्था निर्माण होते, त्याचीच प्रत्यावृत्ती मग कलाक्षेत्रातही दृग्गोचर होऊ लागते. संगीतातील या भांडवलशाही व्यवस्थेत बहुजनसमाजाच्या अभिरुचीला जर वाव नसेल, तर आजच्या लोकशाही विचारसरणीच्या युगात या उच्चस्तरीय शास्त्रीय संगीतालाही काहीच अर्थ राहणार नाही; मग ती कला कुठल्याही

मोठ्या घराण्याचा वारसा का सांगत असेना ! किंवा गायक केवढाही महान का असेना ! कारण आजच्या समाजरचनेत सर्वसामान्य माणसाचा ज्या वेळी ' केंद्रबिंदू ' म्हणून सहानुभूतिपूर्वक विचार केला जातो त्या या युगात बहुजनसमाजाच्या आशा-आकांक्षांप्रमाणेच त्याच्या वैयक्तिक अभिरुचीचा विचारही डोळ्यांपुढे ठेवणे क्रमप्राप्त नाही काय ? आणि हे तथाकथित उच्चशास्त्रीय संगीत कितीही दर्जेदार असले, तरी त्याला सर्वसामान्य माणसाची दाद मिळू शकणार नाही, याचे कारण असे की ते सर्वसामान्यांसाठी मुळी नसतेच. काव्यक्षेत्रात ज्याप्रमाणे काही कविता ' मॉब 'साठी असतात व काही समीक्षकांसाठी व अन्य कवींसाठीच असतात, तसेच काहीसे इथे घडताना दिसते.

प्रत्येक युगाला आपलं असं एक वैशिष्टच असतं. नाही म्हटलं तरी कलेच्या क्षेत्रात थोडीफार भर पडत असते. सर्जनाच्या नव्या दिशा उजळताना दिसतात. संशोधनाची प्रक्रियाही अविरत चाललेली असते. अर्थात संगीताचं क्षेत्रही याला अपवाद नसणार. अलीकडे श्यामला भावे नामक गायिका आपल्या गायकीत चित्रराग नामक रागाचा जो प्रयोग करीत आहे, राजपूत शैलीतून चित्र नि संगीत या दोन कलांचा (मिनीएचर पेंटिंग) च्या साहाय्याने मेळ घालण्याचा जो अनोखा, समर्थ प्रयत्न करीत आहे, ती प्रतिभेच्या जिवंतपणाची खूण नाही का ? शिवाय आप्पासाहेबांच्या युगाने रूढ राग-रागिण्यांवर प्रभुत्व मिळविले असले तरी आजची संशोधनप्रचुरता त्या काळच्या गायक-गायिकांत, नृत्यसाधकांत, वाद्यांच्या हजारो लकबी काढून दरवेळी नवनव्या सुरावटी निर्माण करण्यात आजच्याइतका ' काल ' संपन्न होता का हा प्रश्न शिल्लक राहतोच ना ? ' कैसे आऊ जमुना के तीर ' ही स्वरसाम्राज्ञी लतेच्या आवाजातील ' देवता ' चित्रपटातील ' काल 'ची भैरवी नि ' हर जनम यूँ मीलते रहेंगे । प्यार अपना रहे सदा जवाँ । हम सुख-दुख मील के सहेंगे - वादा करलो बालमा तेरे बिना मैं न रहूँ ' हे ' हाथ की सफाई ' या चित्र-पटातील महंमद रफी व लताने मिळून गायिलेलं - जे दक्षिण भारतीय संगीत पद्धतीतील ' बसंत-मुखाडिया ' रागावर बांधलेलं आहे, ज्याचे कोमल, वृषभ, निषाद व धैवत हे स्वर भैरवस्वर आणि उर्वरित भैरवीचे स्वर आहेत, ते आजच्या जमान्यातील ' हिट गीत ' ( आणि जे वरातीचेही लाजवाब संगीतसुद्धा ) आहे, ते एवढे लोकप्रिय का ?

' मुरलिया काहे गुमान करे ' हे सूरदासाचे भजन आपल्या अभिजात गायकीने लोकप्रिय करून दाखविणारे संगीत-दिग्दर्शक, गायक मानस मुखर्जी किंवा अनूप जलोटा, मानस मुखर्जींच्याच संगीत निर्देशनाखाली मुखर्जींवरही तानाशाही करून जाणारे चेतन, सतीश भुतानी हे गायक आजच्या जमान्यात झपाट्याने लोकप्रियतेच्या शिखरावर चढत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विशेषतः आनंद बक्षी आणि

लता – आशा – मुकेश – मन्नादा व लक्ष्मी प्यारे किंवा मदनमोहन, इंदिवर आणि ही पुन्हा हाच गानवृंद एकत्र आला की सरासरी जी निर्मिती होते – मग ते द्वंद्वगीत असो, निव्वळ विरहगीत असो किंवा सूर – कबीर – मीरेचे एखादे भजन असो – ही अपूर्व रचना आपल्या श्रुतिमधुर चालीने, हृदयाची पाकळीन्पाकळी उलगडणाऱ्या अर्थसंहितेने हां हां म्हणता अल्पावधीतच गगनस्पर्शी उंची गाठून जाते. वरातीचे संगीत वर्षानुवर्षे या गीतांचा नादमधुर आविष्कार करून रसिकवृंदाला पुनःप्रत्ययाचा, पण कधीही जुना न होणारा आनंद प्राप्त करून देत असते.

मराठी गायकांत पंडित भीमसेन जोशी, सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर – ( या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का ? ), जितेंद्र अभिषेकी ( सर्वात्मका, सर्वेश्वरा ! ) या व यासम अनेक नावांनी शास्त्रीय संगीताबरोबरच सुगम संगीताचा दर्जा वाढविला असे आज निःशंकपणे म्हणता येते. लताबाईंच्या गीतांना ज्या ज्या वेळी हृदयनाथ मंगेशकर संगीत देतात, त्या वेळी निश्चित समजावे की एक नितांतसुंदर, वैशिष्टचपूर्ण असे प्रतिभेचे अपत्य जन्म घेते आहे !

जुन्या आणि नव्या जमान्याच्या सीमारेषांवर उभे राहून आपल्या अस्सल गायकीची, ठेवणीतल्या चिजांची आम रसिकवृंदास ओळख करून देणाऱ्या अमीरबाई कर्नाटकी, बेगम अख्तर, मा. कृष्णराव, दीनानाथ मंगेशकर यांच्या शास्त्रीय गायनाबरोबरच हलक्याफुलक्या किंवा सुगम संगीताचा दर्जा वाढविणाऱ्या लता मंगेशकर (पैलतोगे काऊ काकताहे), सुमन हेमाडी (कल्याणपूर) – 'रिमझिम झरती श्रावणधारा,' रामदास कामत, विठ्ठल शिंदे, प्रभाकर कारेकर, महंमद रफी (शोधीशी मानवा), निर्मला नामजोशी (भज मन गोविंद – मनोहरनाथ महाराज) सुगम गायक–गायिकांची ही यादी सोदाहरण द्यायची झाली तर कितीतरी पृष्ठे भरून जातील. अखेर सर्वसामान्यांच्या अभिरुचीचे प्रतीक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजने, त्यातील संगीत–काव्यादी गुणांच्या लालित्यामुळे, कमालीच्या लोकाभिमुखतेचे जनमानसावर नोंदलेले एक कायम वैशिष्टच म्हणून स्वतंत्रपणे निर्देशिता येईल.

हलक्या–फुलक्या गीतांचे प्रयोजन आता मला वाटते बव्हंशी स्पष्ट झालेच आहे. संगीताच्या प्रांतातील तो एक लालित्यपूर्ण अनुभव म्हणून त्याची गरज सर्वस्तरीय आहे. संगीताच्या फुलबागेत थयथयणाऱ्या रंगीत कारंजाचे भावतुषार म्हणजे ही हलकीफुलकी गीते. सर्वसामान्य माणूस अंतःस्फूर्तीने ज्यांना साद व दाद देतो, जी बहुजनसमाजाची व केवळ बहुजनसमाजासाठीच असतात, तीच ही सुगम गीते. आपलाच भूतकाळ आपल्याभोवती साकारवून एक तृप्त, थबथबता पण रक्तात थिजलेला अनुभव वितळवून, एका वेगळ्या, प्रसन्न आणि मनजोग वातावरणात मानवी मनाला नेऊन सोडण्याची किमया जर कुठल्या संगीतात आहे असे मला

कुणी विचारले, तर मी खुशाल या 'वरातीच्या संगीता'कडे बोट दाखवीन. परिणामाच्या दृष्टीने ज्वालाग्राही म्हणून या संगीताचा उल्लेख करता येईल. संगीत-शौकिनांच्या भावविश्वात सौंदर्याची चिरशिल्पे खोदणारा हा नादानुभव म्हणूनच मला त्याज्य किंवा तिरस्करणीय वाटत नाही.

---

मुंबई तरुण भारत, संगीत विशेषांक, १९८७

# १ बासरी

ज्यांच्याकडं पुनःपुन्हा वळून बघावं, अशी माणसं नि स्थळं जशी जीवनात येतात, तसे काळाचे काही स्मरणीय तुकडेसुद्धा येतात. ऐन भरात काळाच्या चौकटीत अविस्मरणीय दिवस फुलपाखरांसारखे बागडत असतात. पारव्यासारखे गतायुष्याच्या कडेला बिलगून हुंकारत असतात. हे हुंकारणे आयुष्याच्या प्रवाहात माणसाला अधूनमधून स्वप्नासारखे ऐकू येत असते.

या हुंकारण्यालाच मी ' बासरीचा नाद ' म्हणतो आणि शब्दद्वयर्थी बनतात. नाद म्हणजे आवाज. अर्थात हा विशिष्ट आवाज आवडत्या पारव्यांच्या हुंकारण्याचाच ! छंद म्हणजे नाद; आणखी नाद म्हणाल तर बासरीचाच.

एके काळी ' तुतारी 'ची कला समाजपरिवर्तनाची दिशा ठरली. हा युगप्रवर्तनाचा इतिहास वगैरे झाला. ' तुतारी 'चे स्मरण अशासाठी की वाद्यावाद्यांचे स्वरूप संगीताच्या काय किंवा विदग्ध कलांच्या काय, वाटचालीत कसे विवाद्य होत जाते... एखादे युग विप्लवाच्या ' तुतारी 'पासून स्थैर्याच्या ख्यालीखुशालीपर्यंत येऊन पोहोचते, तेव्हा प्रवास होतो तो मूर्ताकडून अमूर्ताकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे, सामान्याकडून विशेषाकडे, सान्ताकडून अनंताकडे आणि लौकिकाकडून अलौकिकाकडे !

' हा छंद बासुरीचा ' ज्या काळात मी जडवून घेतला तो सत्तावन्नचा काळ होता. या काळाला मी ' सत्तावन्नचे आकाश ' म्हणतो; कारण याच वर्षी माणसाने अंतराळविजयासाठी मुहूर्तमेढ रोवली. नंतरच्या संवत्सरात आकाशातून शेकडो उपग्रह भ्रमण करीत राहिले; पण ' सत्तावन्नच्या आकाशा 'ची सर नंतरच्या दिवसांना आली आहे, असे कधी कधीही जाणवले नाही.

सुप्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर एकदा आकाशवाणी मुंबई केंद्रावरून आपल्या मुलाखतीत म्हणाले होते, 'आपण काय व्हावे नि काय होऊ नये हे ठरविणार आपण कोण ? ते प्रारब्धच ठरवीत असतं.' तेंडुलकरांचं हे विधान आज खूपसं जाणवतं – पटतं. निदान मला तरी !

माझं स्वप्न होतं – गायक व्हायचं ! अगदी महंमद रफींच्या तोडीचा गायक. रफीसाहेबांसारखा पहाडी, पल्लेदार आवाज कमवायचा तर 'परहेज' करीत होतो. तेल–तूपादी स्निग्धे आहारातून वर्ज्य केली. चिंचा, बोरे खाणे सोडले. पेरूचे मोसम आले नि गेले. तिखटावाचून भागेना म्हणून नावापुरते ते खायचे.

– तर आवश्यक ती 'रिहाज' मी अभ्यासाला बैठक मारण्यापूर्वी करीत असे. त्या काळात वर्धमान नावाचा शाळामित्र गॅदरिंगला स्वतंत्रपणे गायचा... 'ये रात, ये चाँदनी फिर कहाँ ? सुन जा दिल की दास्ताँ !' हेमंतदाची सही सही नक्कल म्हणजे वर्धमान असे समीकरण त्या काळात रूढ झालेले. महंमद रफीच्या आवाजाची नक्कल तर मीही आपला घरच्या घरी करीत असे. आमच्या पडक्या वाड्यातून माझा 'बैजू बावरा' ते 'बसंत बहार' असा गीतप्रवास दशकावर होत राहिला. 'जिस देशमें...' च्या सोनेरी, विजयी वर्षात चतुर्भुज झालो आणि माझे 'टीन कनस्तर, पीट पीटकर, गला फाड़कर चिल्लाना' संपले ते कायमचेच !

शांततेच्या डोक्यावरून अख्खी वर्षेच्या वर्षे घरंगळत गेली. असा किती काळ व्यतीत झाला कुणास ठाऊक ! मग मला पुन्हा विसरलेले गाणे रिवाईव्ह करावेसे वाटले. आवाजापेक्षा एखादा साज निवडावा या विचारात मी होतो. माऊथ ऑर्गन, हार्मोनियम, बासरी या आटोपशीर वाद्यांपैकी मी बासरीचीच निवड केली, ती एका प्रासंगिक घटनेमुळे !

प्रकाश – माझा चुलत भाऊ त्या वेळी अमरावतीच्या 'शिवाजी' कॉलेजात प्री–आर्टस्‌ला होता. 'नमुन्या'त तो भाड्याची खोली घेऊन अभ्यासाबरोबरच बासरीचीही तालीम करीत होता. 'तू बासरी शिक.' प्रकाश मला आवर्जून सांगत होता... 'बाथरूम-सिंगर आहेसच, तेव्हा सूर लवकर गवसेल.' प्रकाशची प्रगती 'मदर इंडिया'तील 'दुनियामें हम आये है तो'पर्यंत होती. तो मला म्हणाला, 'भाऊ सा–रे–ग–म–प–द–नि–सा च्या फंदात नको पडूस तू. स्वर कुणी शिकवून येणार नाहीत. ते आपोआप गवसतात सरावाने.'

प्रकाशने दिलेला बासरी–मंत्र घेऊन मी गावाकडं परतलो. देशपांड्यांच्या वाड्यातून पिठुरी अमावास्येच्या पाडव्याला निघणाऱ्या 'द्वारका'च्या बैलांच्या यात्रेतून एक लाकडी बासरी – वूडन पाईप – मी खरेदी केली आणि काय आश्चर्य !

थोड्याच प्रयत्नानंतर मला जुजबी सूर गवसले. त्यात रोज अधिकाधिक सफाई, बिनचूकपणा आणण्याचा मी कसोशीने प्रयत्न करू लागलो. प्रकाश जेमतेम 'नागीन 'च्या जमान्यात लटपटत असतानाच मी 'फागून' उल्लंघून 'नया दौर' पर्यंत मजल मारली.

उत्साह ओसंडून वाहू लागला. बासरी मिळेल, तिथे सूर असा प्रदर्शनाचा रोगच मला जडला. एस. टी. सी.चा क्लास सुरू होण्यापूर्वी, 'राजेश केशकर्तनालया 'त नंबर येईस्तोवर काळवेळ न पाहता मी सुरांना आळवू लागलो. एकंदरीत माझ्या प्रकृतीला बासरीचे सूर 'फिट्ट' बसले होते. अर्थात

'एक बासुरी द्या मज आणुनी
फुंकीन जी मी स्व-प्राणांनी
मोहुनी टाकीन अवघी गोकुळे'

असे कोंभ महत्त्वाकांक्षेला फुटू लागले. त्या वेळी 'ठाकूर आणि कंपनी 'त पितळेच्या कोऱ्या चकचकीत डबल बी.च्या बासऱ्यांचा संच आला होता. प्रगतिप्रदर्शनाचा मोहही होताच. मग 'प्रभात 'च्या पहिल्याच मोटारने ( एस. टी.चे युग तेव्हा सुरू व्हायचे होते.) मी अमरावतीस निघालो. अंबादरवाजापासून पायी चालत 'नमुना' गाठला.

दरम्यानच्या काळात प्रकाशनेही सूरविजयाचा आसुसून प्रयत्न केला होता. त्याचा मामेभाऊ म्हणजे 'डॉन स्पोर्टस् 'वाल्या मोठ्या मामांचा सुरेश बासरीविशारद. प्रकाशच्या खोलीवर बासरी वाजविण्यात त्याचे तासचे तास निघून जात, त्यामुळे साऱ्या 'नमुन्या 'चे लक्ष प्रकाशच्या खोलीवर केंद्रीभूत झालेले. खिडक्यादारे बंद करून ही 'रिहाज' चालायची; त्यामुळे आत नक्की कोण बासरी वाजवतंय ते कळायला मार्ग नाही. या गोष्टीचा लाभ प्रकाशने उठविला. 'आत आपणच बासरी वाजवीत आहोत,' असा आभास निर्मिण्यासाठी बासरीचा पॉझ साधून एकदोनदा तो गच्चीकडे चक्कर टाकून यावयाचा. त्याच्या अपेक्षेप्रमाणे फ्रिझरियाचं फूल नळावर उमललेलं दिसायचं.

हलकेफुलके पाय, काळेभोर मखमली डोळे आणि विस्कटलेले कुंतल, गुबगुबीत उरोज, खुळे डोळे त्या सौंदर्याशी सलगी करायचे, या बासरीच्या अव्यापारेषु व्यापारावर. पण जाऊ दे. बासरीच्या संदर्भात आणि सुरांच्या वलयात काय होऊ शकते, एवढेच बघावयाचे. बाकी सर्व यॉक अँड बुल स्टोरी !

एक गोष्ट बरीक खरी. 'सा–रे–ग–म 'पासून प्रकाशची जय्यत तयारी होत होती, ही गोष्ट माझ्या स्पर्धाळू मनःस्थितीबाहेर राहू शकली नाही. आवश्यक

ते सूरज्ञानही त्याने मिळविले होते. उदाहरणार्थ, प्रातःकाली फुलणारे राग कोणते, गांधार आणि निषाद, जोगीया आणि गुणकली ह्यांतील सूक्ष्मातिसूक्ष्म भेद –

'गुणकली आणि जोगीया परस्परांपासून वेगळे ओळखणे कठीणच,' प्रकाश अहिस्ते-अहिस्ते मला रागांची माहिती पुरवू लागला, 'ते' ओळखायला संगीताचा कान आणि जुजबी का होईना, संगीतज्ञान पाहिजे.

'याशिवाय गा फॉर गांधार, प फॉर पंचम, नि फॉर निषाद –' प्रकाशच्या या रागविषयक ज्ञानाने मी त्याच्यापुढं नतमस्तक झालो. भैरवापासून भैरवीपर्यंत पोहोचणं कसं स्वान्तः सुखाय आहे हे मला त्यानं मनापासून समजावून सांगितलं. त्या वेळी मी इतका प्रभावित झालो की, प्रकाश मला द्वारकाधीश श्रीकृष्णासारखा बासरीनिधान वाटला आणि मी आपला 'सुदाम्याचे पोहे' घेऊन त्या स्वरश्रीमंत माणसाकडे धूपदौड करीत आलो होतो. माझी मलाच लाज वाटली.

'सत्तावन्नच्या आकाशा'खाली सूरांचे काही जादूगार नवी सुरावट करण्यात गढून गेले होते. रामकली, देशकार, बसंत–मुखाडिया आणि जयदेव, अनिल-विश्वास – सचिनदेव बर्मन, सी. रामचंद्र, नौशाद आणि शंकर–जयकिशन. निर्मिती आणि निर्मात्यांची या 'सत्तावन्नच्या आकाशा'खाली जणू पैज लागलेली. खरं तर नौशादचे 'मडकी वैशिष्ट्या'चे दिवस संपुष्टात आलेले. मग ते कितीही हिंदुस्थानी असोत ! सत्तावन्नचे सारे आकाशच शंकर–जयकिशन या जोडीने कवेत घेतलेले. आम्ही तर या जोडीला कौतुकाने 'सत्तावन्नचे सम्राट' म्हणत असू. 'बसंत–बहार' चित्रपटातील 'मैं सैंया तोरी, तू माने या न माने' या लतादीदींच्या गीताचा पन्नालाल घोषांच्या बासरीशी जो स्वरमेळ झाला, तो तसा स्वरमेळ आजवर कधी ऐकला नाही. घोषांची बासरी काळजात घर करून बसली. त्या सुरांचे अनुकरण जन्मजन्मांतरी आपल्याला नाही जमायचे, या विचारामुळे मी त्या वेळी खूपच खंतावलो.

आज या इकडच्या बाजूने खोलवर मुळं रुजवून बसलेल्या नदीच्या प्रशस्त कड्याला भिडून नदीचे वाहणे होते. आपला मुख्य प्रवाह अडवून धरणाऱ्या काठाशी ती कलकलत राहते; पण क्षणभरच. परिस्थितीचा अंदाज घेत ती पुन्हा लवचिक होते. पलीकडे जाणे शक्य नाही, म्हणून दक्षिणेला वळण घेते. हे वळणही सुंदर असतं. अलीकडे हजारो विची अंगावर रोळवीत गर्भवतीच्या संथ–मंथर चालीने वाहणारी नदी वडाच्या पारंब्यांजवळ कड्याचा एकूण कणखरपणा ध्यानी आल्यामुळं गर्रकन गिरकी घेऊन दक्षिणाभिमुख होते – हाही एक सौंदर्यानुभवच.

हाच सौंदर्यानुभव 'बिलावल रागा'तील बिस्मिल्लाखाँची सनई, पं. रविशंकरांची सतार, मा. अजमिरी यांची गिटारही देऊन जाते. अखेर उरते कोण ?

तर पन्नालाल घोष. घोषांचे बासरीवादन ऐकणे हा एक अपूर्व अनुभव आहे. आकाशवाणीवर बासरीची एखादी लोकधून किंवा कार्यक्रम बदलण्यापूर्वीची मिनिट–अर्धमिनिट वाजणारी ' सिम्बॉल टयून 'ही लक्ष वेधून घेते, तिथे घोषांच्या बासरीतून निघालेली स्वरयात्रा – स्वरांची दिव्य–प्रदीर्घ महफिल; ही मैफल नुसती ऐकण्यासाठी पुनर्जन्म घ्यावा, असे कुणाला वाटले तर नवल वाटण्याचे कारण नाही.

माझी बासरी केव्हा सुटली, हे आज निश्चित सांगता यायचे नाही. मात्र घोषांच्या बासरीचे संमिश्र जग अजून कानांमनात घुमते आहे. हे सूर, सुरांची ही दुनिया कशी होती ?

एखाद्या कवितेचा आशय शब्दांत पकडणे कठीण असते, तशी ही बासरी. मी या सूरसंदर्भात एवढंच म्हणेन – वर्फाच्या शुभ्रधवल शाली पांघरून बसलेल्या उंचच उंच गिरीशिखरासारखे हे स्वर ! कधी दुरातून ऐकायला येणाऱ्या लाटांच्या कुजबुजण्याचे संकेत या सुरांना असायचे, तर कधी ते चुकलेल्या वासरागत हंबरायचे. कधी ते फुलामागे गंध दरवळत राहावा तसे अलगद तरंगायचे .. या स्वरांना कधी महापुराची प्रमाथी मुद्रा असे, तर कधी मेंदूच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविणारी विशीर्णता !

केव्हा, कसा, कोण जाणे, स्वरांचा एक सुसंवादी ओघ सागरौघात आणि सागरगाजेत मिळून–मिसळून गेला. हलत्या–डोलत्या जलपृष्ठात विलीन झाला !

---

आकाशवाणी, नागपूर, १९८७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३५३६ निबंध

# १० पाच शतकांनंतरचे आकाश !

माहे नोव्हेंबर ते फेब्रुवारी. मराठी महिन्यांचाच हिशेब सांगायचा तर सरत्या कार्तिकापासून फाल्गुनापर्यंत टेहळणी. आधी आपण अशी टेहेळणी वगैरे करीताहोत ह्याची दखलसुद्धा नसते. मग ही हेतुपुरस्सरता येते कधीपासून ? दरवर्षी तिन्ही ऋतूंत हिरवाकंच सळसळणारा पळस फेब्रुवारीच्या मध्यावर कधी तरी, केव्हा तरी लालेलाल होतो, तेव्हा पोरांपासून पाखरांपर्यंत सर्वांनाच कोण कवतिक ! कदाचित पळसाच्या फुलण्यापासूनच मनाच्या तारा झंकारत असाव्या. मन आतून सावध होत असते.

एकूण ही हेतुपुरस्सरता बहरत्या फाल्गुनातून येत असते. डोक्यावर आकाश तेच. सूर्य तोच. चंद्र व तारेही तेच; पण या रानसान्निध्यात, निवासस्थानासमोरून बिचकत, रडत रखडत वाहणाऱ्या तटिनीच्या सहवासात चंद्रसूर्याचे, ग्रहताऱ्यांचे नागर रूप आदिम होत जाते. आपण या नदीकिनारी चार महिन्यांपूर्वी आलो, तेव्हा सूर्य दक्षिणायनात होता. सूर्याला अर्घ्य देताना ते हटकून जाणवायचं. जुनाट चिंचेच्या दाट पसाऱ्यातूनही सूर्याच्या दैनंदिन हालचाली, त्याचे उत्तरायणात शनैः शनैः सरकणे जाणवते.

आपले नि सूर्याचे असे परस्परविरुद्ध दिशेने स्थानांतर झाले आहे ! आकाशाविषयीही या चार महिन्यांत बोलता येण्यासारखे बरेच काही आहे. सर्वांत महत्त्वाची घटना ही की, आमच्या स्थलांतरामुळे आम्हाला डोक्यावर एक नवे आकाश मिळाले. या नव्या आकाशामुळे चंद्र – विशेषतः चतुर्थीचा उपाशी चंद्र कधीतरी डोळा चुकवून भलत्याच दिशेने वर येतो, असे मिसेस्चे ठाम वगैरे मत. स्थलांतरामुळे आपल्यालाच दिशाभ्रम होतो, हे ध्यानात आल्यावर ती खजील होते. चंद्राचे घडीघडीने चिंचेच्या झावळातून दररोज वर येणे चाललेलेच असते.

या वर्षी तर चंद्रासोबत नवग्रहही होते. एव्हरी डॉग हॅज हिज डे हेच खरे. मागे या आकाशात स्कायलॅबचा दरारा होता नि कालपरवा नवग्रहांच्या युतीची भीती. जलप्रलय, भूकंप आणि जगबुडीच्या दिवशी अमरावतीच्या मुक्कामात पहाटे पहाटे मला जाग आली. समोर पाहिले तर हा एवढा टपोर शुक्रतारा ! टपोर आणिक तेजस्वी. काही पळे मी सारखा शुक्राकडं बघत राहिलो आणि अकस्मात तो मावळल्यासारखा झाला. प्रथम वाटले ते शुक्राचे लुकलुकणे असेल. काही सेकंद गेले नि पुन्हा शुक्र पूर्वीसारखाच टपोर नि तेजस्वी दिसू लागला. असेच पळ दोन पळ तो प्रकाशत राहिला. परत लुप्त झाला. मघासारखाच ! आता माझी खात्रीच झाली की, शुक्राला काहीतरी झाले आहे. आकाश तर सारेच निरभ्र आहे; मग शुक्र गेला कुठे ? मी कुणाला हाक मारली नि जागले कोण ! साऱ्या नारायण-नगरात मी मुक्कामाला असलेले आख्खे घर जागले. तितक्यात पुन्हा शुक्रतारा आपल्याला जणू काही काहीच झाले नाही, अशा आविर्भावात लुकलुकू लागला. लहान-थोर परसदारी आले. शुक्र न्याहाळू लागले. तो नानाचे लक्ष पश्चिमेच्या आकाशाकडून धावणाऱ्या दोन ग्रहांवर केंद्रित झाले. 'मामा, मामा ! बघा, चांदण्या धावताहेत.' नाना उद्‌गारला, 'अरेच्च्या ! खरंच की !' दोन चांदण्या रेसमध्ये सर्वांत पुढे होत्या. तीन मागेपुढे धावत होत्या. प्रथम मला वाटले उपग्रह असतील ते. पण मग खात्रीच पटली की, ते नवग्रह तापसांच्या जथ्थ्याप्रमाणे एकीकडून चालले आहेत.

पाच शतकांनंतरच्या या आकाशाला आता जुने कसे म्हणावे ? मला प्रश्न पडला या पिढीतला माणूस अभागी कसा ? पाच पिढ्यांनी जे आकाश पाहिले त्यापेक्षा आम्ही पाहिलेले आकाश कितीतरी आगळेवेगळे. संहार नि सर्जन ! या संशयचक्रातून हळूहळू मुक्त होणारे...

तात्पर्य काय की या चार महिन्यांत माझेच स्थलांतर झाले असे थोडेच आहे? सूर्याचे स्थलांतर झाले, चंद्र–ग्रहांचे आणि ऋतूंचेही स्थलांतर झाले. स्थलांतरामुळे विकास होतो की विनाश ? स्थलांतर सुखदायी की दुःखदायी ? शुभ की अशुभ ? असे तर्कवितर्क मागाहून येतात. स्थलांतरामुळे सृष्टीत बदल घडत नाहीत. दृष्टी बदलते. ऋतुपालट झाल्यामुळेच दृष्टीत हेतुपुरस्सरता येते, हे आता नव्याने समजले.

इथल्या मुक्कामाची थड लागल्यापासून सारे शहरी रंगढंग पुसट होत गेले आहेत. नदीकाठाने भटकण्याचा दैनंदिन छंद वाढतच आहे.

जुने छंद सुटून नवे संस्कारछंद सुरू होण्याचा हा संधिकाल. आज नागरते-कडून ग्राम्यतेकडे वळावे की ग्राम्यतेकडून नागरतेकडे, हा विसाव्या शतकाला एक प्रश्नच आहे.

कुणाला काही वाटो, माझे तर या स्थलांतराने एक ठाम मत झाले आहे की, स्थितीतून गतीत उत्क्रांत व्हावयाच्या जागा या नदीच्या किनाऱ्यावर आहेत. उद्या वर्षाकाळ येईल तेव्हा दगडाधोंड्यांनी अक्षरश: उघडे पडलेले नदीचे हे पात्र तुडुंबत जाईल. यौवनाचा वेग आणि आवेग झाकोळू लागेल. छातीत कळा निघू लागल्या की, नदीचा सदासांगाती संभालू तुम्हाला सांभाळून घेईल. ढोरापोरांची मोडलेली हाडे नदीकाठावरच्या या संभालूनेच कैकदा जोडली आहेत. रानमंजिऱ्यांच्या उग्र-मादक दर्पाने ' चिलटचा मोहा 'ची गतिचक्रे तोडली आहेत. चिलटांची गतिमान वर्तुळयात्रा परिघताना चिंचेपल्याड अदृश्य होत गेली. पंचतारांकित हॉटेलातल्या नॉनव्हेज डिशेसना बाजूस सारणाऱ्या मुरमाट्या नि फणस या नदीच्या काठावर आहेत.

इथल्या झाडांच्या जाती विविध. एकटी बाभूळ जरी उदाहरणादाखल घेतली तरी प्रचीती अशी येईल की, हिरव्याकंच पानात लांबट, फडफडीत शेंगांनी लद-बदलेली ती वेडी बाभूळ असते. बंगाली बाभूळ आपल्या विषारी काट्यांविषयी दबदबा निर्माण करून आहे. मेढीवरची मुरमाटी शहरी जीवनसत्त्वांची आवश्यकताच नाकारीत आहे. माणूस प्राण्यांच्या हिंसेपासून परावृत्त झाला तर त्याच्या जिभेवर आपल्या फुलांची चव ठेवायलाही ती राजी होईल. किती जिज्ञासूंनी बाभळीचे मनोगत जाणले असेल ? कितीएकांना या बोरीबाभळींचे आकारविकार विशद करता येतील ? फाल्गुनमासाच्या या उल्हासातही प्रसूतीनंतर निश्चेष्टता आल्या-सारख्या बोरी, त्रिकोण–चौकोन–पंचकोन करून बसलेल्या नदीकाठावरील विविध झाडांच्या बहुभूजाकृती शब्दांच्या पिंजऱ्यात न गवसणाऱ्या कवितेसारखे त्यांचे आकार !

या आकारांनी ही सृष्टी साकारली आहे. विधात्याने ही सृष्टी निर्माण केली; पण दुरातून आपल्या पिंगट, लखलखीत पानांनी आंबेमोहराचा आभास निर्माण करणाऱ्या या ' काऊ 'च्या झाडावर मधमाशांनी विश्वामित्रासारखी प्रतिसृष्टी निर्माण केली आहे, हे फक्त गावातल्या टग्या पोरांनाच ठाऊक आहे. वादळाच्या रात्री या चिंचेखाली विजेऱ्या डोळे टवकारून चिंचेची बाटुकं शोधतात. फळण्याच्या ऋतूत गोफणगोटे झेलण्याचे कष्ट या जून चंद्रसूर्य खेळविणाऱ्या चिंचवृक्षाच्या भाळी लिहिले आहे. पुन्हा प्रश्नच. या झाडापासून, या नदीपासून माणसाला सोशिकता नाहीच का शिकता येणार ? बोऱ्याबाभुळांनी दिलेले दान आणि तत्त्वज्ञान उच्च मनोवृत्तीने नाहीच का स्वीकारता येणार ? ओंजळीत कवटाळून नराने या नदीचा पाणवठा करून सोडला आहे. कोळ्यांनी तिला मत्स्यागर समजून दगडांचे बांध घातले आहेत. माणसांच्या अशा तऱ्हा तर गुरांविषयी काय बोलावे ?

कितीतरी मुके प्रश्न नदीकाठच्या आसमंताने बोलके केले आहेत. आसमंतातील

महारुखाचे एकटं झाड, साचीच्या स्तूपाचा आकार चोरून बसलेली बोर, नवतीच्या लाल लाल जिव्हांनी लवलवणारे रिठ्याचे झाड, झाडांची ही उभी दुनियाच जणू मानवी समस्यांवर अभिजात तोडगा म्हणून उभी ठाकली आहेत. झाडांची ही चित्रलिपी कुंचल्यात पकडता यायची नाही की शब्दांत गवसणार नाही. निसर्गाने कलेला आपल्या बाह्य ठळक रूपाशी सलगी करू दिली. त्याचे आंतरिक आशय जडसृष्टीचे रहस्य – अनुलगडनीय कोडे म्हणून कलेनेही त्याचा नाद सोडला. कलेला अशा मर्यादा आहेत, उलटपक्षी निसर्ग अमर्याद, अनिर्वाच्च आहे. सुख मिळणारे साधन तेच असून पुरुष बाहेरख्याली का बनतो ? सौ.ने विचारलेल्या या प्रश्नाने मी हादरून गेलो, तेव्हा निसर्गच माझ्या साहाय्याला धावून आला. जडसृष्टीत घडणाऱ्या लक्षवेधी व्यापारांना चेतनाचे संदर्भ असतात. आशय, अभिप्राय असतात. हे जडव्यापार चैतन्यमय सृष्टीत कुतूहल म्हणून काचघरात संरक्षित होते. सुग्रण पक्ष्याचे ओसाड घरटे नाहीतर आपण कशाला जतन करून ठेवतो ?

कालपरवा या बहुविध वृक्षांच्या दुनियेत एकटा एक पळस लाल झाला तेव्हा पाखरांना त्याचे कोण कवतिक ! ज्या बोरींनी त्यांना आश्रय दिला, त्यांची पुसट स्मृतीही आता त्यांच्या मनीमानसी नाही. हिरव्या पानांत बहरलेल्या चकचकीत मोहोरांमुळे महारुखाची कातीव, लांबट पानेही दुर्लक्षित झाली. उंद्री चिंच कष्टावल्या खस्ता खाल्लेल्या म्हातारीसारखी ' झाडून ' झाल्यावर ओकीबोकी होईल, तेव्हा कावळेही तिच्याकडं ढुंकून पाहणार नाहीत.

सुख शारीरिक तृप्तीचा परिपाक नाही; त्याचे नाते मनात उद्‌भवणाऱ्या सौंदर्याशी आहे. पळसाच्या रानात उडून गेल्यावर कदाचित पाखरांची पळसओढ क्षीण होईल. परत ते जुन्याच वृक्षांच्या आश्रयाला येतील. त्यासाठी ऋतुपालट होण्याची प्रतीक्षा करायला हवी. उत्क्रांती आणि स्थलांतरामुळे समस्या आपोआप मिटतात. मनात सलणाऱ्या प्रश्नांची उत्तरेही मिळतात.

उत्तरे मिळविण्यासाठी पाखरांच्या विद्यमान वर्तनाला प्रतिमुक्काम म्हणू या. आयुष्यातील सुटचा जागा सोडून केलेला हा प्रतिमुक्काम आदिम काळापासूनचा. अपरिहार्यसा. आता महारुखाच्या शीर्षस्थानी बगळ्यांची एकच शुभ्रमाला !

शरीराचा एक तुकडाच निखळलेला फाल्गुनी चंद्र... बगळ्याची शुभ्रमाला पुसून गेल्यावर आपण परत फिरावे. आयुष्य माळण्यासाठी वेधबुंर्था व्हावे, आणि –

पाच शतकांनंतरच्या या फाल्गुनालाही अलविदा द्यावी.

---

साप्ताहिक तरुण भारत

# ११ आश्विनीमृग !

उत्तरायण सुरू होतंय. सूर्य उत्तरेकडे अंशपावलांनी सरकू लागला आहे. सूर्याबरोबर आपलं स्थित्यंतर होऊ दिलं की कोण धन्य धन्य वाटतं. या विश्वाच्या पालनहार सर्वोच्च शक्तीशी आपला लक्ष्यार्थाने संबंध आहे, ही जाणीवदेखील केवढे धुमारे फोडू लागते !

सूर्य आणि सरितांचे ऋण आपल्या डोक्यावरून उतरायचे नाही, असे आता स्पष्ट आहे. कालचा ' मी ' आज नाही... उद्याचे मात्र काही सांगता येत नाही. काल आपले पूर्वपश्चिमेशी अस्तित्व–नाते होते. आज उत्तर–दक्षिणेचा दुवा म्हणून गढीतल्या माथ्यावरून सूर्यसरितांची दखल घेण्यासाठी आपण दाखल झालेलो !

या दक्षिणोत्तर ध्रुवाचा दुवा झाल्यामुळेच की काय, काल हवेबरोबर समग्र उत्तरेकडून धूळ उडवीत भरधाव आलेल्या सैनिकांच्या टापांचे दिगंत आवाज आपण ऐकले. लहान–मोठ्या उंचीची, आकाराची झाडे जीवाच्या आकांताने सळसळली ! वारा आणि पावसाच्या धुमश्चक्रीत धुवाँधार झाली. त्या कोलाहलात घराघरांची, झोपडपट्टीची कमीअधिक फिट्ट दारे धडाधड बंद झाली. अस्मानी–सुलतानीत ' सुलतानी ' कोण करीत होते, याचा निर्णय होत नव्हता. पाऊस वाऱ्याच्या पुढे धावत होता, की वारा पावसाची वर्दी देण्यासाठी सुसाट होत चालला होता, कुणास ठाऊक !

मेघाचे पुंजके साखळीने माथा चढून गेले आणि – दक्षिण दिशा त्यांनी एकाच पावलात व्यापून टाकली. उत्तरेकडून दक्षिणेकडे रमत–गमत, वळणावळणांनी झुळ-झुळणारी नदी या अकस्मात माऱ्याने बिचकली.काळजीपूर्वक गती घेत धावू लागली. पहाडपाण्याचा लोट तिच्यात झेपावू लागला. शेतमाथ्यावरून गावपाणंदीकडून धावणारे लहान–मोठ्या आकाराचे प्रवाह तिच्या कृश शरीराचा घेर वाढवीत चालले.

लक्ष्मणाला ' शक्ती ' लागली होती, त्या दिशेकडून भान राखूनच आज पाऊस आला ! त्या तसल्याच अटीतटीच्या काळात आला. आज मृगाचा हिशेब चुकला होता. मृगाने डोळे वटारल्यापासून पऱ्हाटीने अंग कसे धरलेच नव्हते. भादवा अर्धा अधिक संपल्यासारखाच होता आणि उभ्या शेतशिवारांना ' शिरव्या 'वर वाढवून मेघराजाचे आभाळवास्तव्य संपले होते. त्यामुळं आटून गेलेल्या नदीकाठावर ओणवून उभ्या असलेल्या झाडांची आणि माणसांची दैना उडाली होती. तशी रोजगाराची सरकारकडून हमी मिळाली. दुष्काळाशी दोन हात करण्याची धीरोदात्त भाषाही कानांना रिझवू लागली. तेवढेच बरे वाटे.

आणि तितक्यात पावसाने हा चमत्कार केला. दशदिशांनी पाऊस आला. कंठशोष पडू लागलेल्या धरित्रीने उभ्या शिवारात चैतन्य ओतले. मरू घातलेले कृषिवलांचे आख्खे संवत्सर ' आनंदाचे डोही ' नाचू लागले. पाऊस आता पाठमोरा नि नदी पारोसी. एकूण पावसाचा बोलबालाच कमी होत चाललाय. पावसाचे पोथीशी कार्यकारणभावाने जुळलेले पारंपरिक नाते आता सरत्या भाद्रपदाबरोबरच तुटायचे. म्हणजे ' माँ 'र्जी कडील महानुभावी ' महंतां 'चे वास्तव्यही संपायचेच. गेला महिनाभर ते रात्री ८ ते ११ पर्यंत पोथी वाचताहेत. ' सुमरण ' करीत माळा ओढताहेत. पारोशाने घमेलेभर देवकुळाला दह्या-दुधाने न्हाऊ घालताहेत. भक्त श्रोते श्रद्धेने कृष्णचरित ऐकताहेत. कृष्णाच्या अष्टनायिकांचा शोध घेत ते दत्तायनापर्यंत पोहोचताहेत.

महंत संध्याकाळी गच्चीतील पायऱ्यांत येऊन बसतात, तेव्हा सूर्य त्यांच्या गोऱ्यापान मुद्रेवर सारखा झोत फेकत मावळतो. वरपांगी महंत चबुतऱ्यावर माळ जपत असतात; परंतु एखाददुसरा शब्द माझ्याशीही बोलतात. गोविंदप्रभूविषयी चार दिवसांपूर्वी मी त्याना विचारलं आणि योगायोग ! ' आज गोविंदप्रभूचा जन्मदिन. ' महंत बोलले, ' रात्री जन्माला अवश्य यावे ! '

महंतानी मला निमंत्रिले. देव नागदेवाचार्य, गोविंदप्रभू, क्षेत्रपाळ यांच्याशी माझे खरे तर नाममात्रच संबंध. महदंबेशीही मी अल्पपरिचित. धवळे म्हणजे मंगलाष्टके असे समीकरण मांडतानाच मी ' रिदपूर–काशी 'चे माझे अनुभव महंतांना सांगतो तेव्हा महंतांची माझ्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाते.

उद्या महंत गढीतून जातील. गढी परत सुन्न होईल. वैधव्याचे सुस्कारे देत राहील. सतत वीस वर्षे एकमुखी निवडून आलेल्या ' चक्रधरवासी ' मोतीलाल भाईजींची ही गढी फिरून आपल्या गतधवत्वाचे स्मरण होऊन हुंदके देत राहील !

विजयादशमीच्या पाडव्याला महंत कुठं असतील ? रानशिवारात ते लपूनछपून बसलेले असतील. या नगरातले सारे महानुभव भाविणी गाववेसीबाहेर निघून

जातील. पाडव्याला रेडा बळी देणाऱ्या संस्कृतीचा निषेध म्हणून ! कदाचित माझ्याच कवितेच्या ओळी ते नगरवासियांच्या मुखांवर भिरकावतील –

' कावळ्यांच्या गावांतून हद्दपार व्हायला मलाही आवडेल ! '

आश्विन एव्हाना पाण्यात न् गाण्यातही डोकावू लागलेला. निळ्याभोर पहाडांकडून ही शरनीरा थेट माझ्या गढीवर चाल करून येईल की काय, असे वाटते. उभय पात्रांवर ओणावून अठरापगड जातींची झाडे पाण्यात दाटीवाटीने आपली प्रतिबिंबे न्याहाळीत आहेत. मी दिवस उजाडल्यापासून अस्तापर्यंत अधून-मधून पाणी न्याहाळतो. हा प्रवाह उत्तरेकडून पूर्वाभिमुख व पूर्वेकडे उतरल्यावर दक्षिणाभिमुख होतो. घाईघाईने खळखळत ! एवढ्यातच आश्विन सुरू झालाय. नदीचे पाणी असे एकाएकी संथावले कसे ?

गच्चीवर येऊन न्याहाळावे तर पाणी आपले चाललेच आहे. डोहात उघडी-नागडी पोरे धडाड उड्या मारताहेत !

मी मात्र गूढकथेतल्या बंदिस्त राजपुत्राप्रमाणे पाठीमागे हात बांधून नव्या लेखनाच्या दिशा धुंडाळतो. निर्जीव बुबुळांनी पाणी न्याहाळतो. निरभ्र आकाश डोळ्यांत सामावून घेण्याचा प्रयत्न करतो. मला आपले उगाचच वाटत राहते –

' I am the Monarch of all that I Survey. '

सातेऱ्यातून एकदा तरी माझी पावलं जुन्या घराकडे वळतात. हे ' काल 'चे जुने घर शहराच्या ऐन मध्यवस्तीत. नदीकाठच्या पायवाटेवरून ओढीने मी निघतो. भोलटेकजवळ नदीचा कडा उंचावत जातो. वर गुराख्याचा पोर हातात शेंबीची काठी मिरवीत बकऱ्या राखीत बसलेला असतो. शेक्सपीअरच्या कुठल्याशा नाटकात जंगल धावू लागते ना, तसा एक इसम बाभळीच्या पिवळ्या फुलांच्या फांद्या डोक्यावर घेऊन माझ्याच रोखाने येत असतो. गुराख्याचा पोर स्वर्गातून बोलल्या-सारखा हाळी देतो,

' बे इसूफ ! क्या लाया ? '

, चारा – बकरीके वास्ते ! '

' कब लिया बे ? पाठ है क्या ?'

' अभी गये बजार – '

' काहे को बे ?'

' कुर्बानी !'

युसूफ दृष्टिआडच्या सृष्टीत दिसेनासा होतो. गुराख्याचा पोर स्वगत पुटपुटतो,

' वा ! वा !! कुर्बानी. ' पुन्हा शहारतो. जोरजोराने ओरडू लागतो, ' अल्ला को प्यारी है – कुर्बानी, कुर्बानी !'

कुर्बानी ही आश्विनाची ट्रॅजेडी. म्हणजे विजयादशमीच्या पाडव्याला कुर्बानी द्यायचे दिवस अजून संपले नाहीत तर ?

फाटका आश्विन कधीतरी कार्तिकात विरघळून जाईल; पण कुर्बानीच्या वेदना त्याला पुसून काढता येतील ? कधी ?

दिवसेंदिवस ग्रहणाचा काळ वाढतो आहे. सूर्य आणि चंद्रग्रहणातील अंतरही कसे कमी कमी होत आहे. या ग्रहणातून आपली मुक्तता नाहीच की काय ? अस्वस्थतेचे हे खंडग्रास कधी सुटायचे ? इतकी सारी वर्षे आपण समृद्ध आश्विनाची प्रतीक्षा करताहोत. जुने पराजय विसरून मनभावन आश्विनासाठी प्राण टाकतो आहोत. पुरश्चरणे मांडीत देहकुळी झिजवून मनातला आश्विन पुजतो आहोत; पण आश्विन स्वतःचे भांडवल हरवून फाटक्यात शिरलाय. तेव्हा साऱ्या इच्छा-अनिच्छांना दूर सारून अलेक्झांडर सेलकर्कप्रमाणे डोक्यावर लादून दिलेल्या एकांताला मी एवढेच विचारतो : ' Oh Solitude ! Where are the Charms that Sages have seen in thy face ? '

मला अपेक्षित असलेल्या आश्विनाला कधी तरी हा प्रश्न मी विचारीन म्हणतो.

---

युगवाणी, जुलै–ऑगस्ट, १९८३

## १२ आषाढ-भैरवी !

आषाढाची सरती भैरवी आणि श्रावणाची सोनचाहूल. वरुणराजाच्या अश्वमेघांनी आकाशभर आपले सैन्य पेरून रणशिंग फुंकावे, चकमकी घडाव्या, नगारे वाजावे, अग्निबाणांचे युद्ध आणि गदारोळ साऱ्या आकाशभर उमटावा आणि मुलं–माणसं आपापल्या घराच्या खोपटात आणि पिल्लं खोप्यात गांगरून लपून बसावी...

पण गेले चार दिवस असे काही घडतच नव्हते. रात्री टिपूर चांदण्या टवकारून बघायच्या. आकाश कसे निर्विकार, निरालंब ! ज्ञानिया योग्यासारखे ! क्षितिजावरून धूसर सूर्योदय होतो – पक्षी, झाडं, शिवारं, केळीच्या बागा आणि हिरव्या अंकुरांची नवेली धरती त्याच्या किरणांचं दिलखुलासपणे स्वागत करतात.

नुकत्याच ऋतुमती झालेल्या नदीच्या पात्रात सोनेरी किरणं अशी चमकदार दिसू लागतात की पाहणाऱ्यास वाटावं वाहणाऱ्या नदीच्या सर्वांगाचं सोनं झालेलं आहे. हिमालयाचा सुवर्णयोग पुन्हा एकदा अलकापुरीला निघाला आहे की काय ? चक्रनेमिक्रमाने ऋतुचक्राचा एक फेरा पूर्ण होत आला की काय ?

की सारा संभ्रमच ? संभ्रम – शब्दाचा, सुरांचा, चित्र आणि तमाम विदग्ध कलांचा. निसर्गातही संभ्रमाच्या नाना छटा असतात, रूपं असतात. जीवनात येणारे असेच काही संभ्रमाचे क्षण... शब्दरूपाचा वेध त्यांना लागला आणि यदाकदाचित ते आविष्कृत झालेच उतावीळीने तर इलिएट म्हणतो त्याप्रमाणे निर्मितीची अवस्था होते. Shape without form, shade without colour आणि gesture without motion. व्यक्तिसापेक्षतेनंच बोलायचं तर निर्मितीक्षणांच्या या गोंधळाचा अनुभव या याच आषाढातल्या सरींनी पचवून, गिळून टाकला आहे. शब्दांनी

ऐनवेळी केलेली दगाबाजी त्या प्रतारणेच्या वेदनांचा दाह आषाढाच्या उत्कट पाण्यातच शमला आहे. सत्काराच्या, सन्मानाच्या मागच्या दाराने कुजबुजणाऱ्या उपहासाचे मर्माघात लपविण्यासाठी आषाढमातीसारखी कूस नाही.

आषाढातली ही सकाळ तशी सौम्य, शांत आहे. रौद्रतेचा मागमूससुद्धा कुठे नाही. आकाशात ढगांचे पांढरे पुंजके कवड्या सापासारखे वाऱ्याबरोबर नुसते सरकत आहेत. आकाशवाणीने दिलेल्या पावसाच्या वृत्तामुळे ते अधिकच गरीब दिसताहेत ! वाऱ्याबरोबर वाहत जाण्यात कसलाही इष्ट परिणाम निघणार नाही. आपल्या आकारावर, विहरण्यावर प्रज्ञावंतांनी रानटी अभिरुचीचे आरोपण करीत राहावे. उदाहरणार्थ : ' जो अभिरुची भावना Emotion आणि हृद्यता Charm यांची अपेक्षा बाळगते, ती रानटी म्हटली पाहिजे, ' हे आणि यासारखे आणखी काही मतप्रवाह.

नदीकाठावरची वृक्षराजी तशी मस्त आहे. कोरड्या ढणढणीत पात्रांचे दिवस आता संपले आहेत. डोहाच्या खुणेचे ' चिरोल ' म्हणून कुणाचा उल्लेख अतःपर गावकीत व्हावयाचा असतो. पिवळ्याधमक फुलांवर सोनप्रहराचा पिसारा फुलवीत पाण्यात डोकावणाऱ्या बाभळीलाही वेगळे रूप प्राप्त व्हावयाचे असते. बाभळीच्या रांगेतली चिंच, कवठ आणि नाना कुळीची अशी झाडं. साऱ्यांनाच नदीचं अप्रूप. डोहाचे डोहाळे लवलव करणाऱ्या, शांत पाण्याच्या पृष्ठभागावर सुळकांडी मारून खसपस करणाऱ्या लहानमोठ्या, चकचकीत नि तुकतुकीत माशांचा सोस. माशांना अन्नकणांचा माणसांनी चुळीबरोबर नदीत टाकलेल्या ठशांचा सोस. कोळ्यांना पुन्हा मासळ्यांचा सोस. सर्रकन जाळे फेकले जाते, ओढले जाते. टोपलीत मासळ्यांचा ढीग तळमळतो, दुसऱ्याच क्षणी शांत होतो. ढोलातून खेकडे असे उठल्या–बसल्या पाण्यात येत नाहीत. त्यांचा दिवस रात्री उगवतो.

मासोळ्यासारखे खेकडे मूर्ख नसतात. शिवाय इतके असंरक्षित नसतात. वेळ आलीच तर नांगी मारायलाही कमी करीत नाहीत. काय निसर्गाचा न्याय आहे पाहा ! त्यानं काही जीव इतरांच्या उपभोगाकरिता आणि उपभोग घेण्याकरिताच निर्माण केले की काय ? नाहीतर ज्याचा त्याचा डोळा मासळीवरच का ?

कारण मासळी निरुपद्रवी आहे. तिचं घर बेवारस पाण्यात आहे. पाणीही या निरुपद्रवी प्राण्याला कधी दगा देईल, याचा नेम नाही. पक्ष्याचा डोळा मासळीवर. माणसाचे जाळे मासळीवर. शिवाय मोठे मासे लहान माशांना खातात ते वेगळेच. म्हणजे मासळ्यांचा डोळाही मासळ्यांवरच. स्वसंरक्षणासाठी नखे नाहीत, दात नाहीत. श्वासोच्छ्वासासारख्या नैसर्गिक क्रियांसाठीही जलपृष्ठावर यावे आणि एखाद्या कातील क्षणाला एखाद्या करकोचाकडून, बगळ्याकडून तिथेच शिकार व्हावे. अरेरे !

' वह तो असमत को बेचती है फकत –
एक फाके को टालने के लिए
तुम तो यझ्दां को बेच देते हो,
अपना उल्लू सिधारने के लिए –

असे हे मासोळयांचे जग. इतरांना चरण्यासाठी सम्यक् निसर्गाने घालून दिलेले हे कुरणच म्हणा ना !

आषाढस्थ मेघांची पूर्वक्षितिजावर न्यारीच रंगावळ. सौम्य, काळ्या पडद्याआडून प्रकाश-फुलोरे. त्याखाली निळ्या, किरमिजी प्रकाशाची खैरात. मेघमेरूंच्या एकावर एक चढत गेलेल्या पंक्ती. त्यांतून भल्या पहाटेस बारीकशी चंद्रकोर. आपल्यापुरती निळाई तिने मेघांच्या साम्राज्यात कशी निर्माण केली असेल कोण जाणे ! विशेषत: अमावास्येच्या नजीक जाताना.

उत्तरापथोच्या क्षितिजावर सातपुड्याच्या रांगा. सातपुडा हा पर्वत की महापुरुष अशा संभ्रमात पाडणारे हे दिवस. सूर्यही पूर्वेकडून वर येतो आहेच. अर्घ्य देत त्याला सामोरे जाणे क्रमप्राप्तच. थोरामोठ्यांनी आजवर चिनी भिंतींचा आडोसा घेतला आहे. संरक्षणाची ही तटबंदी संस्कृतीच्या प्रागैतिहासाची बोलकी कहाणी आहे. चिनी भिंतीचा महिमा अखेर संस्कृतीचे देणे आहे. मानवी कार्यक्षमतेची ऐतिहासिक खूण आहे. सातपुड्याचे तसे नाही. आज इतक्या दूरवर चिखलदऱ्याचे दिवे सातपुड्याच्या माथ्यावर मिणमिणताना दिसतात. अंधारल्यावर प्रकाशाचे मोठ्ठाले गोलक पर्वतमाथ्यावर उंच उडताना दिसतात. गेले काही दिवस विस्फारलेल्या डोळ्यांनी ते मी पाहतो आहे. त्या प्रकाशगोलकांचे आपल्या परीने अन्वय लावण्याचा प्रयत्न करतो आहे. अशा वेळी –

अचानक स्मरण होते मरियन अँडरसनचे, या अमेरिकन गायिकेच्या आत्मचरित्राचे. मरियन आपल्या गाण्याविषयी जे लिहिते, ते कुठल्याही कलेच्या – ललित कलेच्या – संदर्भातही खरेच आहे. ती म्हणते – ' प्रत्येक गायकाची गायन शिकण्याची अंगभूत अशी एक पद्धत असते. शब्दांवर गांभीर्याने काही संस्कार करण्यापूर्वी मी प्रथम संगीतासाठी काही उपकारक मिळविण्याच्या हेतूने नुसती धून ऐकत राहते. धूनवेडीच होते म्हणा ना ! नंतर नखशिखांत संगीतमयी झाल्यावर कासवाच्या अलिप्ततेने काव्यास्वाद घेण्याचा प्रयत्न करते. उद्देश इतकाच की, काव्याचा विषय काय आहे, हे मला अवगत करून घ्यायचे असते. गीतनिर्मितीच्या प्रेरणांचा मार्ग शोधण्याचा हा प्रयत्न. संगीतबद्ध असलेल्या सर्व सामूहिक कलांच्या धारणा नीट उमजल्याशिवाय मी तंबोऱ्याची गवसणी काढत नाही...'

कलानिर्मितीपूर्वी ही सावधगिरी बाळगल्याशिवाय निर्भेळ कलेचा जन्म होत

नसतो. सूर्यसत्य अजून हाताला लागत नाही. मनाला भिडत नाही; म्हणूनच कुठल्याही प्रकारचे धाडसी अनुमान, Verdict सातपुड्याविषयी करता येत नाही.

चिनी भिंती आणि सातपुडा इथेच साधर्म्याच्या मर्यादांपासून दुभंगू लागतात. सातपुड्याच्या – त्या महापुरुषाच्या विराट छातीवर हिरवे तृणांकुर खेळू लागतात. धुकेभरल्या पहाटवेळा त्याचे माथे चुंबू लागतात. शेकडो ओढे, वहाळ नदीरूपाने संस्कृती फुलवीत जातात. असे सातपुड्याचे कर्तब. निव्वळ संरक्षणाच्या हेतूपुरते, मर्यादित बोलायचे तरी हिमालयाचे संरक्षण चिनी भिंती देऊ शकणार नाहीत. अस्सल आणि नक्कल ! नक्कल म्हणजे अस्सलाचा केवळ आभास. नुसते ढोंग. सातपुड्यातल्या काय किंवा सह्याद्रीतल्या काय, आदिम माणसाचे जीवन, चार–दोन दिवसांच्या हौशी सहलीत वर वर पाहून त्यावर कादंबऱ्यांचे तर्कट रचणारे तथाकथित कादंबरीकार आणि अलिशान राजप्रासादात बसून असल्या बेगडी चित्रणाला – केवळ Photography ला सत्य समजून 'नकलां'ना पुरस्कारिणारे 'दर्दी' परीक्षक. 'मी ढोल बडवितोय, तू पुंगी वाजव.' असे हे सारे गारूड. कुणी सांगावे या शहाण्यांना की, नैसर्गिक आणि विधायक प्रतिभा कलाकृतींची अस्मिता स्वयमेव असते. चांदणीला चंद्राचा सर येत नाही. चंद्र आणि चांदण्यांना जो प्रकाश मिळतो, तो या सूर्यसत्याचा. हा प्रकाश उसना असतो. 'बॉरोड रिफ्लेक्शन' ज्याला म्हणतात, तेच चंद्रबळ. या बळावर जगात ताजमहाल बांधता येत नाही; रामायण, इलिएड अशा कलाकृती कृतक प्रतिभेतून निर्मिता येत नाहीत.

चंद्र, तारे, आकाश, वारे, नद्या, पर्वत, अरण्ये ही निसर्गरूपे. ती अनादिसिद्ध. निसर्गाची ही बाह्य रूपे. आंतरिक रूपे वेगळीच. सुप्त रूपे निराळी. शांत, सौम्य आणि रौद्र अशी निसर्गाची रूपेच रूपे ! या रूपांत, नैसर्गिक गुणांत सुकृद्दर्शनी संगती नाही, विसंगती आहे असे जाणवते. त्या वेळी इमर्सन आपल्या दिमतीला समर्थने घेऊन येतो. काय संगत, काय विसंगत याचा भ्रमनिरास होऊन जातो. उदा. माणूस घ्या. माणूस शारीरिकदृष्ट्या निव्वळ हाडामांसाचा पुतळा आहे का ? नव्हे, माणूस म्हणजे एक रीत. बदलण्याची तऱ्हा. मेथड. माणूस म्हणजे इष्ट ते उचलून अनिष्टाचा त्याग करणारा पिंड माणूस म्हणजे प्रगमनशीलता. आंग्ल भाषेचा ज्ञानेश्वर म्हणता येईल, अशी या इमर्सनची महात्मता. जेव्हा तो लिहितो तेव्हा शब्द 'अमृतानुभवा'चे तुषार उडवू लागतात. वर वर भासणाऱ्या विसंगतीतून वैश्विक संगतीकडे त्याची प्रतिभा झेपावू लागते तेव्हा काळीज लकलकते. दीप्तीने नेत्र झाकोळून जातात. मघाशी पूर्व क्षितिजावरून वर येत असलेले हेच तर ते सूर्यसत्य नसेल ? डोहातले मोठे मासे लहान माशांना खातात. पोलादी वस्तूंचे लोडस्टोनकडे आकर्षण होते. खेकड्याची जात रात्री काठावरून पाण्यात शिरू लागते, एवंच आपले भक्ष्यही घनतिमिरातच शोधते.

फळ पिकू लागलं की ते गळून पडतं. फळ पडलं की, पानेही गळू लागतात. दुसऱ्या शब्दांत ' पडू ' लागतात. पर्वतमाथ्यावरून प्रपात कोसळतात – म्हणजे पडतातच. गती आणि प्रगती म्हणजे पुढे पडणारी पावलंच.

' पडण्या 'च्या या प्रागतिक अर्थाने नदी, सूर्यप्रकाश किंवा माणूस उंचावण्याच्या खुणा आहेत. ही असंगती नसून या बोलण्यात तर्कसंगती आहे, सुसूत्रता आहे – एक तार्किक आशय दडलेला आहे. हे सविस्तर सांगण्याची आवश्यकता आहे का ?

परंतु तथाकथित कोसळण्याची किंवा पडण्याची दुसरी एक बाजू असू शकते. पृथ्वीवर एकाच वेळी दिवस आणि रात्र होतात; या विधानाला भौगोलिक सत्य म्हणून जशी आपण मान्यता देतो, तशी व्यावहारिक अर्थाने देत नसतो. त्यात आपल्याला विसंगती वाटते. सूर्यसत्याखाली वाढणारा मानव जसे एक वास्तव आहे, तसे स्वप्नाच्या साम्राज्यातील माणसाचे प्रतिबिंब हे मूळ पुरुषांचे प्रतिबिंब. कैफातल्या विदेही देहाचे कोसळणे हेही कोसळणे नसून निर्मिणे आहे. अशा निर्मितीची ही एक खूण –

' एका कवितेचा जनाजा
स्मशानघाटावर पोहोचण्यापूर्वीच :
खडबडून उठून बसला तिचा आत्मा !
कवितेची आत्म्याशी साथसंगत सुटल्यावर
आत्मा भटकला दिशाहीन
आत्मा पर्वतकड्यासारखा कोसळला
प्रत्यात्म्यावर
तितक्यात
पहाट किरण फुटले, पण आत्म्याला बदनाम करून
आत्मा बिचारा ! प्रेम आणि नाशाच्या काळबुंथीत
अदृश्य होत गेलेला, विशेषण आणि विशेष्यापलीकडे ! '

अँडरसनने दिलेला सांत्वनाचा सूर कुठंतरी गुंजत राहतो. मनाच्या खोल तळघरात सारखे प्रतिध्वनी उठतात आणि पाण्यावरील लाटांसारखे वर्तुळात जातात :

Good music in any genere is worthy of respect.

तरुण भारत, ऑगस्ट, ८८

3436 ... 9/1/9
२६०३६
22/4/93

# १३ ये रे घना ! ये रे घना ! !

दिवसामागुती दिवस नि नक्षत्रापाठोपाठ नक्षत्रे सरकत होती. अजून हवाच पावसाळी झाली नव्हती. मृग हिशेबात धरत नसतात. त्याचं एक सोडा; पण आर्द्राही कोरड्याच ? पुनर्वसू दाराशी धडकतोय; पण आकाश आपले स्वच्छ, निरामय. त्याच्या विराट, विशाल हृदयात ओलाव्याचा एखाददुसरा तुकडाही तरंगताना दिसू नये ? पुनर्वसूपर्यंत इतके स्वस्थ, स्थितप्रज्ञासारखे आकाश क्वचितच कुणी पाहिले असेल.

कसे व्हायचे आता या नांगरून पडलेल्या शेतामाडांचे ? खोल, खोल जाणाऱ्या विहिरींचे ? दात विचकून बसलेल्या सळसळत्या झाडांचे ? केव्हाचेच कोरडे ढणढणीत पडलेल्या नदीच्या वालुकामय पात्राचे ? या शेतकऱ्यांचे कसे व्हायचेय पाऊस नच आला तर ?

जेमतेम पुण्याजवळ आल्यावर मान्सूनची खिरापत संपली. आता खिरापतीची ताटं समुद्रावरून भरून येतील तोवर प्रतीक्षा करीत राहायचं. मराठवाड्याने, विदर्भाने, खानदेशाने – मध्यदेशानेही. आकाश न्याहाळीत राहायचं, टक्क डोळ्यांनी सकाळ–सायंकाळ ! मशागतीची उरलीसुरली कामं करून रात्री भजनं म्हणायची खेडुतांनी. डफ–खंजिरीवरचा हात रात्रंदिवस खंडता कामा नये. मध्यरातीपर्यंत सूर आभाळाच्या काळजावर विंधून गेला पाहिजे – ' महादेव भुयारात राहे, गंगा जटातून वाहे. '

हा सप्ताह म्हणजे देवद्वारी धरणे. म्हणजे आपल्या मागण्यांसाठी लोक संप करतात तसेच हे ! सप्ताह म्हणजे देवाच्या दरबारात माणसाने सुरू केलेला एक प्रकारे संपच नव्हे काय ? सरकार माणसाकडून कर्तव्य अपेक्षिते. देव काय अपेक्षित असेल ? स्मरणे ? सहस्रभोजने ? पूजा–अर्चा ? पुण्य ?

कुणास ठाऊक ? पण हे सारं चाललं आहे खरं – पुण्यासाठी आणि पावसाच्या पाण्यासाठी. वर्षभर अभ्यासाच्या पुस्तकांकडे ढुंकूनही न पाहता परीक्षेच्या ऐन रात्री अभ्यासाचा तडाखा सुरू करण्याप्रकारखंच की हे ! आणि निसर्गाच्या राज्यात तिकडे काय हालचाल आहे ? म्हणजे नदीची काय अवस्था ? पहाडपाखरांचे काय ? झाडेमाडे काय करीत आहेत ? दुसरं काय करणार ? ज्यांचे उद्योग पावसाच्या पाण्यावर अवलंबून त्यांना आता पारोसे बसण्यावाचून काय काम असणार ? हिंगणबेटीच्या झाडावर सुतारपक्षी टक् टक् करीत खिन्न शांततेला टोकरीत बसला आहे. नदीच्या वाळूत यत्र–तत्र हिंगणबेटीची ढोलकीच्या आकाराची फळे रुतून बसली आहेत. मानवी मलमूत्र टाळून रेतीत रुतून बसलेली हिंगणबेटं गोळा करीत मी उगाचच नदीच्या पात्रातून हिंडतो आहे. गतवर्षी डोक्यात सरकलेला बंडया आता गुरांचा कळप ' बागा 'त लावून देत आहे. आंबेडकरनगरातून पलीकडच्या वाटेने शेळयांचे कळप हाकारीत ' शत्रूघ्न्या 'ही मातखाणीच्या रोखानं निघाला आहे.

काल सूर्य कलता कलता आभाळ दाटून आलं तेव्हा खंजिऱ्यांवर दणादण थापा पडू लागल्या. तुऱ्हाटयांचे भारे उघडया भिंतीवर चढून बसले. चक्रम कावळयांनी निंबाच्या झाडावर चार–दोन काटक्या जमविल्या.

खंदक खोदणे हा भाग शत्रुपक्षांपासून संरक्षण मिळविण्यासाठी अशी आपली समजूत; परंतु जे हवेहवेसे आक्रमण आहे किंवा डोळयांत तेल घालून ज्या इष्ट आक्रमणाची आपण वाट बघतो, त्याच्यासाठीही खंदकाची जरूरत असते. निसर्गाचे, मानवाचे सारे व्यापार हे प्रमेय जाणून असतात.

सजीव निसर्गाने आपल्याभोवती बांधून घेतलेले हे कोष आकाशाला मान्य नसतात. वाऱ्यालाही या चौकटी मान्य नाहीत. किंबहुना चौकटीत वाहणे ज्याला जमते तो वाराच नव्हे. मोजलेले पाणी देईल ते आकाशही नव्हे. आकाश आणि वारा हे स्थलबद्ध नाहीत, कालबद्धही नाहीत.

मृगाच्या तोंडी ऐन सूर्यास्ताला कुणाची बरे चिता धडाडू लागली आहे ? चितेचा प्रकाश सातपुडयाच्या म्हणजे उत्तराकाशात भरून आहे. पूर्व आणि दक्षिण या लाल–गुलाबी प्रकाशापासून, चार हात दूरच राहिल्या आहेत. ऐन पावसाळयात चंद्राचे चांदणे आभाळभर उजेडाचे साम्राज्य उभारते; पण या चित्प्रकाशाच्या साम्राज्यात मात्र चंद्राचा किरणही पोहोचू शकत नाही. या प्रकाशाला अंत जरूर आहे; पण आदी नाही. कार्यकारणभाव नाही. आकाशात युद्धपूर्व जर्मनीसारखा त्याचा दबदबा मात्र आहे. या प्रकाशाने आभाळाखालचा माणूस गेले कित्येक दिवस भयचकित, अस्वस्थ झाला आहे ! कसला प्रकाश हा ? या प्रकाशाचा अर्थ काय ?

आभाळ कुठले संकेत देत आहे या प्रकाशातून ? या नचिकेत ज्वालांतून ?

' ये रे घना ! ये रे घना ! न्हाऊ घाल माझ्या मना !'

मेघराजाला आवाहन. विरहिणीची प्रियकराला घातलेली ही मनविभोर साद मी कधीतरी आशा भोसलेंच्या सूरातून ऐकली – तशी ती कालही साग्रसंगीत कानन कौशलने शनिवारच्या ' विविध भारती 'वरून पेश केली; पण छे !

संगीत तेच, सूर तेच, गाणारी तीच – पण शब्द ते नव्हते. मग कुठले शब्द होते ते ? ' ओ रसिया, भोले पिया... '

' ये रे घना 'ची संवेदना त्या सूरात नव्हती. पावसाने चिंब भिजव असं मेघाला कमालीच्या नाजूक शब्दांत विनविण्यातली उत्कटताही विरहिणीच्या या ' भोले पिया 'त नव्हती.

आकाश आणि मन एकरूप, एकसंध व्हावं असा क्षण अजून तरी येत नव्हता. आकाशात मेघांच्या फौजा अधूनमधून येत-जात होत्या. आकाशाला रणांगणाचे स्वरूप नाही म्हणायला एक-दोनदा येऊन गेले होते. मेघ आकाशात ठिय्या देऊन बसू लागतात न लागतात तोच वारा पिसाट होऊन वाहू लागायचा. कालही तसेच झाले. आकाशावर चारी दिशांनी ढगांचे अश्व दौडू लागले. वाऱ्याने प्रतिबंध केला. पावसाची खिरापत घेऊन येणारा एकेक स्वार टिपला. कावळ्यांची जेमतेम वसलेली घरटी विस्कटून पाडून टाकली. पऱ्हाटीचे भारदस्त भारे भिंतीवरून उडवून लावले. हां हां म्हणता सारे मेघ परागंदा झाले. आकाश पुन्हा स्वच्छ, निरामय झाले नि अष्टमीचा चंद्र आकाशभर झाडापेडांवर चांदणे फेकू लागला.

चांदण्याची धग आता डोळ्यांना साहवत नव्हती. वाऱ्याची अरेरावीही सहनशक्तीपलीकडील होती; पण झाडांचे, पक्ष्यांचे किंवा माणसांचे कुणाचेच काही चालत नव्हते. आता आभाळही स्वस्थ बसत नव्हते. चंद्रचांदण्यांचे प्रदेश आता लवकर डोळ्यांआड व्हावे असे त्यालाही वाटत असावे. भडभुंज्या वाऱ्याचा आकाशालाही प्रेमा येत नव्हता.

दाराच्या चौकटीत पथारी अंथरून पडल्या पडल्या वसू उत्तर आभाळातल्या मेघाकृती निरखीत होती. एक तुकडा हत्तीसारखा दिसत होता. एक घोड्यासारखा नि एक अस्वलासारखा. हत्तीचा मग सिंह झाला ! हत्तीची सोंड अलग तुटून सरकू लागली. सिंह सिंह राहिला नाही... त्याची पालखीच झाली ! क्षणात असे कुणाचे काही, कुणाचे काही झाले. होता होता सारेच काही नाहीसे झाले, तेव्हा वसू स्वगतच पुटपुटली, ' बघावं तसं दिसतं. कल्पनेसारखा आकार येतो. या आभाळाचं काही खरं नाही ! '

ह्यातातोंडाशी आलेल्या एस. एस. सी. पुरवणीसाठी मग ती कसलंसं अभ्यासाचं पुस्तक वाचण्यात गढून गेली.

मेघ आणि पावसात काल रात्री जुंपण्यापूर्वी मीही खिडकीतून दिसू लागलेल्या ढगाच्या मोठ्या जिन्याकडे काल असाच ओढला गेलो. या जिन्याला पांढऱ्या कडा होत्या. हिमसेक् झाल्याप्रमाणे काही ढगांची शिखरं लखलखत होती. ढगांनी मानावर माना टाकल्या होत्या. जशा काही कश्मीर घाटीतल्या हिमश्रेणीच !

ह्या चमत्कार खिडकीतून नाहीसा होईपर्यंत मी ढळलो नाही. चिचुंद्री पोरं माझ्याकडं विस्मयानं बघत होती नि मी ढगांत गुंतलो होतो. घाट वाजली अन् पोरं सुटली. गुराख्यासारखा मीही त्यांच्या मागोमाग निघालो, तेव्हा आकाश मोकळं मोकळं झालं होतं.

भल्या पहाटेस समोरच्या महारुखावरून साद आली –

' कुहू ऽ कुहू ऽ ऽ ' मी अर्धवट झोपेतच, तर अजून ठसठशीत स्वर ' कुहू ऽ कुहू ऽ ऽ कुहू ऽ ऽ ऽ '

माझ्या केसांतून बोटं गुंतवीत सौ. हलकेच म्हणाली, ' उठा आता. उन्हे आली अंगावर. '

' कुहू ऽ कुहू ऽ ऽ कुहू ऽ ऽ ऽ'

स्वर आता कर्कशतेत जमा होऊ लागलेला. तिनं विचारलं,

' हे कोणतं बाई पाखरू ? पोपट काय ?'

मी नुसता हसलो नि उठून बसलो. म्हणालो,

' पोपट कुहू ऽ कुहू ऽ ऽ करतो काय ?'

' मग कोकिळेने गाण्याबजावण्याचे दिवस अजून राहिलेत काय ? '

प्रश्नांच्या असल्या उतरंडी मला नको होत्या. त्यापेक्षा गप्प राहायचं, ऐकायचं, बघायचं; कारण –

आकाश कोरडं आहे तोवरच हे अनपेक्षित अकालपण राहणारे ! आज ना उद्या पाऊस पडू दे म्हणजे सर्वच प्रश्नांची उत्तरं आपोआप मिळतील किंवा उद्‌भवलेले अकाल प्रश्न या मेघासारखे –

अकस्मात विरून जातील.

---

आकाशवाणी नागपूर, नोव्हेंबर, ८८

## १४ पर्जन्यराज येतो आहे !

आता आभाळ हवं तितकं निरभ्र राहत नाही. सारखा उकाडा होतोय. अंगभर घामाचे पाझर फुटतात. दिवसातून कधी पहिल्या प्रहरी, कधी माध्यान्हाला तर कधी सूर्यास्ताला मळभ दाटून येतं.

इतक्यातच हे उन्ह आटोपेल. बारा डोळ्यांनी एकजात लखलखणाऱ्या सूर्याची प्रखरता सुसह्य होत जाईल. मृग नक्षत्राच्या पावसाची एखाद्दुसरी सर येईल नि संचित फळेल, अशी आशा दिलासा देत असते. दो–दो हातांनी अंगावरून ग्रीष्माची उन्हे सारता–सारता.

सकाळी उजाडल्यापासून सारखा एकच प्रश्न डिवचत असतो. त्याचं उत्तर ज्या पहाटेला समाधानकारक रीतीने मिळते, ते दिवस इन्व्हेस्ट होतात. कधीमधी संकल्पांना तडाही जातो. नाही असे नाही; परंतु या दिवसांचा दोन–तृतीयांश वेळ सार्थकी लागला तरीही कृतकृत्य झाल्यासारखे वाटते; पण असं सहसा घडत नाही. घडतं गडकऱ्यांच्या त्या सुभाषिताप्रमाणं – ' संकल्प आणि सिद्धी यांच्या मधोमध ईश्वरेच्छा उभी असते. ' एकूण दिवसाचं खोबरं करणारे घटक वेगवेगळे असतात. पै–पाहुणा, सकाळपासूनच ' मूड ' खराब होणं, घरातल्या एखाद्या व्यक्तीची प्रकृतीविषयी तक्रार, कुरबुरी – माणसाच्या दैनंदिन जीवनात डोकावणारे हे वक्र ग्रह.

या नीरव सायंकाळी चिवचिवणाऱ्या या तितक्याच स्तब्धशांत झाडोऱ्यात विसावलेल्या चिमण्यांच्या चिवचिवाटाचा मत्सर वाटावा, इतका एकांत उबग आणतो कधी कधी. एकांत मोहोरण्याचे बौद्धिक क्षण तसे काटकसरीनेच येतात. खाऊप्रमाणे ते पुरवून पुरवून खाण्यात पुढील दिवसांचे समाधान असते; पण कालांतराने हे समाधानही किती वांझ, केवढे बेगडी होते !

कुऱ्हाडीचे घाव घालून कुणीतरी कडाकड फांद्या मोडत असतो. पळसफुलांचे

घोसच्या घोस काळ्याभोर ढेकळाच्या जमिनीवर सपासप तुटून पडतात. धारदार कोयता, ते अर्धनग्न पोर शेंड्यावर बसून फांदीवर चालवीत असतं. निर्हेतुकपणे ही छाटाछाट चाललेली असते. आपण बसलो आहोत त्या डहाळीवरसुद्धा घाव घालीत आहोत. इकडं ध्यानभान नसलेलं ते पोर. खरंच, माणूस माकडाचा वंशज आहे, हा डार्विनचा सिद्धांत खरा तर नसेल ? तसे असेल तर आपलीही सुटका नाही या सिद्धांतातून.

खाण्याची वासना झाल्याशिवाय अन्नाला रुची नाही. लिहिण्यासाठी हात फुरफुरल्याशिवाय शब्द अर्थसंवाहक बनत नाहीत. हातात लेखणी घेतली की आधी न योजिलेलं सुचतं. एखाद्या फार दिवस मनात तुंबून राहिलेल्या कल्पनेचा अकल्पित विस्तार होतो. खिडक्यांत चिमण्या येऊन बसतात, तशा कविता काही येत नाहीत. आकाशात मेघ दाटून येतात तशी कथा–कादंबऱ्यांची कथानके जुळून येत नाहीत. वृत्तपत्रे किंवा नियतकालिके ओकीबोकी दिसू नयेत म्हणून जाहिरातीच्या पानांत कविता खुपसून देणाऱ्या संपादकाच्या वृत्तीचेच आपण कमीअधिक प्रमाणात असतो. आपल्या वेळेचा सदुपयोग करण्याच्या संदर्भात आपण इतके अनन्यगतिक असतो.

खरं तर दिवसाचा बराच वेळ आपण विस्कळीतच असतो, मोडलेले असतो. या पराभूत मनोवृत्तीने जो–तो जगत असतो. उद्योगात आपण कावलेलो असतो. निरुद्योगीपणात कुठल्या तरी पोकळीत पाचोळ्यासारखे गरगरत असतो. अस्वस्थता, बेचैनी सारखी धुसफुसत असते. दुपारची पोरंटोरं बंगलीच्या पायरीवर येऊन बसतात. काय काय बोलत असतात कोण जाणे ! टोळक्यानं येतात – अकस्मात-पणे एकजात धावत सुटतात. पाखरं नि पोरं ह्यांचंच खरं तर या जीवघेण्या दुपारवर वर्चस्व असतं. माणसं हपिसात पंख्याखाली फायलीत डोके खुपसून असतात. गृहिणी घरात खास उन्हाळी कामे काढून वेळ काढतात. टगे बिझीकचा डाव मांडून बसतात.

मी स्वत: काहीतरी वाचीत चटईवर पडून असतो. कधी अर्धा अर्धा तास अक्षरांवरून नुसतेच डोळे फिरत असतात. मनावर कसलाच ओरखडा न उमटता चाललेले हे नीरस वाचन असते. मनःचक्षूपुढं समानधर्मी भूतकालीन घटनांची नोंद होत असते. डोळे वाचनात नि कान रस्त्यावरून ओळखीचा पायरव ऐकू येईलच एवढ्यात म्हणून कानोसा घेत असतात. कॅलेंडरच्या तारखा फाटत जातात.

... हां हां म्हणता महिना लोटतो. मे संपतो; पण तो येत नाही. मध्यंतरी न राहवून मी एकदोघांजवळ चौकशीसुद्धा करतो, ‘ या बिट्चा पोस्टमन बदलला का हो ?’

एकूण, या जगात बऱ्याचशा गोष्टींवाचून जगणं कठीण आहे. टपालावाचून

तर फारच. दरम्यान पश्चातच पोस्टमन येऊन गेलेला असतो. माझ्या खासगी टपालबॉक्समध्ये उत्सुकतेने हात टाकून बघतो. त्यातून दोन नियतकालिकांचे बेचव अंक, एक मासिक, एक आंतरदेशीय नि बरीचशी धूळ हाताला लागते. या नियत-कालिकांसाठी मी कधीतरी लिहिलेलं असतं. त्याचा मोबदला म्हणून एखाद्या वार्षिक वर्गणीदारासारखे हे अंक मला नियमितपणे येत असतात. ज्याची मी वाट बघतो, ते पत्र या टपालात नसतं. कधी येणारही नसतं, अशी मनाची वालंबाल खात्री असते. तरीही अशा ' न येणाऱ्या पत्रां 'ची मी वाट बघत असतो. गेली दोन तपे ' त्या ' पत्राची मी वाट बघतो आहे. पाहता पाहता बदकाच्या पाठीवरून इतकं पाणी वाहत गेलं, तरी मी पोस्टमनची वाट बघतोच आहे. दुपार रणरणतेय. गरम वारा भुळभुळतोय. नवी पालवी फुटलेल्या समोरच्या पडक्या घरातला पिंपळ सळसळतोय. लुसलुशीत पानांचा ऐवज घेऊन उघड्या आभाळाखाली तो आपले अस्तित्व पेरतो. उत्तरेकडे निव्वळ काळी ठिक्कर पडत चाललेली रोगट बाभूळ हातापायांच्या काड्या हलविल्यासारखी क्षीणपणे करवादते. लखलखीत उन्हात एक घार ठिपक्यासारखी तरंगत असते. बाकी सारं कसं अगदी लख्ख !

भल्या पहाटेस मी आकाशात डोकावून पाहतो. एक–दोन तारे फिक्कट हसताना दिसतात. उजेडाची लव आकाशाच्या शरीरभर उमटून येते. पूर्वेकडून पश्चिमेच्या मार्गाने चाऱ्यासाठी उंचावरून तो राघूचा थवा आता इतक्यात जाईल; कारण काल सायंकाळी मी त्याला पश्चिमेकडून पूर्वेकडे घाईघाईने जाताना पाहिले होते. बराच वेळ मी अंगणात कॉटवर उताणा पडून आभाळाच्या हालचाली निरखीत असतो. सकाळचा प्रहर, तरीही वारा इतका गरम ! प्राचीवरील अंधार पांगलेला असतो. चार–पाच कावळे हवेत तरंगत खेळत असतात.

आता वाऱ्यांनी दिशा बदलली आहे. मोसमी वाऱ्यांच्या अश्वावर आरूढ होऊन पर्जन्यराज येतो आहे; तेव्हा जरा सबूर !

---

तरुण भारत, २४ जून, १९७९

# १५ मी, इतिहास आणि ऐतिहासिक सत्य !

अखेर काय, की इतिहास हे एक मेरी–गो–राऊंड आहे.
इतिहास हा एक आकाशपाळणा आहे.
माझा इतिहास मी तुम्हाला छातीठोकपणे सांगावा,
एवढे धैर्य माझ्यात नाही...

इतिहास = इति + ह + आस, हे असे असे घडले, अशी इतिहास या शब्दाची व्युत्पत्ती लावण्यात येते. इतिहास म्हणजे निव्वळ सनावळ्या नव्हेत, तर मानवी कर्तृत्वाची सुसंगत, सत्य जंत्री होय, असेही सांगण्यात येते. ' पुढच्यास ठेच, मागचा शहाणा ' या वाक्प्रचारानुसार इतिहासापासून बोध घ्यावा, असे काहींचे म्हणणे.

वस्तुत: इतिहास या शब्दाची व्याप्ती अमर्याद आहे. हा शब्द प्रामुख्याने राष्ट्रांच्या भूतकाळाविषयी, भूतकाळात घडलेल्या सत्य घटनांच्या संदर्भात आपल्या मनात इतका पक्केपणी रुजला आहे की, त्यामुळे इतिहासाकडे पाहण्याची आपली दृष्टी ही एकांगीच बनली आहे, असे दिसते. वर्तमान जगणारी माणसे एक इतिहास घेऊन जगत असतात, हे आपल्या गावीही नसते. इतिहास हा नदीसारखा ! उगम, मध्य आणि अंत हे जसे प्रवाहाचे तीन टप्पे, आणखी उगमापासून अंतापर्यंत या टप्प्यांना ज्याप्रमाणे दूरचा व नजीकचा असे भूतकाळ असतात, तसे मानवी जीवनाचेही आहे. इतिहासाप्रमाणेच नदीच्या कित्येक गोष्टींशी मानवी जीवनाचे साम्य असल्यामुळे नदी हे मानवी जीवनाचे तंतोतंत रूपक बनलेले आहे.

व्याख्येय किंवा पारिभाषिक अर्थाने इतिहासज्ञांनी इतिहासाला असे समृद्ध आणि श्रीमंत केलेले असले तरी ते एका विशिष्ट दृष्टिकोनातून. असे करताना

इतिहासकारांचा लँडस्केप राज्यकर्ते आणि राजकीय घटना यांवर बहुतांशी रोखलेला दिसून येतो. या दृष्टीने इतिहास म्हणजे ‘ देशातील राज्यकर्त्यांचा इतिहास ’ एवढेच गृहीततत्त्व इतिहासकार धरून चाललेले असतात; परंतु इतिहास हा मूळ नक्षत्राप्रमाणे अखिल विश्वाचेच केंद्र आहे. तो जसा प्रत्येक वस्तुमात्रास, जड—पार्थिवांनाही लागू होतो, तसा विश्वात्मक शक्तींनासुद्धा ! त्याची नाना रूपे आहेत. गुणविशेष आहेत. त्यातूनही व्यक्ती, समाजव्यक्ती, निसर्ग, व्यक्ती आणि विश्व या संबंधातील हे ऐतिहासिक रूपबंध विविधतेने प्रकट होताना दिसतात. इतिहासावर जेव्हा कल्पितांचे कलम होते, तेव्हा इतिहास एक कला बनतो ! इतिहासाला जेव्हा सत्यापेक्षा आदर्शवादाची झूल चढविण्यात येते, तेव्हा इतिहासाला नंदीबैलाची रया येते. वेदपुराणापासून जेव्हा वैज्ञानिक दृष्टीने इतिहास वेगळा काढला जातो, तेव्हा महाभारत ‘ जय नावाचा इतिहास ’ बनतो. कोन बदलला, तर आकृती बदलते. कोन सुसंगतवार बदलला तर आकृती आकृतीच राहते; पण तोच जर बेफामपणे ‘ जागा ’ सोडू लागेल तर आकृतीची विकृती व्हायला वेळ लागणार नाही. गॉगलसच्या रंगामध्ये इतिहास दिसतो, तेव्हा सत्तावन्नच्या स्वातंत्र्य-समराला ‘ शिपायांचे बंड ’ म्हटले जाते. याच तत्त्वाच्या निकषावर घासून पाहिल्यास १७८९ ची ‘ फ्रान्सची राज्यक्रांती ’ A Schism with Universe म्हणजे जगा-पासून एक पृथगात्मता ठरते, हे पिट्स नावाच्या इतिहासकाराचे एक मत बनते.

एखाद्या व्यक्तीचे डोळ्यांत भरण्याजोगे कर्तृत्व – विशेषत: व्यक्ती राजकीय क्षितिजावर असेल तर तिचे यश, तिने मोडलेले उच्चांक, एखादी सामाजिक, राजकीय घटना वर्णन करून सांगावयाची झाल्यास त्या व्यक्तीचा किंवा घटनेचा ‘ इतिहासाचा विक्रम मोडणाऱ्या ’त अंतर्भाव करण्याचा प्रघात आहे. अशी घटना ‘ इतिहासाला कलाटणी देणारी ’ म्हणून गौरविली जाते. बऱ्याचदा ‘ इतिहासाला कलाटणी देणे ’ हा वाक्प्रचार ‘ इतिहासाला गचांडी देण्या ’इतका सवंग होऊन बसतो, याचे आपल्याला भानही नसते. अशा व्यक्तीकडे, घटनेकडे लेखक जेव्हा शुद्ध वाङ्मयीन दृष्टीने पाहू लागतो, तेव्हा ऐतिहासिक सत्य वाङ्मय-विलासाची मनोवांच्छित केंद्रे बनू पाहतात. वाङ्मयीन सत्ये ऐतिहासिक सत्यावर मात करून जातात. सत्यान्वेषण तर राहिले एका बाजूलाच, सत्याबाबत मात्र अधिकाधिक भ्रम लोकमानसात रुजत जातो.

गेली काही वर्षे महाभारतीय सत्याचे असेच ‘ नवनीतसार ’ काढणे चालले आहे ! पहिले माधवराव पेशवे जनमानसावर ‘ स्वामित्व ’ गाजवू लागले ह्यात नवल नाही; पण निकम्मा बाजीराव आणि खलप्रवृत्ती कर्णही लोकमानसावर ‘ स्वामित्व ’ गाजवू पाहतो, तेव्हा ऐतिहासिक सत्याचे निव्वळ खेळणे होऊन बसते. ‘ वैदेही ’ जानकी मर्यादापुरुषोत्तमालाही नामर्द म्हणण्याइतकी अमर्याद होते, तेव्हा

तिथेच इतिहासाला ‘ कलाटणी ’ऐवजी ‘ गचांडी ’ मिळत जाते. या ऐतिहासिक मंथनातून क्वचित ‘ आनंदी गोपाळ ’चा एखादा कलश कलात्मकरीत्या बाहेर येतो. ऐतिहासिक सत्याच्या खांद्याला खांदा भिडवून ‘ रघुनाथाची बखर ’ एका उपेक्षित व्यक्तीचे खरेखुरे जीवनदर्शन बनते. इथे वाङ्मय आणि इतिहास ह्यांच्या रेषा परस्परांत बेमालूमपणे मिसळून जातात. अशा जागा वाङ्मयात अभावानेच आढळतात. पुंडलिकांची ‘ द्रौपदी ’ ही अशीच एक दुर्मिळ जागा !

व्यक्तीव्यक्तींच्या संदर्भात इतिहास असाच रोचक आणि लक्षणीय बनतो. मी ज्या वेळी या दृष्टीने माझ्याविषयी विचार करू लागतो, तेव्हा ‘ वर्तमानात जगत असलेला एक ऐतिहासिक पुरुष ’ असे माझे वर्तमानसार मीच काढू लागतो: या दृष्टिकोनातून ‘ आत्मचरित्र ’ हासुद्धा एकप्रकारे व्यक्तीचा, व्यक्तीपुरता इतिहासच असतो. इतिहासाच्या झरोक्यातून जेव्हा मी माझ्यावरच प्रकाशझोत टाकून बघतो (शिष्ट भाषेत कुणी या क्रियेला आत्मनिरीक्षण म्हणतात), तेव्हा सर्वप्रथम जाणवते ते हे की माझ्यात झालेला हा जो बदल आहे, तो खरोखरच विश्वासार्ह नाही. दूरच्या भूतकाळाला ‘ मी ’ अस्तित्वाचा बिंदूमात्र होता. एखादे अष्टदळी कमळ पाकळ्या-पाकळ्यांनी उलगडत, उमलत जाते, तसा विकसण्याच्या प्रक्रियेचा हा क्रम आहे. ही उत्क्रांती डार्विनच्या सिद्धांताशी सापेक्ष आहे. या माझ्या फुलण्या-उमलण्यात किंवा पूर्वीचा मी शरीरमनासह नष्ट होण्यात जो एक क्रम आहे, तोच माझा इतिहास. गतकाळाच्या उन्हापावसाने, शिशिरगारठ्याने अस्तित्वफूल भल्या-बुऱ्या अंगाने विकसित होत गेले आहे. या क्रांतीच्या गर्भातून प्रकृतीनुरूप सर्जनाचे कोंभ उद्भवतात. माझ्यापुरते हे कोंभ शब्दप्रेरित होत असतात.

‘ शुद्ध आली तेव्हा –

सूर्यानं जुनी वस्त्रं त्यजून नवी अवधारण केली होती.

शहरात मला कुणी कुणीच ओळखेनात. ’

डोक्यावरनं हात फिरविला. मऊशार दाट पिंगट केसांचे जावळ उगवून आले होते ! ‘ माझाच का हा ? ’ म्हणून संशयात्म्यासारखा देह निरखीत राहिलो. जराजीर्ण देहदेहाळी संपली होती कधीचीच. त्याऐवजी पिवळाधम्मक, पुष्ट देहगोल. चला, हेही एक बरे झाले. वाढोवा मिळालाय आयुष्याला.

आयुष्याला मिळालेल्या या वाढोव्यात तात्पुरतं समाधान वाटत असलं तरी काहीतरी उणीव राहून गेल्याची जाणीव रुखरुखते :

एवढी क्रांती झाली देहभर; पण –

दोन गोष्टी बदलल्याच नाहीत. एक देहातलं मन. दुसरी जन्मतारीख. ही ती

रुखरुख असते. अखेर काय की इतिहास हे एक मेरी-गो-राऊंड आहे. इतिहास हा एक आकाशपाळणा आहे. मनासारखे लाकडी जनावर मिळवून, त्याच्या पाठीवरून जिथून मी निघालो, तिथेच येऊन पोहोचलो की काय ? एक क्रम असा येतो की आकाशपाळण्यातला ' मी ' अस्मानात सर्वोच्च जागी स्थिरावतो; पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी पतन सुरू होते. पतनही असे तसे नव्हे. अधःपाताच्या खाईत लोटून शरीराच्या चिंधड्या चिंधड्या करणारे !

तर असा हा व्यक्तीचाही चमत्कारिक इतिहास, जो 'आत्मचरित्रा 'च्या कोंदणातही चपखलपणे बसू शकत नाही, तेव्हा मी एक निष्कर्ष काढलाय माझ्या-पुरता की इतिहास आपला आपणच डोक्यावरून वाहून नेणे बरे असते. हे गाठोडे दुसऱ्याला सोडून दाखविणे शहाणपणाचे नसते. राजपुरुषांच्या काय किंवा सर्व-सामान्य व्यक्तीच्या काय, जीवनातली ऐतिहासिक सत्ये शोधून काढणे हे काम तितकेसे सोपे नाही. हे ध्यानात न घेता लिहिलेले इतिहास किंवा बायोग्राफीज् या आत्मप्रतारणा बनण्याइतक्या लवचिक बनतात. त्यापेक्षा आत्मचरित्रे लिहावीच का ?

पण हा प्रश्नही खुळेपणाचाच. काय लिहावे व काय लिहू नये हे ठरविणारा मी कोण तिरसिंगराव ? माझा इतिहास मी तुम्हाला छातीठोकपणे सांगावा, एवढे धैर्य माझ्यात तरी नाही. त्यातून इतिहासाशी इमान राखतो म्हटले, तर शेजारच्या हवेलीवाल्याने आपल्या भिंतीवर वैभवशाली इतिहासाची साक्ष म्हणून चकल्या कडबोळ्यांना चित्राकार द्यायला हवेत – नाही का ?

---

( सा. ' नमो महाराष्ट्र ' दिवाळी विशेषांक, १९७९ – दिवाळी लेखस्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाचा लेख.)

# १६ स्वप्नावरून जेव्हा हत्ती झुलत जातात...

धूसर धूसर आकाश. धुकं – झाडापहाडांना वेढून. सारं चराचर व्यापून. ठणकून ठणकून बधीर झालेलं मन, तन. ग्लानी तनामनाची आणि या सर्वांवर अखेरच्या वस्त्रासारखा पडत, पसरत जाणारा धुक्याचा दाट पडदा. क्षण – निश्चेष्ट होत जाता जाता अक्षरं कुसळासारखी डोक्यात भरतात. काळजात सलतात, डोक्यात भिनतात. पुन्हा धुके. आकाशात प्रचंड हत्ती. एक–दोन–तीन. शेकडो हत्ती. हत्तींचे कळप. त्यांच्या सोंडेत उंचावलेले हार. आता हे हार त्याच्या विजयी गळयात घालणाराहेत हत्ती – हत्ती, जे त्याच्या स्वप्नावरून झुलत चाललेयत.

...तो – ज्याच्या स्वप्नावरून हत्ती झुलत चाललेयत.

मी या विजयी क्षणापासून हटत चाललोय. पराभूत जर्मनीसारखा ! आत्महत्या करण्यापूर्वी हिटलरने भोगलेल्या अस्वस्थ क्षणासारखा...

नोव्हेंबर १९७८. दिवाळी हातातोंडाशी. दिवा उशाशी. पायथ्याशी दिवा. ग्रीलच्या चबुतऱ्यावरही दिव्यांची रांगच रांग. बाहेर धाडऽ धुडूमऽऽ आत लक्ष्मीपूजन. आपल्याला त्याचे काही नाही. सर्व दिवस सारखे. कालचा तसा आजचा. तसाच उद्याचा, परवाचा. येणारे असे कैक दिवस स्थितप्रज्ञ. काहीही न घडता, कपडयांच्या इस्त्रीची घडीही न मोडता येणारे, निघून जाणारे.

वादळ नाही, वारा नाही. नाही पाऊस, नाही पूर. धडधडणारा फक्त ऊर. शरीर सुस्त, थंड. यमदूत – अबोध, अज्ञातात खुणावणारे. वेध मृत्यूचे. आणखी जन्माशी सायोनारा...

काळ आणखी मागे सरकतो. दिवस हळूवारपणे उगवतो. परंपरेप्रमाणे

पेटलेले आकाश. धूर डोळ्यांभोवती. धुराचा घुमट, उष्ण उष्ण... हवाहवासा. इप्सित देऊ म्हणणारा. अबोधाकडं घेऊन जाणारा. ओढाळ. जबरदस्त वाढाळू.

फरफट, प्राक्तनाची. माझी ममेतरांची. माझ्या नाळेची मालकी सांगणाऱ्यांची. माझ्या रक्ताचा संबंध सांगणाऱ्यांची. मी मलाच नाकारीत. माझे आयुष्य ? आयुष्याला नेमून दिलेले पक्षपाती प्राक्तन स्वप्नावरून झुलत–डुलत जाणाऱ्या हत्तींच्या सोंडेतील फूलमाळ न लाभलेला माझा विजीगीषु गळा !

ह्यावेळपावेतो आकाश धुक्यात बुडालेलं. चंद्र–सूर्य–ताऱ्यांसहीत. कमळ-पाकळ्या मिटलेल्या. भ्रमर कमळपाकळ्यांत बंदिस्त !

प्रदीर्घ वाटचालीनंतरची आत्मचरित्रे आपली स्मरणयात्राच सजवीत बसत नाहीत काय ? ज्या वाटेवरून आपण चालत आलो व ज्यावरून चालल्यामुळे आपले पाय रक्तबंबाळ झाले, त्या रस्त्यावरच्या गतस्मृती कवटाळण्यात अर्थ काय ? असे सकृद्दर्शनी वाटण्याचा संभव आहे. ज्या वाटेवरून आपल्याला फुले कमी आणि हाडेच अधिक मिळाली, त्या वाटा कविमनात कटोऱ्याची फळं जपून ठेवायला कारणीभूत होतात आणि भूतकाळाच्या विराण गल्ल्यांतून वेचलेल्या हाडांचे दिवस त्यांना अस्वस्थ करून सोडतात. अशाच कटू दिवसांना सुसह्य करण्यासाठी एका साहित्यिकेला चेकॉव्हने लिहिले होते – Take less complicated the view of life.

मान्य की आजचा भूतकाळ काल वर्तमानकाळ असताना शरीराला व मनाला झालेल्या जखमांचे व्रण अजून आपल्या शरीर–मनावर असतील. आपण जगलो तो भूतकाळ त्या वेळी आपणास इतका दुःसह झाला असेल की, त्या जगण्यापेक्षा मृत्यूला जवळ करणे बरे, असे कैकदा आपल्या मनात आले असेल. वर्षानुवर्षे पिसाट, आत्ममग्न अवस्थेत आपण काळ घालविला असेल, हे सर्व खरे असेल. नव्हे – आहेच.

असे असले तरी वादळानंतर शांत झालेल्या एखाद्या आषाढस्य सायंकाळी भूतकालीन मेघांची अचानक भित उठते. मन कावरेबावरे होते. कुंडीतले झाड न वाढण्याची तक्रार करता करता आपण अचानक कुंडीतील माती बदलून घेण्याची शिफारस करतो. त्या वेळी जवळ असलेल्या जिवलगाच्या डोळ्यांतही पाणी उभे राहिल्याचा भास आपणास होतो. कुठंतरी भूकंपाचा धक्का बसावा – जमीन आक्षितीज हादरत जावी आणि जमिनीशी नाते ठेवणाऱ्या सागरावर करुणेचा कलाम उमटावा, तसे घडते.

आपल्याला गच्चीवरचे आभाळ आठवते ? होय, तेच आभाळ, की ज्याच्याशी आपले चिरंतनाने नाते जडलेले असते. या आभाळाशी जवळीक केल्यामुळे आपण बंधमुक्त झाल्यासारखं दिवस आणि रात्र, रात्र आणि दिवस ! कुठलाही ओरखडा

मनावर न उठता, तृप्तीचे कसलेही दान पात्रात न पाडता रात्र आणि दिवसाचे द्वैत पुढे पुढे धावत असते.

या धावाधावीच्या अतीत आपण नसतो. गच्चीवरचे आभाळ मात्र आपले असते. तळातून वर उचलल्यासारखे आपले जीवन आभाळातल्या असंख्य तारकांपैकीच एक –

रात्र नशीली बनत असते. तिचा कैफ वाढत असतो. बाहेर कुत्री भुंकत असतात. काळजाचा तुकडा गच्चीवर ठेवून आल्यासारखी म्हातारी खोकत असते.

वास्तविक या साऱ्या घटनांना आता तसा काही अर्थ आहे का ? पण लिमलेटच्या गोळीसारख्या तरीही आपण त्या का चघळतो ? सुखाप्रमाणेच दुःखाची पुनरावृत्तीही माणसाला हवी असते का ?

आपण सारखे त्या पिंपळाच्या झाडाकडे बघत असतो. थव्याथव्यांनी बगळे त्या पिंपळाच्या झाडावर येऊन बसतात. डहाळ्या हादरतात. पर्णसंभार वाकतो; पण कडुसं पडेपर्यंत बगळे येतच असतात, चारी दिशांकडून. कधी दहा-विसांच्या संख्येने तर कधी द्वताच्या स्वरूपात. त्या साऱ्यांना एकाच पिंपळावर जागा हवी असते, दाटून-चेपून. पिंपळाचे झाड बगळ्यांच्या त्या वसाहती पंखाआड घेते.

रात्र निघून जाते. रोज सूर्योदय होतो. असे किती काळ चालले आहे ! पिंपळाचे झाड आहे तिथेच आहे. जिवलग खांद्यांना हलवून एकदा म्हणाला होता, ' अनादिकालापासून ते तिथं येत आहेत – डोळ्यांचे आयुष्य संपल्यावरही ते येतच राहतील. कुठवर अशी प्रतीक्षा करशील तू ? '

कधीतरी कबुतरांच्या येण्याजाण्याच्या मार्गावरून मी दिशा निश्चित करून बसलो. मी शोधलेल्या दिशांना कधी दान मिळाले – क्वचित मानही मिळाला; परंतु या दिशा कधीही स्थिर राहू शकल्या नाहीत, हो एक दुखरी स्मृतीच !

मोहरमच्या दिवसांत बसलेल्या ' ताबूता 'ला इशारत करण्याचे ते आभासात्म दिवस. मरणखाटेवर पांघरूण घालताना मित्राने थरथरत्या आवाजात दिलेला दिलासा – आणि तशातही ती जन्माला आली. एवढ्या प्रलयात, इतक्या कलहात, जीवनमृत्यूच्या अटीतटीत.

माझ्या दृष्टीने त्या दिवसांना अर्थ होता; ज्यांना जन्मास घालून मी अज्ञाताच्या प्रवासाला निघालो होतो ! दरम्यानच्या काळात दिवसांचा केवढा प्रचंड लोट वाहून गेलेला असतो ! कविकुलगुरूंनी अशाच एका दिवसाला प्रश्न विचारला –

' The first day's Sun asked
at the manifistation of new being –

Who are you ?
No answer came
Years after years went by
And the last Sun of the day
The last question utters
On the western sea-shore
in the quiet evening
Who are you ?
He gets no answer. '

डोक्यावरचे आभाळ बदलले आहे. सारखे बदलते आहे. सहा वर्षांनंतर आज पाकळी–पाकळी उमललेली. तब्बल अर्ध्या तपानंतर बंदिस्त भृंगाने आकाश नव्याने पाहिले. निळे निळे विभोर आकाश !

जग अनेकार्थांनी पुढे निघून गेलेले. काल उमेदवारी करून बोरू झिजविणारे आज मानसन्मान घेऊन अक्षरांचे स्तंभ सजवीत बसलेयत. काहींना कच्चेपणातून दुवे गवसले. काहींनी आपली माध्यमे अन्यत्र शोधली. अंधारातून जाणाऱ्या प्रत्येक किरणाला झरोका हवा होता, तो त्याने शोधला. काहींनी आपल्या जाहिराती मांडल्या. झाडावरची जुनाट पाने एकेक करून गळून पडली. चैतन्याची नवी, दमदार पालवी झाडाझाडांवर अस्तित्वाच्या खुणा उमटवू लागली.

एकूण काय की डोक्यावरचे आभाळ बदलले, तसे आभाळानेही रंग बदलले. सूर्याची भाषा चटके देऊन कोवळिकीकडे वळू लागली. आकाशात लॅब उघडून जे प्रयोग करीत राहिले, ज्यांचे प्रयोग यशस्वी झालेही – त्यांना त्या दूरस्थ ग्रहांवर पाय रोवता आले. काही आकाश कोरू लागले तर पक्ष्यांची नयनमनोहर नक्षी काहीएक आकाशाच्या भरजरी वस्त्रावर भरत राहिले.

या वस्त्राचे ताणे–बाणे कलात्मक रीतीने गुंफताना सुईला आपला आंगिक अणकुचीदारपणा तेवढ्याच कौशल्याने वापरावा लागतो. पोत बारीक विणले पाहिजेत. ताणे–बाणे परस्परांत मिसळून गेले पाहिजेत. असे की, त्यांच्यातले द्वैत निरखूनही लक्षात येऊ नये. आकाशाचे असे एकेक सणंग तयार झाले होते.

सहा वर्षांनंतर मी बाजारात आलो होतो. सहा वर्षांनंतरच भृंग पाकळीतून बाहेर येत होता. या भृंगाचे जेवढे नातेपुते जगाशी तेवढे माझेही बाजारहाटाशी !

दुकानदार तऱ्हेतऱ्हेच्या पेठा उघडून बसलेले. रेशमी, खरबरीत, देशी, विदेशी, नाना रूपाच्या – रंगागंधाच्या पेठा. भरजरी वस्त्रांचे ढीगच्या ढीग. टेरेलिन, टेरिकॉट, टेरिवूल अशा ' ट 'कारी टुकार पेठा. लाल इमली, खटाव, नायलॉन, वूली, आरगंडी-

असली आणि नकली. बाजारात वस्त्रांचे ढीग पडले होते. हे ढीग हळूहळू रिकामे होत होते. मला हवे ते दुकान, का कुणास ठाऊक – ' बेमुदत बंद 'ची पाटी लावून पेठेतून नाहीसे झाले होते. तोंडून नकळत उद्गार बाहेर पडले, ' आता असे दुकान नेत्रदुर्लभच. या मालकाचे काय झाले असेल ? व्यवहार आतबट्ट्याचा झाला असेल ? स्पर्धेच्या युगात ते टिकले नसेल ? मालकाचे दिवाळे निघाले असेल का ? काही असो. जे झाले ते काही चांगले झाले नव्हते. हा तर निश्चितच कल्चरल ब्लॅक आऊट !'

खडूच्या कांडीचं एक बाटूक घेऊन त्यावर एक जाड फर्राटा ओढला. जसे आत्ता या क्षणी आकाशात कुणी फर्राटे ओढून ठेवलेयत, काळोखाच्या पार्श्वभूमीवर. डोहात उतरणाऱ्या दाट, भयाण सावल्या. मुख्य फर्राटचाला, आणखी उपफर्राटे. पाने, डहाळ्या. पानोळ्यांना चिकटून बाटलीसारखी विणलेली एक वस्तू. खालच्या अंगाने पोकळ, विणलेली, भोपळ्याच्या आकाराची. मग विचारायचं – ' हे काय ? '

पटकन उत्तर येतं – बाटली. अपेक्षित उत्तरासाठी पुन्हा जमिनीच्या दिशेने काही फर्राटे. उत्तर येते खोपा. सुगरिणीचा खोपाच !

सूर्य ! एका प्रखर अस्तित्वाची खूण. खरं तर आत्म्यावरचे रूपकच. उपमा. उपमेला अनेक पर्याय असतात. सूर्य हा बहुपर्यायी नसतो; म्हणून सूर्यासारखा सूर्यच. अन्य काही असू शकत नाही. सूर्याचा किरणपसारा घेऊन अस्तित्व किंवा आत्मा. एक केंद्र–बिंदू. त्यातून फुललेल्या अनेक सरळ रेषा रेषांचा फॉल मात्र सूर्य-किरणांसारखाच ! अनेकवचनी. या ' फॉल्स 'च्या जागाही बहुविध. अनेकरंगी. एक रंग रक्ताचा. दुसरा इंद्रधनूसारखा सप्तरंगी. त्यातही पुन्हा अनेक रंगारंग. रक्ताचा ' फॉल ' जिथं आहे, तो किरण. पृथ्वीच्या पोटात लाव्हाची खळबळ, तसे कुठल्याही क्षणी डोक्याच्या कवटीतून उद्रेक होईल, असे क्षण. त्यातून प्रत्येक क्षण वेगळा. ही काहिली सूर्यापासून तुटून सूर्याभोवती परिभ्रमण करू लागलेल्या सूर्याच्याच थंड, गोल तुकड्याची असते.

थंड होत चाललेल्या ग्रहगोलाभोवती रक्तवर्तुळे स्पष्ट दिसताहेत. ग्रहांची रात्र बेहोष असल्याची ती खूण. कधीतरी आपल्या भ्रमणकक्षेतून ग्रहगोल मोकळा होतो. ग्रह कोहळ्यासारखा देठापासून तुटतो आणि ग्रहगोलावरचे पिपासू जंतू मायावी रूप धारण करून छद्मीपणानं हसू लागतात. मुख्य म्हणजे हा अव्यापारेषु व्यापार सूर्याच्या झाकत्या पाठी घडतो.

एका किरणपाताला ऐहिकाचे पोळे असते. पोळ्यात असंख्य मधमाशा. मधमाशांची एक राणीही ! मधासाठी जिव्हा लवलवते, हात शिवशिवतात – नैसर्गिक प्रेरणा झेपावू लागतात, मधमाशांच्या पोळ्याकडे, राणीकडे. राणी, जी असूर्यपश्या

अजून अवगुंठित. पारंपरिक अर्थाने गोषात.

वर्षेच्या वर्षे उलटतात नि घडत काहीच नाही. अशा वेळी प्रेतकळेसारखे शब्दही आशय हरवून बसतात. शब्द जेव्हा आशयहीन बनतात, तेव्हा शब्दांचे सापळे तेवढे मागे उरतात. गाभाऱ्यात राहून मशिदीचे स्वप्न पाहण्यात काहीही अर्थ नसतो.

मुख्य नदी वाहत आहे. जमिनीवरून, जमिनीखालून तिची पिलावळ तिच्याभोवती पिंगा घालीत आहे, मागे धावत आहे, पाण्यात पाणी मिसळून जात आहे. जीवनाचा हा आणि एवढाच अर्थ मर्त्य सृष्टीचा. एकूण ' सिग्निफिकन्स ' ना मला, ना तुला, ना त्याला म्हणजे तिन्ही पुरुषी हा सिग्निफिकन्स नाहीच.

डोक्यावरचे आभाळ बदलले आहे. सारखे बदलते आहे. सूर्य भैरवीला पोहोचता पोहोचता त्याची कुंडली मांडण्यात अर्थ काय ? भूतकाळातला तो पिंपळ आज कुठे आहे, कुणास ठाऊक ! सभोवार नवथर मेंदी पांढऱ्या फुलांनी डवरली आहे आणि पावसाळ्यात सर्वच मेंदीला फुलं येतात. तेव्हा तसे हुरळून जाण्यात अर्थ काय ?

कलत्या-ढळत्या सूर्यसावल्यांच्या झिरमिरीत, लालसर प्रकाशात रखरखत्या सूर्याची स्मरणयात्रा मी जपून ठेवीन —

सूर्याची कुंडली मांडण्याऐवजी !

---

' युवाजल्लोष ' दिवाळी विशेषांक, १९८७

# १७ मोनॅड

– १ –

स्वतःहून स्वतःकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याचा – सॉक्रेटिस ज्याला अनुलक्षून नो दायसेल्फ म्हणतो – तो एक अनुभव होता. आत्मनिरीक्षण आणि परीक्षण; वैश्विक जाणिवांचे आकलन आणि त्यांचा अर्थगौरव असा त्या अनुभवाचा हव्यास. या छंदाहून अन्य उद्दिष्ट नव्हते. तुझ्याशी एलीएशन साधताना.

तू कल्पना नसताना चेतिका बनत होतीस. तुझ्या अस्तित्वाचे दाणे अकाली पावसामुळेही इथे तिथे उगवू लागले. माझ्या दारात तुझ्या अस्तित्वाचे पीक उभे राहिले. मनाला येऊ लागलेल्या महापुरात पायांखालची जमीन कधीच सरकू लागली; पण हे वास्तव मान्य करणे शक्य नव्हतं. तूही त्याला मान्यता दिली असतीस असं नाही.

मी खोटाच निश्चित स्वतःला निर्धाराचा दिलासा देतो की मामुली झंझावाताने झाड काही मुळासकट उलथून पडत नसतं. फांद्या, पाने, कधी कधी मुळेही गदगदतात खरी. तेवढ्यापुरता थरारही निर्माण होतो; पण ती एक लय असते. कधीतरी ती पूर्वपदावर येतेच.

मी काय लिहितो, कुठले साहित्य वाचतो, केव्हा वाचतो, या दैनंदिनीवर कुतूहलपूर्वक लक्ष ठेवण्याइतकी तू जवळ आलीस. येण्याजाण्याचा एक रतीब सुरू झाला. अर्थात कार्यकारणभावानेच. तुझे रोज येणे अटळ, माझी प्रतीक्षाही अटळच. मी मनाला कितीही बजावले की, आपण काही तिची वाट बघत नाहीये. येणाऱ्या– जाणाऱ्या वाहनांकडे एक चाळा म्हणून पाहतोय झालं !

पण ही सारी प्रतारणा असते ह्याची कुठंतरी खोल खोल जाणीव असतेच. वदतोव्याघातच आहे नाही ? पण आहे खरा. संवेदनांना अधूनमधून जाग येत असल्याचे कधीतरी जाणवायचे. साक्षात्कारही व्हावयाचा. सुप्तपणी विशुद्ध अनुभवांची तुकडेजोड झाली. नाही असे नाही; परंतु हा रूपबंध अस्वस्थ करणारा होता. माझ्या बाजूने कौल देणारा नव्हता. मुक्त आणि बद्ध प्रतिभेतून निर्माण झालेली कोणती क्षणचित्रे खरी, याचा खरं तर जागेपणीच निर्णय घ्यायला हवा. वास्तव जितक्या लवकर स्वीकारता येईल, तितके पुढील अनर्थ टाळता येतात; पण असे प्राक्तन एखाद्याचेच. असा युनिक पिंड अपवादात्मकच. बहुतेक पिंड पाण्यात विर्सजित होणारे. त्यातलाच मी एक. म्हणून ॲब्सर्ड. अनुभव म्हणून मी ज्याचा विनिमय करतो आहे, तो कुठला अनुभव ? या अनुभवापुरती अलिप्तता मला आजकाल का साधत नसावी ?

काळेभोर विपुल केस, भेदक, गुलाबवर्णी डोळे आणि सावळा पुष्ट देह. चेतकांच्या या एकत्र गुच्छावर भ्रमर गुंजारव करणे साहजिकच. बाह्य चेतकातून सौंदर्य आत संक्रमित होत जातं. तू या भूमीवर पदार्पण करण्याच्या आधी – तुझी माझी ओळख होण्यापूर्वी तुझे डोळे माझ्या देहावर बिलोरी आरसे कोरून गेले होते. नेणिवेतल्या मंजुषेत हाही एक अनुभव मी जपून ठेवला होता. त्या डोळयांनी माझा शब्द शब्द ज्या आशेने टिपला होता, ती किती निराधार आहे, याची त्या वेळी तुझ्या मनाला काही काळ रुखरुख लागून राहिली असेल. मी तर या वेळी बोलून-चालून विश्वनिर्मितीपूर्वीचा निर्विशेष क्षण.

तर त्या मेळाव्यात तूसुद्धा होतीस, हे आपल्या परिचयानंतर तू सांगितलंय तेव्हापासून नेमका डोळयांचा पाठलाग सुरू झाला. माझ्या देहावर तू जे आरसे पेरून गेलीस, त्यात तुझे नि माझे प्रतिबिंब नीतीची चाड न ठेवता मी पाहू लागलो. माझ्या दारात येऊ लागलेलं तुझ्या अस्तित्वाचं पीक मी सांभाळून ठेवतो आहे, याची मनोमन खात्री पटल्यामुळे तूसुद्धा जरा सैल झालीस. तुझ्याकडं आता निखळ अनुभव म्हणून बघणं अशक्य होत चाललं होतं. या अनुभवाचा एक मोनॅड मानणं आता शक्य होणार नव्हतं.

चेतक तर रोजच निर्माण होत होते. संख्येत ते शेकडयांनी यावयाचे. भरती आणि ओहोटी. चेतक – संज्ञेला धक्का देणारे, संवेदना पेटविणारे, जळणारे आणि जाळणारे. तुझ्या–माझ्यातला अंतराय मोडून आस्थेचे झरे झुळझुळविणारे !

माझ्याविषयी तू नि तुझ्याविषयी मी बोललेला शब्दन्‌शब्द कुठल्या कुठल्या माध्यमातून तुझ्या–माझ्यापर्यंत पोहोचायचा. शब्दांच्या मार्गात कधी अडथळयांची

शर्यंत निर्माण व्हायची, तेव्हा जीव कोण टांगणीला लागायचा. तुझे नाम हेच माझं उषासूक्त.

नाटकातील माझ्या भूतकालीन नायकत्वाची तू केलेली भलावण म्हणजे एक जबरदस्त चेतक होता; जो अजून मनात घरटं बांधून बसला आहे, या घरट्या-भोवती मनातली चिमणी आता चिवचिवत आहे; पण हे चिवचिवणे कावळ्याने घरट्यातून अंडी पळविल्यानंतरचे आहे.

काळ आणि स्थितीची जाण ठेवून ह्यातून निसटलं पाहिजे मला, तुलाही! तरी तू परक्याशी लगट करताना दिसली की काळीज सारखं लकलकायचं. एक अनामिक भीती वाटायची. पोटात अक्षरशः गोळा उठायचा. तू अचानक कुठं गुंतली जात आहेस, या जबरदस्त संशयामुळं.मत्सराला शह देऊन तुला ताळ्यावर आणण्यासाठी मीही एका बाहुलीचा आश्रय घेऊ लागलो. कसं कोण जाणे; पण तू ओळखलंस की ती खेळण्यातली बाहुली आहे. तुला त्याचं विशेष काही वाटलं नाही. मी फार खचून गेलो. ज्याच्याशी तू सलगी करण्याचा घाट घातलाहेस, तो तुला खरंच हवा होता की ? आपलं तेच खरं... 'स्त्रीयश्चरित्रम् पुरुषस्य भाग्यम् । देवो न जानाति कुतो मनुष्यः ? '

काही असो. मत्सराची आग नसानसांतून जळू लागली. दिवस अस्वस्थ, रात्री बेचैन. काय काय निष्पन्न व्हायचंय ह्यातून ? मी एक अनावश्यक बांडगूळ ठरत होतो की काय ? सारी अस्मितेची पिसं गेली कुठं ? हातचं काहीही राखून न ठेवता मी स्वतःला असा कसा हरवून बसलो ? लौकिकाच्या पिसांना फुंकरीने उडवून लावण्याची संधी मीच तुला उदारपणानं दिली नव्हती का ?

पण मनाला ही खंत का ? अनुभवाकडे ' मोनॅड ' म्हणून बघावयाचे असे एकदा ठरविल्यानंतर ?

कथानकाचा प्रवाह अजूनही बदलला नव्हता. शहरात आलो होतो मिळून. वाहन शोधण्यासाठी जरा पुढं जावं लागणार होतं. आकाशातून कुणी दैवी शक्ती आपल्यावर पाऊस–पुष्पे उधळत होती. भिजत होतो. बोलता बोलता चालत होतो, फुलांच्या पायघड्यांवरून जणू. संवेदना, भावना, चेतना, बोधना साऱ्यांचा एक प्रवाह बनून तुझ्यामाझ्यातून ओसंडत होता. खरं तर हे आणि इतकंच. या पलीकडे पाहू नये. अनुभवाचा आस्वाद स्वरसरंजनात्मक होऊन दोघांनीही घ्यावयाचा. A Monard is a windowless whole from which nothing can go out, into which nothing can come from outside.

आपल्यामध्ये जो अंकुर उगवला तो जगापर्यंत पोहोचू नये. जगाला या अंकुराची जाणीव होऊ नये; कारण अशी जाणीव होणे हे न तुझ्या हिताचे, न

माझ्या ! प्रगल्भावस्थेतल्या या अनामिक वासनेला जुगुप्सेची फळं येऊ नयेत. तुझ्या–माझ्यातील अग्रानुभवात मत्सराचे गांडुळ खिडकीतून वळवळत येऊ नये. तुझ्या मागचे–पुढचे संदर्भ छाटून उरलेली तू मला हवी आहेस. तुला बिलगून येऊ पाहणाऱ्या आगंतुक संदर्भामुळे हा कलात्मक अनुभव दुभंगून नाही का जाणार ? या अनुभवाकडे आपण मोनॅड म्हणून पाहावयाचे असे नाही का ठरविले ?

नेमकी याच क्षणी, सामंजस्याच्या मुहूर्तावर नागीण वळण घेते. वारा दिशा बदलतो. परस्परांविषयीची अंतरे निष्ठेची ग्वाही देता–घेतानाच परिस्थितीचा रूख बदलतो. स्पर्शाची पुसटशी लय अंग चोरता चोरता आपलीशी होते. लयभर साम्राज्य मनात निर्माण होते न होते तोच साम्राज्य विलयाला जावे तशी गत.

मी नुसता बोलत असतो. सारखा तुझ्याकडं बघत. इथेही आपण ‘ कुण्या दुसऱ्याचे आहोत ’ ही जाणीव तुला स्त्रीसुलभ भीडेस्तव माझ्या डोळ्याला डोळा भिडवू देत नसावी. तरीही आत कुठंतरी ओढ असतेच. ती लपविणे तुला शक्य होत नाही. धावत्या एस. टी.त, ऑटोमधून, सडचा सडकेवरून, धुंदफुंद होऊन अक्षरशः न्हाऊन, अंतर्बाह्य चिंब भिजून !

रुखसत. निरोपाची एकाएकी घाई. मला निघायचं असतं आता. दुसऱ्या जगाचा कौल घेण्यासाठी. कर्मयोगाने बांधले गेलेले एक पैंजण म्हणून वावरत होतो आपण. कालपरवापावेतो. आज ? पैंजणातले एक घुंगरू घरंगळले. मुक्तीच्या क्षणी परस्परांच्या वाटा भिन्न होतात. पुन्हा या वाटा एकत्र आणायला नियती कुणाची बांधील नाही. पूर्वी एकदा तिने हा प्रयोग करून पाहिला नि त्याची विश्वव्यापी शोकांतिका झाली ! मला आठवतं.

तू येताना पाऊस होता. तुझ्या–माझ्या अंगावरून निथळत... आता डोळ्यांत पाऊस घेऊन चालली आहेस. ह्यातून मला काहीच मिळवायचे नव्हते असे कसे म्हणू ? आता तुझ्या प्रतिमेचाच एक ‘ मोनॅड ’ भोवती घुटमळतोय. मला हे विसरता येईल ? कुणास ठाऊक !

एक विशुद्ध अनुभव म्हणून माझा मी स्वतःला स्वीकारण्याचा यथाशक्ती प्रयत्न करीन; इतकेच !

---

तरुण भारत, नोव्हेंबर, १९८८

सागराच्या गर्जना आणि माणसांच्या वल्गना या पलीकडच्या या गोष्टी. आपले हात स्वतःच्या देहापुरतेच मर्यादित असतात. आपले कपाळ फक्त आपल्यासाठीच असते. कुणाच्या कुंकवाचे धनी किंवा कुणा एकाच्या नावाने कुंकू लावून उभा जन्म सलगी करावी हे – आपले म्हणविणारे हात असून त्यांच्या आटोक्यातील काम नसते.

आपण पाहत राहतो, भोगत वसतो दुरातल्या पक्ष्याने आपल्या हातून एखाद्या बेसावध क्षणी हिरावून नेलेल्या फळांचा रसरशीत ऐवज, चैतन्य. व्यक्ती आणि वस्तू आपल्या हातातून निसटून जातात, परागंदा होतात – क्षितिजापलीकडे तेव्हा त्या आपल्या राहत नाहीत. पिंडांचे पौराणिक संदर्भ हरविलेल्या प्राक्तनाला प्राप्त होतील कधीतरी म्हणून आपण डोळ्यांच्या ज्योती जाळत बसतो.

जवळ – अगदी ओठांशी आलेले मनजोग इप्सित दगा देऊन जाते आणि मागे उरतात त्याचे पडसाद. टरफलांचे आयुष्य जगताना रिक्त पोकळीतल्या नसलेल्या चैतन्याला खोटे खोटे जागवून आपण आपलीच प्रतारणा करतो. गतीबरोबर अगतिकपणे चालत असतो. दुरातले दिवे खरं तर छलावे असतात; पण ते आपल्याला दिलासे देतात असा उगाचच आपला भ्रम असतो.

परवा अशीच तू भेटलीस. बागेतली चार फुलं तुझ्या तळहातावर ठेवली आणि पाहता पाहता तुरुंगावरच्या पहारेकऱ्याने वेळ संपल्याचे जाहीर केले. मुलायम वास्तव जेव्हा निखळ स्वप्न नसते, तेव्हा दिशा अंधारून येतात. मनात काहूर दाटतं. ठायी ठायी, पावलापावलांवर तुझ्यासाठी बागा निर्मून सुंदर, देखणी आणि नाजूक अशी शिरीषाची फुलं मी तुझ्या तळहातावर ठेवतो. तुझ्या तळहाती फुलं ठेवली म्हणून तुझ्या किंवा माझ्या तळहातावरील समांतर रेषा बदलणार नसतात, हे ठाऊक असूनसुद्धा ! असे भुकेजल्या श्वानाचे दैन्य आणि उरी फुटेस्तोवर मृगजळापाठीमागे धावणाऱ्या हरिणाचे कर्मचक्र !

ध्यानी-मनी-स्वप्नी-एकांती आणि जनसंमर्दात मी तुझेच अस्तित्व गृहीत धरून जळत असतो. या देशातले सारे पक्षी तुझ्याकरिताच गातात. सारे उत्सवही तुझ्यासाठी साजरे होणार असतात. उदंड कोलाहलात पक्षी समूहगीते गाणार असतात, विजयध्वज रोवणार असतात. या विजयोत्सवात आपल्या परीने तूही आपल्या अभिजात कलेचं प्रदर्शन मांडशील. तुझ्या अंतरंगाचे उपेक्षित सौंदर्य, कलावती, तुझे रंग या विजयोत्सवाला वेगळाच आयाम देतील.

काल ज्यांनी दु:स्वास केला, ती स्वार्थपरायण माणसं तुला डोक्यावर घेऊन

नाचतील. घराघरातून तुझा नामघोष ऐकू येईल. तुझ्यासाठी जाळं टाकून बसलेले पारधी हळूच तुझ्या नावाचा उखाणा घेतील; तेव्हा तुझी प्रतिक्रिया कशी असेल हे तुझ्यापासून शेकडो योजने अंतरावर राहूनही मी अजमावू शकतो. अशा वेळी चिंध्या चिंध्या होतात हृदयाच्या. स्थिती, गती आणि लयीचा हा अपरिहार्य परिणाम असतो. न भावणारा. अस्मिता उचकटून टाकणारा. माझी राख राख करून निर्मित विश्वाची स्मृती नष्ट—भ्रष्ट करणारा. या राखेतून फिनिक्स पक्ष्याचा जन्म होईल कधीतरी म्हणून मी अजून वाट पाहतो. ऐलतीरावर.

पैलतीरी एक झुलाव. नांगरून पडलेल्या जमिनीच्या काळ्या, आटोपशीर नि एकाकी तुकड्याच्या मेढीवर अस्तित्व कसेबसे टिकवून असणाऱ्या हिरव्या झाडासारखा. मी किंवा मुंडेछाट वाभळीच्या राक्षसी मांड्यांवर छत्र धरून बसलेल्या रानवेलीसारखे यापुढे माझे अस्तित्व तुझ्या बदलत्या दृष्टीतून. झपाट्याने वळण बदलवणारा तुझ्या प्राक्तनाचा महापूर अडविण्यासाठी माझ्यातला आरुणी मी उगाचच या महापुरात घालवतो आहे – हे नियती ! स्मृतींचे हे चिवटपण झटकून टाकू दे. त्यासाठी कसकशी, किती निमित्ते शोधावी लागतात. आपण आपल्याशीच खेळावे लागते. आपल्या जखमांवर आपणच फुंकरावे लागते. कधी एका जखमेच्या वेदना विसरून जायला, तिला पॅरलल म्हणून मी मुद्दाम दुसरी जखम करून घेतो. पहिल्या जखमेच्या वेदना सुसह्य करण्यासाठी हा छलावा असतो. तो जरा वेळ भुलवूनही टाकतो कोरलेले मनभार रस्ते. आयुष्याची आवरासावर करून नव्या रस्त्यावरून आपण चालत जावे, तरीही बुडालेले क्षितीज दृष्टिपथात येत नाही, ते नाहीच. जुन्या रस्त्यांचे दुरावलेपण आणि नव्या रस्त्यांचे आरोहण. दरम्यान हळहळणारे मनाचे दुखरे झुलाव मात्र मनाबाहेर काढूच शकत नाही आपण. उलट ते जपत बसतो आयुष्याच्या विराण वाळवंटातील ओॲसिससारखे !

डायरी लिहायची मला सवय नाही. समजा, ती असती तर क्षणाक्षणाचा तापलेला, चढउतारांचा हिशेब पानावर नोंदता आला असता. काळीज तोडून इतिहासाच्या गुहेत पाहता पाहता पसार होणारा उचल्या काळ. त्याला मी असे सहजासहजी सोडले नसते, अंगावर अंगार घेऊन ! ठिणग्यांनी आयुष्य सजवीत बसण्याचा हा रुद्रभीषण, करुणगंभीर क्षण येता ना ?

अजून येणाऱ्या... आले तसे रिते रिते जाणाऱ्या रविवारांची मी प्रतीक्षा करतोच आहे. किंबहुना प्रतिक्षेचं मनाला वेड लागलं आहे म्हणा ना ! काळानं ज्यांना उचललं, त्यांच्यापाठी धावणं हा निव्वळ मूर्खपणा हे कळूनसुद्धा !

आजच्या पर्वावर तू जिथं कुठं पाय रोवून उभी असशील, त्या भूमीचे बदललेले चित्र, तुझ्याशी तिनं केलेली आक्रितं, त्या भुईतून तुरूतुरू धावणारी

गांडुळांची रांग अजून डोळ्यांपुढं उभी ठाकते आहे. अशाच एका पर्वावर तुला कावळ्यांच्या कोलाहलातून अलगद ओढून मी तळहाती जपून नेलं होतं एका शहाण्यासुर्त्या विवेकाकडं. प्राक्तनाच्या अजगरानं पुन्हा तुला जबड्यात ओढून घेतलं. मी पाण्यावर वार करीत राहिलो. माझ्या डोळ्यांसमक्ष अजगर तुला गिळू लागला — आज तेच ,पर्व सोबतीला घेऊन तू नायिकेसारखी उभी असशील नर्तिकांच्या मेळाव्यात.

वास्तवता आता पैलतीरावर गेली आहे आणि ऐलतीरावर दिलावर स्वप्ने उराशी कवटाळून मी भिगरीच्या पात्यावर बसून खोल खोल रुतत चाललो आहे. भोवती धुक्याचा समुद्र. लडखडणारे पाय. पिंपळाच्या सळसळत्या पानोळ्यात घरटं बांधण्यासाठी पक्षी धडपडत होता. फांद्यांच्या मधोमध कितीदा यत्न करूनही पहिली काडी स्थिर राहू शकली नाही, तिथं घरटं बांधून होणं कसं शक्य होतं ? $\frac{\text{आकाश}}{\text{माती}}$ = ? या देवानंद गोरडे यांच्या कवितासंग्रहात एक कविता आहे —

‘ तू .. मी, दोन समांतर रूळ ! ’

जीवनातील या समांतर रुळांचं गणित बस्स नियतीलाच एक ठाऊक. समजा, मी आपल्या प्रियेला हेतुपुरस्सर भेटायला निघालो. पर्याय नसलेले आडाखे मनाशी जुळवीत. मन आणि पावलांचे ठोके सुसंगत जुळवून. तिच्या दिशेकडून वाहणाऱ्या वाऱ्याच्या प्रत्येक झोताचे सूक्ष्म निरीक्षण करीत. भावनाभेटीच्या उत्कट ऊर्मी तिच्या दर्शनानं केवळ शमवायला मी निघालो आणि संकेतस्थळी ती आलीच नाही. व्यक्ती आणि काळाचं गणित कुठंतरी चुकत, हुकत गेलं ! वर्दळ अंगावर आली. काळ कधी हसत नसतो, कधी रडत नसतो. तो आपला निमूट चाललेला असतो. माझी काळाविषयी तक्रार अशी की, मी जपून आणलेल्या पारिजाताच्या फुलांना त्याने पायदळी तुडविले. त्याचा चोळामोळा केला. साऱ्या जीवनाचे निर्माल्य करून तो पुढे पुढेच सरकत गेला.

आता मी मनाशी निर्धार केला की, नियतीच्या पाठी धावण्यात अर्थ नाही. स्थल आणि काल यांची जाण राखून अस्तित्वाला नवी दिशा दिली पाहिजे. समांतर रुळांचं गणित बदललं पाहिजे. आपल्याभोवती आपल्यापुरता स्वेच्छ जगण्याचा पुन्हा एकदा ‘ मोनॅड ’ निर्मिता आला पाहिजे — जिथे ना कुणाच्या आठवणी, ना स्मृति-संसर्गे येणाऱ्या जीवघेण्या कळा ! विस्मृतीची आंतरबाह्य साधने धुंडाळीत, मनावर ‘ मी ’ला ग्रासून टाकणारे धुक्याचे दाट पटल निर्माण करीत मी कुण्या एका दिशेचा पाहुणा म्हणन तुझ्या शहरात आलेला असतो, तर गजबजलेल्या चौकाच्या एका कडेला तू उभी दिसतेस. आकाशी रंगाच्या नेसूत तू नजरेच्या नखाने जमीन

उगाचच कुरतडीत उभी असतेस. या वेळी नेमकं माझं लक्ष तुझ्या मुद्रेवरचे प्रसन्न भाव, लाजरी कळा यांवर केंद्रित होतं. या जनसंमर्दात कुणा दुसऱ्यासाठी या कळा संभवणे अशक्य मानले तर माझ्या आधीच तू मला पाहिले असावे. आपण परस्परांपासून दूर संवादातीत उभे.

तितक्यात मला घ्यायला वाहन येतं. मी निघून जातो. अजून तू चौकात उभी असतेस; पण तुझा पुसटसाही ठसा मनावर नसतो.

मी मंदिराजवळ उतरतो. ऑटोच्या हातात रुपया टिकवीत. विठ्ठलवेडा नाम्या. त्याला यथासंभव अंतरंगातल्या ऊर्मींनीशी डोळयांत साठवून घेण्याची माझी गेल्या चार–सहा वर्षांतली सवय. दर्शन घेऊन झाल्यावर भारावलेल्या अंत:करणाने मंदिराच्या पायऱ्या उतरू लागतो. आपल्याच तंद्रीत असतो. इथल्या रणरणत्या दुपारी थांब्यावर मी एकटाच. वाहनं परस्परविरुद्ध दिशांनी येत-जात असतात. वाहनाला हात देतो. खचाखच भरलेल्या बसेस, ऑटो माझ्याकडे दुर्लक्ष करीत निघून जातात.

तोच मागच्या ऑटोतून तू येतेस. हिरव्या प्रसन्न परिधानातून मोहोरलेल्या झाडासारखा तुझा हात माझ्या दिशेनं सळसळतो. मी मख्खपणे उभा. मी तुझ्या वाहनाला हात देऊन थांबवावं अशी लसलसती वांच्छा तुझ्या मुद्रेवर. तुझ्या स्निग्ध स्मितातून, माझ्या दिशेनं सळसळणाऱ्या कांक्षी हातातून... स्वप्नस्थ अपराध्याच्या जागृतीतील जाणिवेचा परिचय देणाऱ्या तुझ्या भावूक डोळयांतून मला स्पष्टपणे टिपून वाहताना जाणवतात.

तरी मी स्तब्धच. मुग्धपणे पायऱ्यांशी उभा. एक वेळ अशी असते की मी वाहनात तर तू चौकात आणि एक अशीही वेळ की तू वाहनात आणि मी देऊळ-पायऱ्यांशी.

निळ्या आकाशाशी तुझं–माझं काही नातं असावं आणि हे नातं तोडायची नियतीची प्राज्ञा नसते. एक क्षण असा की नियतीनं तुझ्या–माझ्यात शिवाशिवीचा खेळ मांडलेला असतो आणि हा दुसरा क्षण ... नियतीनेच माझ्या दिशेनं माझं इप्सित आणून माझ्या पुढ्यात टाकण्याचा. नियतीने मला देऊ केलेला हात – त्या हातातील दान मी नाकारले, झिडकारले !

मी आपणहूनच ते खेळणे आता स्वीकारीत नाही.

नागपूर पत्रिका

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नि ८४
अ. क्र. ३५३६

REFBK-0026937

शब्द ? – ब्रह्माची पावलं.
शब्दांना अर्थ ? शब्दांनीच.
शब्द आणि महाशब्द. गुलाम शब्द, स्वतंत्र शब्द.
काही शब्दांकरिता शब्द, काही स्वयंप्रकाशित –
परप्रकाशित चंद्रासारखे काही.
विव्हल शब्द, एक अंश परमशब्दाचा.
शब्द म्हणजे जंतू म्हशीच्या पाठीवरील जखमेतला.
अर्थाचे समुद्र हावरटागत न्याहाळीत
शब्द घेता येतात वांझोट्या झिंगेत,
किनाऱ्यापासून चोरून …
काळ्या कमाईसारखे उधळताही येतात
‘ महालक्ष्मी ’वरून …